सोमवार, २६ जून २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२८३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक



MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • MONDAY 26 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-283 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-14 • PRICE-5

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी रवींद्र शोभणे

## अमळनेर येथे होणार ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे : ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अमळनेर येथे होणार आहे. साने गुरुजी यांच्या कर्मभूमीत होणाऱ्या या संमेलनासाठी अध्यक्षांची निवड जाहीर झाली आहे. संमेलन अध्यक्षपदी रवींद्र शोभणे यांची निवड करण्यात आली आहे. पुणे येथे रविवारी झालेल्या साहित्य महामंडळाच्या बैठकीत रवींद्र शोभणे यांचे नाव निश्चित करण्यात आले. प्रसिद्ध कवी प्रवीण दवणे, ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे, ज्येष्ठ बाल साहित्यिक न. म. जोशी यांची नावेही अध्यक्षपदासाठी चर्चेत होती. परंतु शोभणे यांचे नाव बहुमताने निवडण्यात आले.**




बैठकीत संमेलनाच्या तारखांवरही विचार करण्यात आला. २ फेब्रुवारी २०२४ पासून हे साहित्य संमेलन होणार आहे. २,३ आणि ४ फेब्रुवारी दरम्यान साहित्य संमेलन होणार असल्याची माहिती साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे यांनी दिली.

कादंबरीकार रवींद्र शोभणे यांचा जन्म नागपूर जिल्ह्यात झाला. नरखेड तालुक्यात खरसोली या गावी त्यांचा जन्म झाला. खरसोलीच्या आदर्श विद्यालयातून त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण नरखेड येथे तर पदव्युत्तर शिक्षण नागपूर येथील मॉरिस महाविद्यालयात केला. १९८९ मध्ये त्यांनी पीएच.डी. ची पदवी मिळवली. कथालेखक म्हणूनही ते परिचित आहेत. १९९१ मध्ये त्यांचा 'वर्तमान' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. डॉ. रवींद्र शोभणे यांना अनेक प्रकारचे सन्मान मिळाले आहेत. यापूर्वी यवतमाळमधील पुसद येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या पहिल्या युवा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांच्यांकडे होते. तसेच मराठी भाषा साहित्य अकादमीमध्ये सल्लागार सदस्यपदी ते होते. सन २००७ ते २०१२ यादरम्यान ते या पदावर होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १८७८ मध्ये प्रथम पुणे शहरात झाले होते. त्या संमेलनाचे अध्यक्ष न्या. महादेव गोविंद रानडे होते. जळगाव जिल्ह्यात पहिले संमेलन १९३६ मध्ये झाले. माधव त्रिंबक पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. अमळनेरमध्ये पहिले संमेलन कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली १९५२ मध्ये झाले होते. त्यानंतर आता अमळनेर २०२४ मध्ये दुसऱ्यांदा हे संमेलन होत आहे. अमळनेर साने गुरुजी यांची कर्मभूमी आहे.

# मुसळधारेचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जून महिन्याच्या शेवटचा आठवडा आल्यावर मुंबईमध्ये मान्सून दाखल झाला आहे. पुणे अन् मुंबई जोरदार पाऊस झाला. तसेच पुढील 24 तास मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा देखील हवामान विभागाने दिलेला आहे. मुसळधार पावसामुळे समुद्रात हाय टाईड देखील होणार आहेत. त्यामुळे रविवारी सुटी असताना मुंबईतील चौपटी पर्यटनासाठी बंद केली आहे. पुणे शहरात शनिवारी पाऊस झाल्यानंतर रविवारी दुपारी जोरदार पाऊस सुरु झाला. आता मुंबई, पुणेपर्यंत मर्यादीत असलेला पाऊस संपूर्ण राज्यात दाखल झाला असल्याची माहिती पुणे हवामान विभागाचे प्रमुख के.एस.होसळीकर यांनी दिली.

यंदा मान्सून लांबतच चालल्याने राज्यातील अनेक जलप्रकल्पांतील उपयुक्त साठा कमी झाला होता. राज्यातील मोठे अन् मध्यम प्रकल्पांतील साठाही कमी होत होता. यामुळे शहरी भागातही चिंता निर्माण झाली होती. परंतु आता आनंदाची बातमी आली आहे. राज्यात मान्सूनने सक्रीय झाला आहे. भारतीय हवामान विभागाने ही माहिती दिली. तसेच गुजरात, राजस्थान, हरियाणा, पंजाब आणि जम्मू काश्मीर वगळता संपूर्ण देशात मान्सून सक्रीय झाला आहे. मान्सून दाखल झाल्यानंतर राज्यात पुढचे 5 दिवस सक्रिय राहणार आहे. पुढील पाच दिवसांत कुठे कुठे पाऊस असणार आहे, त्याची माहिती हवामान विभागाने दिली. त्यानुसार कोकण अन् विदर्भात मुसळधार ते अती मुसळधार पाऊस पडणार आहे. पुणे, सातारा, नाशिकमध्येही जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. तसेच मध्य महाराष्ट्र अन् मराठवाडामध्ये ही पावसाचा जोर कायम असणार आहे.

# पंकजा मुंडे राष्ट्रवादीत येतील?

## अमोल मिटकरी यांच्या वक्तव्याने खळबळ

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांना वारंवार पक्षात डावलले जात आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. दरम्यान, महाराष्ट्रात पाळंमुळं घट्ट करू पाहणाऱ्या बीआरएसने पंकजा मुंडेंना मुख्यमंत्रीपदाची खुली ऑफर दिली आहे. असे असताना आता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी मोठे विधान केले आहे. पंकजा मुंडे लवकरच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करतील. याबाबतची माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना माहीत आहे, असे विधान मिटकरी यांनी केले आहे.

पंकजा मुंडेंची नाराजी आणि बीआरएसकडून दिलेल्या ऑफरबाबत विचारले असता अमोल मिटकरी म्हणाले, मध्यंतरी एकनाथ खडसे यांनी पंकजा मुंडेंची भेट घेतली होती. तेव्हापासूनच्या घडामोडी तुम्ही बारकाईने पाहत असाल, तर बऱ्याच प्रमाणात भारतीय जनता पार्टीकडून पंकजा मुंडे यांना वारंवार अपमानास्पद वागणूक दिली जात आहे. परवा कारखान्याची निवडणूक झाली, तेव्हा दोघेही बहीण-भाऊ सामंजस्याने एकत्र आले. त्यामुळे आम्हाला विश्वास आहे, पंकजा मुंडे राष्ट्रवादी पक्षात येतील. पंकजा मुंडे या गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या आहेत. त्या महाराष्ट्राचे नेतृत्व आहेत. त्यामुळे त्या आपल्या पक्षात असाव्यात, असे प्रत्येकाला वाटले. त्यामुळे मलाही वाटते की, त्या आमच्या पक्षात असाव्यात. बीआरएस ही अफूची गोळी आहे. बीआरएस हे नवीन गुलाबी वादळ आहे. बीआरएस किंवा एमआयएमने पंकजा मुंडेंना काय ऑफर द्यावी, हा त्यांचा प्रश्न आहे. पण त्यांच्या ऑफरला पंकजा मुंडे भाळतील आणि बीआरएसच्या गळाला लागलीत, असं मला वाटतं नाही. बीआरएसच्या गळाला जे लागले आहेत, त्यांचं महाराष्ट्रात भविष्य चांगलं नाही. कारण तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनी बीआरएसला अद्याप महाराष्ट्रातला चेहरा दिला नाही. त्यामुळे हे गुलाबी वादळ आहे, काही दिवसांत शांत होईल. मात्र पंकजाताई थोड्याच दिवसात त्यांचा पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात येतील, हे भाजपामध्ये फक्त चंद्रशेखर बावनकुळेंनाच माहीत आहे, असे मोठं विधान अमोल मिटकरी यांनी केले आहे.

पंकजा मुंडे राष्ट्रवादीत आल्या तर त्यांना मुख्यमंत्रीपद दिलं जाईल का? असे विचारले असता अमोल मिटकरी पुढे म्हणाले, मुख्यमंत्री कुणाला करायचे? हा सर्वस्वी पक्षाचा निर्णय आहे.





# नामदेव पवार हेच आमदार : डॉ. काळे

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शहरातील रामकृष्ण महल येथे काँग्रेसची मतदार संपर्क अभियान बैठक संपन्न झाली असून यावेळी डॉ. कल्याण काळे बोलताना म्हणाले आम्ही विधान सभा व लोकसभा महाविकास आघाडी एकत्र येऊन लढणार असून कन्नड विधानसभाही जागा कन्नड कॉग्रेस पक्षासाठी मागणी करणार असून काँग्रेस पक्षाचे उमेदवार माजी आ. नामदेव पवार हेच असणार असेही पत्रकार परीषद मध्ये जाहीर केले. या वेळी तालुक्यामध्ये काँग्रेस कमिटी मतदार संपर्क अभियान आढावा बैठक घेऊन प्रत्येक गावात ग्राम समिती स्थापन करणार यामुळे पक्ष बळकट करणार पंचायत समिती मंडळ समिती गठीत करून आढावा घेतला जाईल. दुसरा दौरा जिल्हा परीषद सर्कल दौरा करणार असुन राहुल गांधी नाना पटोले यांचे आदेश नुसार येणाऱ्या काळात निवडणुका साठी उत्तम बांधणी करून सत्ता काबीज करू, असेही बोलताना म्हणाले. यावेळी डॉ. कल्याण काळे, माजी आ. नामदेव पवार, विलास औताडे शेख खाजा शेख याकुब आरेफ हाशमी यांची उपस्थीती होती.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

'जिंदगीभर नही भुलेगी वो बरसात की रात...' किंवा ' ये रात भिगी भिगी ये मस्त नजारे ...' यासारखी अवीट गोडीची गाणी पावसाळी रात्रीने कवींना दिली आहेत. एखादा प्रियकर तर पावसाला विनंती करतो, ' बरखा रानी जरा जमके बरसो, मेरा दिलबर जा न पाये, झूमकर बरसो. ' एखादी प्रेयसी आपल्या प्रियाला विनंती करते, ' जीद ना करो, अब तो रुको, ये रात नही आयेगी. ' झूम झूम ढलती रात, कहीं दीप जले कहीं दिल, ये राते नयी पुरानी, आधा हैं चंद्रमा रात आधी...' अशी खूप गाणी आठवतात.
तरुण आहे रात्र अजुनी, चांद मातला मातला त्याला कशी आवरू, धुंद मधुमती रात रे, उगवला चंद्र पुनवेचा ...' प्रियकर प्रेयसीच्या भावना व्यक्त करणारी अशी असंख्य गाणी. मराठी, हिंदी आणि इतरही भाषेत नक्कीच असणार. रात्रीस खेळ चाले अशी गूढ गर्भ गाणीही आहेतच. रात्र ही वरदान आहे. रात्र आपल्यासोबत स्वप्ने घेऊन येते. मानवाला भविष्याची उज्ज्वल स्वप्ने दाखवते ती रात्रच ! दिवसाच्या स्वप्नांना दिवास्वप्न म्हटले जाते. रात्र ही म्हटलं तर दुःख विसरायला लावणारे एक नैसर्गिक औषधही आहे. माणसाची दुःखं, थकवा ती पदरात घेते आणि त्याला नवसंजीवनी प्रदान करते. शांत, प्रसन्न झोपेसारखं दुसरं औषध नाही आणि ते फक्त रात्रच प्रदान करू शकते. तर अशी ही रात्र ! बळ देणारी आणि कसोटीही पाहणारी. दिवसभराचा दमलेला सूर्य संध्याकाळी अस्ताला जातो. दिवस मावळतो. संध्याकाळ हळूहळू केव्हा रात्रीत रूपांतरित होते, ते कळतही नाही. एखाद्या आईनं आपल्या झोपलेल्या लेकरांवर मायेनं पांघरूण घालावं तसं रात्रीचं तलम वस्त्र हळूहळू सगळ्या चराचरावर पसरत जातं. रात्र हळूहळू सगळ्या विश्वाला आपल्या कवेत घेते. डोंगर, झाडे, निसर्ग अंधाराची काळी दुलई पांघरून प्रगाढ निद्रा घेतात. हिवाळ्यात पहाटे पहाटे कधी कधी धुक्याची चादरही परिसराला वेढून टाकते. सूर्याची मऊ, मुलायम किरणे मग हळूहळू ही अंधार आणि धुक्याची चादर हलकेच ओढून घेतात. सगळ्या परिसराला एक देखणे रूप प्राप्त होते. तेजाची आरती जणू सृष्टीत सुरु असते. पण हे तेज, हा उत्साह, हा तजेला रात्रीमुळेच प्राप्त झालेला असतो. सुरेश भटांसारखा एखादा प्रतिभावान गझलकार सहज लिहून जातो 'केव्हा तरी पहाटे उलटून रात्र गेली. ' रात्रीच्या वेळी जे आकाश तारकांनी भरलेलं असतं ते आकाश सुद्धा सहज ' उचलून रात्र गेली ' असे कवीला वाटते. तर कधी कवीला न आठवणारी, न सुचणारी एखादी कवितेची ओळ ती रात्र सुचवून जाते.






# आनंदी पहाट

## आनंदाची निर्मिती आपण स्वतःच करावी

आधुनिक केसरी

कालचा दिवस संपल्यावरच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन दिवसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय किरणांनी आपले नवे आयुष्यच जणू काही सुरु होत असते. दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच; पण शिवाय मनःशांती अधिक प्राप्त होत राहते. सद्यःस्थितीत जगामध्ये पैशाने काहीही विकत घेता येते आणि विकताही येते. असे जरी असले तरीही मनःशांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपल्या आंतच आपण स्वतः आनंदाची निर्मिती करायची असते. त्याची अनेकदा आपण अपेक्षा इतरांकडून करतो, पर्यायाने निराश होतो. आजचा दिवस माझा हेच सत्य आहे आणि म्हणूनच ते सिद्धही केले पाहिजे. आपल्याला आपण स्वतः प्रसिद्ध होण्याची इर्षा असते आणि ती असलीच पाहिजे; पण प्रसिद्ध होण्यासाठी अगोदर स्वतःला सिद्ध करण्याची जरुरी असते, हे मात्र आपण विसरतो. केवळ विचारांत, स्वप्नांत, भ्रमांत आणि संभ्रमांत न अडकून पडता कार्यकक्षांच्या मर्यादा ओलांडाव्या लागतात, स्वतःला झोकून देऊन प्रत्यक्ष कार्यकृती करावी लागते, हे मनात आले पाहिजे, आपण ध्यानांत घेतले पाहिजे. ह्यासाठी आपल्या प्रत्येकाचेच विचार, वर्तन आणि व्यवहार हे स्वतः पुरते मर्यादित न ठेवता इतरांच्या उणिवा दूर करून, त्यांच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याच्या कामी यायला हवेत. अनेकदा भूतकाळातल्या आठवणी आपल्याला स्वस्थ बसू देत नाहीत; तर काहीवेळा भविष्याची चिंता, काळजी आपल्याला काही सुचू देत नाही. कितीही ठरवले आणि काहीही केले, तरीही आपण मात्र ह्याच दुष्ट्चाक्रांत अडकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**विधीचे विधान | ज्ञाना-तुका ||**

नाद ब्रह्म नाम | अन्य नाही कोठे ||
अंतरी हा भेटे | ॐकारात ||१||
नाभी स्थानी वसे | ब्रह्मरूप त्याचे ||
परावाणी वाचे | प्रगटतो ||२||
निर्गुणाचे रूप | सगुण सांगते ||
संतवाणी गाते | अभंगात ||३||
पूर्व संचिताने | लाभतो हा छंद ||
दिंडीचा आनंद | तेचि ब्रह्म ||४||
नामावीन दुजे | नाही रे साधन ||
विधीचे विधान | ज्ञाना-तुका ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी

**अनन्तं महिमानं ते ज्ञातुं न शक्यते खलु | अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ३० || तुझा महिमा अपरंपार आहे. तो कोणी जाणून घेऊ शकत नाही. अशा तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**क्षय होय अन्तर वासना, तब पूरण वैराग ।
नहिं तो अन्तर राग है, चाह विषय रस जाग
।।३०।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय)
०४/०६/३०. मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
अंतर-वासनेचा क्षय झाल्यावरच पूर्ण वैराग्य प्रगट होते. जेव्हा अंतरात आसक्ती , विषय-भोगाची इच्छा टिकून आहे, तेव्हा त्याच्या प्राप्तीसाठी इंद्रिये संधी मिळताच सचेष्ट होतात. म्हणून चित्तातून वासना समूळ नष्ट झाल्यावरच पूर्ण आणि पवित्र वैराग्य आत्म्यात प्रगट होते. वासनांचे संस्कार योगाद्वारेच नष्ट होतील आणि आत्मा अंतर्मुख होऊन अध्यात्म क्षेत्रातील या उच्च प्रगतीला पार करून आपल्या लक्ष्य प्राप्तीसाठी अग्रेसर होईल.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

# संत जनाबाई


आधुनिक केसरी

शेकडो वर्षे महाराष्ट्राच्या मुखात दोन संतांचे अंभंग खडीसाखरेप्रमाणे घोळतायत. आणि ते म्हणजे संत तुकोबाराय आणि संत जनाबाईंचे गोड अभंग.पंढरीची सावळी विठाई म्हणजे दीनदुबळ्यांची आई. सुखदुःख जाणून घेणारी माऊली. अनाथ जनी असा या विठाईच्या नावाने टाहो फोडते. या विठाईची वाट पाहून जनाई व्याकूळ होते.पांडुरंगाच्या देवळासमोरच झोपडीत राहणाऱ्या गरीब जनाबाईने देवाच्या गळ्यातले पदक चोरले, असा आरोप तिच्यावर होतो. मग आपण सोन्यानाण्याची नव्हे तर विठुरायाची चोरी केली आणि त्याला हृदयात बंदिस्त केल्याचे ‘धरिला पंढरीचा चोर’ या अभंगातून ती सांगते. ‘माझे अचडे बचडे छकुडे गं राधे रुपडे’ सारखे तिचे श्री विठ्ठलाच्या बाळरुपाचे वात्सल्याने ओतप्रोत भरलेले अभंग तर अप्रतिम ठरलेत. नीची भक्ती म्हणजे रोजचं काम करता करता देवाचं नाव घेणं. ‘दळीता कांडिता तुज गाईन अनंता’ हे तिचं तत्वज्ञान खेडोपाड्यातील अडाणी माणसांनाही आपलं वाटतं आहे. जनीनं दाखवलेला‘ लेकुरवाळा विठूराया’संसारात रमलेल्या, मुलंबाळं सांभाळणा-या आयाबायांना नेहमीच भावलेला आहे.‘ नाम विठोबाचे घ्यावे मग पाऊल टाकावे’ हा जनाबाईचा अभंग गात वारकरी पंढरीची वाट चालतात. परभणी जिल्ह्यातील गोदावरीच्या तीरावरील गंगाखेड हे जनाबाईंचे गाव होय. तिच्या वडिलांनी जनाबाईंला नामदेवांचे वडील दामाशेट शिंपी यांच्याकडे नोकरीसाठी पाठवले. तेव्हापासून त्या संत नामदेव यांच्या कुटुंबीयांतील एक घटक बनल्या. त्या स्वतःला नामयाची दासी म्हणवून घेत असत. जनाबाईंचा जन्म परभणी येथील गंगाखेड येथील दमा नावाच्या विठ्ठलभक्ताच्या घरी झाला. जनाबाईंच्या एका अभंगातील “माझ्या वडिलांचे दैवत| तो हा पंढरीनाथ ||” या ओळींवरून त्यांचे वडील दमा हेदेखील वारकरीअसावेत, अशी शक्यता दिसते. त्यांच्या आईचे नाव करुंड. त्याही भगवद्भक्त होत्या. संत जनाबाई या संत कवयित्री म्हणून जनमानसात लोकप्रिय आहेत. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून स्त्रिया जात्यावर दळण दळताना, कांडताना त्यांच्या ओव्या गातात. अतिशय सामान्यातली सामान्य, अशी जनाबाईची ओळख. पण आयुष्यभर मोलकरणीचं काम करणाऱ्या या दासीनं एक असामान्य काम केलं. ते म्हणजे, तिनं काळजाचा ठाव घेणारे अभंग लिहिले. आणि मराठवाड्यातल्या गंगाखेडची जनी संत जनाबाई बनली. तत्कालीन खालच्या सामाजिक स्तरातून वर उठून स्वतःचं असं वेगळं अस्तित्व निर्माण करणाऱ्या संत अशी जनाबाईची ओळख. अत्यंत सामान्य जीवनातून अलौकिक अशी यशाची झेप घेणाऱ्या जनाबाईचा जन्म परभणी जिल्ह्यातल्या गोदातीरी असलेल्या गंगाखेडमध्ये झाला. दमा आणि करुंड अशी त्यांच्या आईवडिलांची नावं. हे दोघंही पंढरपूरच्या विठूरायाचे निस्सीम भक्त होते. दोघंही पंढरीची वारी न चुकता करत. जनाबाईंच्या वडिलांनी तिला संत नामदेव यांचे वडिल दामाशेटी यांच्या पदरात टाकलं.

# परमार्थ साधणे हाच आपल्या जन्माचा खरा हेतू

आधुनिक केसरी

द्वैतामध्ये दुःख आहे, तर एकामध्ये सुख आणि आनंद आहे. आपण एकामध्ये राहिलो तर आनंद मिळेल. हे जगत् पुष्कळ भासले तरी ते एकच आहे. प्रपंचाच्या दहा दिशा आहेत, पण परमार्थाची मात्र एकच दिशा आहे; तिच्याकडे आपण लक्ष लावावे. काही न करणे, अर्थात् मनाने हा खरा परमार्थ होय. परमार्थामध्ये उपाधी मुळीच नाही; नाही म्हणजे किती नाही, तर ‘ मी ’ सुद्धा तिथे नाही. प्रपंच हा द्वैत आहे, त्याचे अवडंबर मोठे असणारच. आपल्याला आपल्या जगण्याचा अंतिम हेतू जोपर्यंत कळला नाही, तोपर्यंत प्रपंच करणे हेच ध्येय आपण समजतो. वास्तविक, मनुष्यप्राणी हा देह आणि मन दोन्ही मिळून आहे, म्हणून त्याने ऐहिक आणि पारलौकिक दोन्ही गोष्टी साधल्या पाहिजेत. परमार्थ साधणे हाच आपल्या जन्माचा खरा हेतू आहे. व्यवहारात द्वैताशिवाय आनंद नाही. म्हणून परमार्थात, मानसपूजेत, पहिल्याने ‘ मी ’ आणि ‘ परमात्मा ’ अशा द्वैताने सुरुवात करावी लागते.
जोपर्यंत परमार्थ आपल्या हाडीमासी खिळला नाही, तोपर्यंत आपल्याला वाचनाची गरज आहे. त्यापासून साधनाला जोर येतो. मन भगवंताकडे गुंतविण्यासाठी काय करावे हे पहावे. एक बाप आपल्या मुलाला पोहायला शिकवीत होता. बापाने मुलाला पहिल्याप्रथम घोट्याइतक्या पाण्यात आणले, नंतर ढोपराइतक्या पाण्यात आणले, नंतर थोडे आणखी पुढे आणले; आणि एक दिवस त्याने मुलाला पाण्यात खेचून घेतले. त्याप्रमाणे आपले गुरू आपल्याला परमार्थ शिकवीत असतात. आपण पाण्यात उतरले मात्र पाहिजे. देहाने प्रपंच केला पण तो फळाला येत नाही, म्हणून संतांनी नामस्मरणाचा मार्ग सांगितला. पण आमचे शहाणपण, आमचा अभिमान, नाम घेण्याच्या आड येतो त्याला काय करावे ? हा अभिमान दुसरा कुणी उत्पन्न करतो असे थोडेच आहे ? आपल्या ध्यानातही येत नाही. इतके सूक्ष्म असे वासनेचे बीज आपल्यात कुठे तरी दडलेले असते. त्यामुळे लौकिकाची अभिलाषा सुटत नाही. याकरिता संतांनी एक मार्ग सुचविला आहे, आणि तो म्हणजे, नामस्मरणात राहून विषयाची ऊर्मी उठू न देणे. प्रपंचातली विघ्ने ही सूचनावजा असतात; ती आपल्याला जागे करतात. जन्माला आलो तो भगवंताला ओळखण्याकरिता, हे विसरू नये म्हणून विघ्नांची योजना असते. विघ्ने ही आपण भगवंताच्या जवळ जाण्याकरिताच येत असतात. तेव्हा त्यांना न घाबरता, भगवंताच्या नामांतच स्वतःला विसरून जावे, हाच परमार्थाचा सोपा मार्ग आहे.
आजचे बोधवचन आहे ---- १६४. जेथे आळस माजला, तेथे परमार्थ बुडाला. श्रीराम समर्थ





राजर्षी शाहू महाराज : विषमतेविरुद्धचा आदर्श शासक

पान ६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

सोमवार, २६ जून २०२३



प्रत्येकाच्या आयुष्याची एक स्टोरी असते...

पान ८


# 'लावणी सम्राज्ञीवर भीक मागण्याची वेळ' हे महाराष्ट्राचे दुर्दैवच!

## उपेक्षा थांबविण्याची गरज; आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांच्या सडेतोड प्रतिक्रिया

आधुनिक केसरी जनचर्चा



आधुनिक केसरी

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्राच्या लावणी सम्राज्ञी शांताबाई कोपरगावकर (वय 75) काल रस्त्यावर भीक मागत असतानाचा व्हिडिओ समाज माध्यमावर प्रसारित झाला आणि लोककलावंताची दाहकता पुन्हा उजेडात आली. एकेकाळची लावणीसम्राज्ञी राहिलेल्या आणि जिच्या अदाकारीने लालबाग परळचं हनुमान थेटर गाजले, त्यांच्या सौंदर्याने आणि अदाकारीने तमाशा रसिक घायाळ झाले. ,त्या लावणीसम्राज्ञीवर भीक मागण्याची वेळ येते हे महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल. अशा अनेक लोककलावंतावर आज आलेली वेळ बघून याविषयी प्रचंड दाहकता समोर येत आहे. हे पाहून समाजमन हळहळले. म्हणूनच लोककलावंत आपल्या लोकसंस्कृतीचे उपासक आहेत. त्यांची उपेक्षा थांबली पाहिजे आणि त्यांच्या कलेची दखल समाज आणि सरकारने घेतलीच पाहिजे अशी ठोस भूमिका आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांनी सडेतोडपणे मांडली.

### कलावंत, विचारवंत, साहित्यिक, शास्त्रज्ञ समाजाची संपत्ती

शरीर संपदा, बौद्धीक संपदा, भावनीक संपदा आणि वैचारीक संपदा असं कुठवरही च-हाट वळता येईल परंतू कला, मग त्या ललीत कला असोत नाही तर लोककला... ही आपली संपत्ती आहे आणि आपण ती जिवापाड जपली पाहिजे, जतन केली पाहिजे आणि पुढिल पिढ्यांच्या विकासासाठी हस्तांतरीत केली पाहिजे या बद्दल प्रचंड निराशेचं वातावरण आहे. समाजात सगळे आहेत.स्वार्थी, निस्वार्थी यातला निस्वार्थ कधीही मौलिकच.आयुष्यभर एखादी कला संपादन करायची, अंगभूत असेल तर विकसीत करायची आणि आयुष्याच्या अंताला काय तर निराशा,झाडाझडती. समाजानं कलांमधे केलेली आवडा निवड ही वर्णव्यवस्थेवर केली आणि कांही कला ज्या गावकुसाबाहेरील माणसांनी निर्माण केल्या, विकसीत केल्या, समाजमन परिवर्तनाच्या, सर्वांगीन विकासाच्या बाजूनं व्हावं असे जिवापाड प्रयत्न केले.ना त्या कलांचा खराखुरा गौरव झाला ना त्या कलावंतांचा मानसन्मान.त्यामुळं लोककला कायम दुय्यम स्थानी राहिल्या. पंच्याहत्तर वर्षाच्या महाराष्ट्राच्या लावणी सम्राज्ञी शांताबाई कोपरगावकर यांच्यावर भीक मागण्याची वेळ यावी हा महाराष्ट्राच्या कला विश्वाला लज्जीत करणारी गोष्ट आहे.ज्या कलावंतांनी आपलं आयुष्य कलेसाठी वाहून घेतलं त्या कलावंतांचं म्हातारपण हे असं अवहेलनाग्रस्त व्हावं, ही मोठी वंचना आहे.सुसंस्कृत समाजमन ही समाजाची संपत्ती असते आणि ती जतन करण्याचं तिला जपण्याचं काम एकुनच गणगोताचं जसं आहे तसंच ते त्या मातीच्या शासनव्यवस्थेचंही आहेच.अशा निराधार कलावंतांची जिव्हाळ्यानं विचारपूस व्हावी,पोटा-पाण्याचा प्रश्न सुटावा ही दै. केसरीची तळमळ समाजऋण माननारी आहे.या लावणी सम्राज्ञीची पोटासाठीची अवहेलना संपो. हा प्रश्न ऐरणीवर आणल्याबद्दल दै. आधुनिक केसरीस धन्यवाद..!



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

### कलावंतांनी आर्थिक नियोजन करावे...

कलावंतांचा चलतीचा काळ असतो. तेव्हा पुढील आयुष्य सुखा समाधानात जावे त्यासाठी आलेल्या पैशाची बचत करावी. विमा काढावा, घर, प्लॉट विकत घेऊन ठेवावा हे न कळाल्यामुळे आणि अशा प्रकारचे योग्य मार्गदशन कोणी न केल्यामुळे जुन्या काळातील अनेक नामवंत कलाकारावर ही वेळ आलेली आहे. लावणी सम्राज्ञी शांताबाई कोपरगावकर यांच्यावरती ही आलेली वेळ तशीच वेळ आहे. या लोकप्रिय कलावंतांची आजची ही अवस्था मनाला प्रचंड खिन्न करणारी आहे. सध्याच्या कलावंतांनी यापासून काहीतरी बोध घेतला पाहिजे व आपल्या पुढील आयुष्यासाठी आर्थिक नियोजन केले पाहिजे. कलेच्या जोरावरती कलावंताची सध्याची वाटचाल सुरू राहते. परंतू उतार वयात अनेक उपेक्षांना सामोरे जावे लागते. त्यासाठी अशा उपेक्षा होऊच नये याची ठोस निर्णयाची गरज आज निर्माण झाली आहे. मी 25 वर्षांपासून विमा क्षेत्रात काम करतो आहे. संपर्कातील अनेक कलावंतांना सांगून थकलो पण हे कलावंत स्वतःचा विमा काढत नाहीत हे खूप दुर्देवी आहे. ज्या कलावंतांनी कलेसाठी जीवनभर वाहून घेतलं त्या कलावंतांचे उरलेले दिवस हे असे हालाखीत जावेत ही मोठी शोकांतिका आहे.



डी. के. शेख
संपर्क क्र. : 8999860901

### कलावंतांची कदर शासनाने करायला हवी

आज भारताने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केली आहे. त्या प्रगतीमध्ये याच भारत देशातील साहित्यिक, कलावंत, लोकशाहीर, विचारवंत अशा विविध कलावंतांचा फार मोठा वाटत असतो. खरे तर हे कलावंत देशाला घडवण्याचे आणि आकार देण्याचे कार्य करत असतात. समाजातील जे जे विकार आहेत ते नष्ट करण्यासाठी आपल्या कलेतून, विचारातून ते नेहमी प्रयत्न करत असतात. त्यामुळे देशातील समाजातील लोकांवर, तरुणावर त्यांच्या कलेतून, लेखनातून, बोलण्यातून आणि कार्यातून संस्कार होत असतात. अशा संस्कारातूनच समाजमने घडत असतात. त्यामुळे अशा कलावंताची नेहमीच समाजाने आणि विशेषता शासनाने कदर करायलाच हवी. पण हल्ली शासन मात्र वास्तव तिकडे आणि कलावंताच्या चांगुलपणाकडे, कार्याकडे आणि कलावंताकडे दुर्लक्ष करत आहे. महाराष्ट्राच्या लावणी सम्राज्ञी शांताबाई कोपरगावकर यांच्यावर जी भीक मागण्याची वेळ आली ती खरंतर अत्यंत वाईट आहे. या महाराष्ट्राच्या इतिहासाला आणि माणुसकीला काळीमात असणारी गोष्ट आहे. ज्यांना मात्र काडीचेही कळत नाही अशांचा उदो उदो केला जातो हे वाईट आहे. हे सगळ्यात क्षेत्रात घडताना दिसत आहे. जे पात्र आहेत त्यांना संधी दिली जात नाही व जे पात्र नाहीत पण शासनात, राजकारणा धबधबा आहे त्याला मात्र सर्वस्व मिळताना दिसत आहे. अशी माणसे समाजमन गढूळ करताना दिसत आहेत. म्हणून ज्याने देशाला, समाजाला घडवलं आहे. त्यांनी आपल्या कलेतून सेवा केली आहे. संस्कार दिले आहेत. मनोरंजनातून माणूस घडवला. अशांना कदापिही विसरता कामा नये. त्यांची हेळसांड होता कामा नये.



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

### मदतीचा हात द्या...

आदिम काळापासून रूजलेली लोककला हे आपल्या महाराष्ट्राचे वैभव आहे.सांस्कृतिक क्षेत्रात लोककलेला अन्यन साधारण महत्व राहिले आहे. लोकरंजनातुन कलावंतांनी सामाजिक परिवर्तनाचे बिजारोपन केले आहे. राजेरजवाड्यात बैठकीची लावणी रूजली, कालांतराने रसिकराजाच्या मनावर अरूढ झाल्याने गल्लीपासून ते दिल्ली पर्यंत ठसकेबाज लावणी अनेकांना चटका लावून गेली.मधल्या काळात लोपपावत गेलेल्या लावणीला खतपाणी घालून सुरेखा पुणेकरांनी अच्छेदिन खेचून आणल्याने लावणी मनामनात चांगलीच ठसली आहे. यापूर्वी लावणी सम्राज्ञी शांताबाई कोपरगावकर यांनी लावणीच्या ठेक्यावर रसिकांना घायाळ केले. शासनस्तरावर अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले. राष्ट्रपतीच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला, अशा महान कलावंतावर आज बिकट परिस्थिती आली. चक्क रस्त्यावर उतरून त्या दयेची भीक मागत आहेत. ही फार मोठी शोकांतिका आहे. आता गौरव करणारे कुठे गेले. समाजही थारा देत नाही. आप्तस्वकीयही आसरा देण्यास तयार नाहीत. अशा महान कलावंतावर उपासमारीची वेळ आली हे दुर्दैव म्हणावे लागेल. यातुन त्यांना सावरण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तीनी मदतीचा हात पुढे करून दिलासा देणे गरजेचे आहे.



बाबुराव पाटील
भोकर जि. नांदेड

### एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ

एका लोकप्रिय लावणी सम्राज्ञीवर भीक मागण्याची वेळ येते ही खूप दुःखद बाब आहे. खास करून महाराष्ट्रात लोकसंगीत आणि लोक कलाकारांना जीवनाच्या उत्तरार्ध काळासाठी कशी तरतूद करावी ह्याचा विचार नाही किंवा कोणी मार्गदर्शन करीत नाही. आणि ह्या कलाकारांचे कॉन्ट्रॅक्टर ह्यांना स्वतःहून मार्गदर्शन करत नाहीत. फक्त ह्यांचे कार्यक्रम आणि शिबीरे करायची आणि थातूरमातुर बिदागी देऊन सर्व पार पाडायचे. माझी सर्व लोककलाकारांना विनंती आहे की, जरा आपल्या चाकोरीच्या बाहेर पडा. वेळीच सावध व्हा. वादकांचे मनगट ढिल्ले झाले की, गायिकेच्या गळ्यात कंपन आले की, आणि नृत्यांगनाच्या चेहेऱ्यावर सुरकुती आली की आपले कोणीही नसते. त्यावेळी समाज आणि सरकार कोणीही मदतीला येत नाही. कलावंतांनी व्यसनापासून लांब राहिले पाहिजे. शक्य आहे की निदान एवढे तरी जास्त वाईट दिवस येणार नाहीत. शेवटी एकच सांगतो... एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ



विजय चव्हाण
9819007066

### लोककलावंतांना जगविणे ही आमची जबाबदारी

लोककलावंत जगविणे ही समाज आणि शासनाची खऱ्या अर्थाने गरज आहे.ज्या लोककलावंतानी आयुष्यभर कलेची सेवा करून या मातीतील लोकांची मने रिझविली आणि मागील कित्येक पिढ्यांपासून महाराष्ट्रात सुरू असलेली लोककलेची जोपासना करून तिला जगविले असे कलावंतच जर आपल्या आयुष्याच्या संध्याकाळी असे रस्त्यावर उतरून भीक मागण्याच्या अवस्थेला पोहचत असेल तर ही निश्चितच लाजिरवाणी बाब आहे. समाज आणि शासन अशा लोककलेच्या उपासकाकडे केवळ एक भिकारीण म्हणून पाहत असेल तर खरे करंटे कोण ? माणूसकी या शब्दाशी आमचा काय संबंध ? शांताबाईवर अशी रस्त्यांवर भीक मागून जगायची वेळ का आली असावी ? रक्तातील नात्यातल्या लोकांनी तिला असे वाळीत टाकल्यासारखे जगणे जगायला का भाग पाडले ? आता तिचे पुढे काय होणार ?तिच्या जगण्याची भविष्यातही अशीच वाताहत कायम राहणार काय ? असे अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात. कधी काळी आपल्या मनमोहक अदाकारीने आणि नृत्यांनी लालबाग परळचं हनुमान थेटर गाजविणारी महाराष्ट्राची सुप्रसिद्ध अशी लावणीसम्राज्ञी शांताबाई कोपरगावकर या आज मात्र वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षी निराधार होऊन, भीक मागून उपजीविका करतात. हे आपले आणि आपल्या महाराष्ट्र शासनाचे दुर्दैव आहे की अशा पिढीजात कलावंताची कदर करण्यास आणि त्यांच्या अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासारख्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी काहीही उपाययोजना करण्यास कमी पडतो. खरे तर शासनाने असे निराकार कलावंत जिल्ह्याजिल्ह्यातून शोधून काढावे आणि त्यांना आयुष्याच्या उत्तरार्धात सुखासमाधानाने कसे जगविता येईल यासाठो प्रयत्न करायला हवेत. मात्र प्रत्यक्षात असे होताना दिसत नाही. ज्यांचा लोककलेशी काहीही संबंध नाही अश्यांना सरकारी यंत्रणा मदत करते मात्र ज्याला खऱ्या अर्थाने गरज आहे तो सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहतो. शांताबाईसुद्धा याच दुर्दैवी देशातील वंचित राहिलेल्या एक सच्च्या कलावंत आहेत. तेव्हा त्यांच्या बाजूने भक्कमपणे उभे राहून त्यांना सन्मानाने जगण्याच्या प्रवाहात आणणे ही खरे तर आम्हा सगळ्यांची जबाबदारी ठरते.



डॉ. अनंता सूर
९४२१७७५४८८

### अशी वेळ कलाकारांवर येऊ नये...

लोकप्रिय कलावंत भीक मागताना बघून खूपच अस्वस्थ वाटले. अशी दुर्दैवी वेळ कोणत्याच कलाकारावर येऊ नये असे मला वाटते. पण याला कलाकारच थोडेफार जबाबदार आहेत असे मी म्हणेन. कारण सगळ्याच कलावंतांनी जे कमावलं ते नीट जपून ठेवलं तर म्हातारपणात त्याचा उपयोग होतो. पण मिळालेल्या पैशाची लगेच उधळपट्टी केली तर भविष्याची तरतूद काय राहणार ? तर सांगायचे तात्पर्य हे की ही वेळ कोणत्याही कलाकारावर येऊ शकते. म्हणून जे कमावले त्याला व्यवस्थितरित्या ठेवले तर अशी वेळ येत नाही असं मला वाटते.



वर्षा संगमनेरकर
7720006645



# वॅग्नरची माघार

आधुनिक केसरी

शनिवारी सकाळीच रशियात वॅग्नर या पुतिन यांच्या समांतर सैन्यगटाने बंड केले. या गटाचा प्रमुख प्रिगोझिननं थेट पुतिन यांनाच आव्हान देत मॉस्कोच्या दिशेनं सैन्याला आगेकूच करण्याचे आदेश दिले. त्यामुळे रशियात खुद्द पुतिन यांना आजपर्यंतचे सर्वात मोठे आव्हान आणि धोका निर्माण झाल्याचं चित्र निर्माण झाले. वॅग्नर ग्रुपचे सैनिक रशियातील वेगवेगळ्या शहरांमधून मार्च करत ती शहरं ताब्यात घेतल्याचा दावा करत होते. या पार्श्वभूमीवर रशियात विध्वंस होण्याची शक्यता निर्माण झाली. मात्र, त्याआधील बेलारूसच्या राष्ट्राध्यक्षांच्या मध्यस्थीने तोडगा निघाला आणि पुढील सर्व गोष्टी टळल्या. मात्र, दोन्ही बाजूंनी नेमका कोणत्या अटींवर तह झाला? प्रारंभी या बंडामध्ये जे जे गुंतले असतील, त्या सर्वांना शिक्षा करण्याची आक्रमक भाषा करणारे पुतिन या तहामध्ये काहीशी मवाळ भूमिका घेताना दिसले. बंड करणाऱ्या वॅग्नर ग्रुपला किंवा त्या ग्रुपचा प्रमुख प्रिगोझिनला देशद्रोह किंवा इतर कोणत्याही कायदेशीर कारवाईपासून अभय देण्यास पुतिन यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे आता हा ग्रुप आणि स्वत: प्रिगोझिन रशियातून निर्भयपणे आपल्या तळावर परतू शकतो. रशियामध्ये रक्तपात आणि अंतर्गत लढा होऊ नये हेच पुतिन यांचं सर्वोच्च ध्येय होते. म्हणून त्यांनी प्रिगोझिन आणि त्याच्या सैन्याला जाऊ दिले, असे स्पष्टीकरण पुतिन सरकारकडून देण्यात आले आहे. बेलारूसचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर ल्युकाशेंको हे पुतिन यांचे जवळचे मित्र मानले जातात. बेलारूसमध्ये आपल्या सरकारची पकड घट्ट करण्यासाठी ल्युकाशेंको यांना पुतिन यांनी सर्व मदत केली आहे. त्यामुळेच ल्युकाशेंको हे युरोपमधले आत्तापर्यंतचे सर्वाधिक काळ राष्ट्राध्यक्षपदी राहिलेले व्यक्ती ठरले आहे. बेलारूसमध्ये १९९४पासून ल्युकाशेंकोच राष्ट्राध्यक्षपदी आहेत. रशियातील या सर्व वादात सुरुवातीपासूनच ल्युकाशेंको यांनी पुतिन यांच्या बाजूने भूमिका मांडली होती. अखेर वॅग्नर ग्रुप वेगाने मॉस्कोच्या दिशेने सरकत असल्याचं पाहाता ल्युकाशेंको यांनी या वादात मध्यस्थीची तयारी दाखवली. त्यानुसार, पुतिन यांच्या सहमतीने ल्युकाशेंको यांनी प्रिगोझिनशी वाटाघाटी सुरू केल्या. दरम्यान, ल्युकाशेंको यांनी जाहीर केलेल्या निवेदनानुसार, शनिवारी सकाळीच त्यांनी पुतिन यांच्याशी या सर्व वादावर चर्चा करून प्रिगोझिनशी चर्चा करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. एकीकडे वॅग्नर ग्रुपचे सैनिक मॉस्कोच्या दिशेने मार्च करत असताना दुसरीकडे प्रिगोझिन ल्युकाशेंको यांच्याशी रशियातील संभाव्य परिस्थितीबाबत वाटाघाटी करत होता. शनिवारी दिवसभर या वाटाघाटी चालल्याचे ल्युकाशेंको यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. वाटाघाटी झाल्यानंतर ल्युकाशेंको यांनी जाहीर केलेल्या निवेदनात प्रिगोझिन सैन्य माघारी घेण्यास तयार झाल्याचे म्हटले आहे.

# 'वोट फॉर पेन्शन'

आधुनिक केसरी



डॉ. मारोती तेगमपुरे
संपर्क क्र. ९४२३९९३१३७

**कर्मच्याऱ्यांस दिले जाणारे निवृत्ती वेतन सरकारकडून दान / बक्षीस म्हणून दिले जात नाही तर कर्मचारी म्हणून तो त्याचा अधिकार होय. सर्वोच्च न्यायालय (डी.एस. नकारा विरुद्ध भारत सरकार १७/१२/१९८२ एआयआर १९८३ एससी-१३०.) महाराष्ट्र राज्यात एक नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्व आस्थापनेतील कर्मचारी बांधवाना १९८२ ची जुनी निवृत्ती वेतन योजना बंद करून पारिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना (डिसीपीएस) आता राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) लागू करण्यात आली आहे. ज्यास नॅशनल पेन्शन स्कीम, न्यु पेन्शन स्कीम असे म्हटले जाते. आम्ही याचा उल्लेख नो पेन्शन स्कीम असा करतो. असा उल्लेख आम्ही का करतो हे समजून घेतले पाहिजे.**

अगदी ढोबळ पध्दतीने समजून घ्यायचे झाले तर, नोव्हेंबर २००५ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी वर्गाला त्यांच्या निवृत्तीनंतर शेवटच्या महिन्याच्या मूळ वेतनाच्या पन्नास टक्के व प्रचलीत महागाई भत्ता इतके निवृत्तीवेतन म्हणून दरमहा अदा केले जाते.ज्यास आपण राष्ट्रीय/नवीनपेन्शन योजनेत दरमहा संबंधित कर्मचारी दरमहा आपल्या वेतनाच्या दहा टक्के इतकी रक्कम या एनपीएस खात्यात जमा करतो. शासनही इतकीच रक्कम ( आता चौदा टक्के ) या खात्यात जमा करते. सेवाकाळात जमा होणाऱ्या या एकूण रक्कमेवर प्रचलित व्याजदर दिला जातो. कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतर या जमा झालेल्या एकूण रक्कमेपैकी ६० टक्के रक्कम संबंधितास रोखीने दिली जाईल तर उर्वरित ४० टक्के रक्कम शेअर बाजारात गुंतवणूक करून त्यावरील लाभांश हा निवृत्तीवेतन म्हणून दिली जाईल. हा लाभांश कोणत्या महिन्यात किती असेल हे कुणीही सांगू शकणार नाही. शेअर बाजार कसा खाली-वर जातो हे वेगळे सांगायला नको.( बायर्स आणि बुल्स यावर स्वतंत्र लिहिता येईल. ) अलीकडील अनुभव असा आहे की, ज्या कर्मचाऱ्यांना प्रतिमहा साठ हजार रुपये इतके वेतन प्राप्त होत होते. अशा कर्मचारी बांधवांना त्यांच्या निवृत्तीनंतर कधी अकराशे तर कधी सतराशे रुपये इतके ( लाभांश रूपाने ) निवृत्तीवेतन मिळाले आहे. म्हणून आम्ही यास 'नो पेंशनस्कीम' असं म्हणतो. आमचे हे मत एकूणच सामाजिक अनुभवावरून सिद्ध झाले आहे. पृथ्वीतलावर आलेला प्रत्येक व्यक्ती स्वतःचे व स्वतःच्या कुटुंबातील सदस्यांचे आयुष्य अधिक सुखकर व्हावे यासाठीच काम करीत असतो उत्तरकाल समाधाने जगता यावा यासाठी प्रयत्न करीत असतो. परंतु एनपीएस च्या माध्यमातून सर्व काही अनिश्चिततेकडे जाणारे असून देशातील एक कोटी पेक्षाही अधिक संख्येने असलेला हा वर्ग चिंताग्रस्त आहे. यामुळे तो जुनी निवृत्ती वेतन योजनाचं पदरात पडून घेण्यासाठी संघर्षरत झाला आहे. महाराष्ट्रातील हा वर्ग मोठ्याप्रमाणात अगोदरच रस्त्यावर उतरला आहे. मागील सात-आठ वर्षापासून विविध आंदोलनाच्या माध्यमातून शासनास जुनी निवृत्ती वेतन योजना बहाल करावी म्हणून आग्रहाने मागणी करतो आहे. यामध्ये आमदार/खासदार/मंत्री महोदयांना निवेदन देणे, ट्विटर मोहीम चालवणे, मेल मोहीम राबवणे, काळ्या फिती लाऊन काम करणे, हजारोच्या संख्येने मुंडन करून आपल्या भावना प्रकट करणे, कल्याण ( बडगा ) ते विधान भवन लॉंगमार्च ( साधारणपणे ६०-७० किलोमीटर ) काढूनसरकारचे लक्ष वेधून घेणे. सर्वात महत्वाचे म्हणजे २७ डिसेंबर २०२२ रोजी लाखोच्या संख्येने नागपूर येथे हिवाळी अधिवेशनावर अठरा किलोमीटरचा मोर्चा काढून सरकारला कुटुंब निवृत्ती वेतन योजना तथा उपदान देण्याचा निर्णय घेण्यास भाग पाडून दरम्यानच्या कालावधीत मयत झालेल्या जवळपास तीन हजार सहाशे कर्मचारी बांधवांच्या कुटुंबियांना आधार देणे. सर्व संघटनांना सोबत घेऊन जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष श्री. वितेश खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली आजवर झालेल्या आंदोलनाची ही फलश्रुती आहे. मुद्दा येथे संपत नाही तर सुरु होतो. हे जुन्या पेन्शनचे आंदोलन पुढे घेऊन जात असताना 'नो पेन्शन नो वोट', 'जो पेन्शन की बात करेगा- वही देश पे राज करेगा'चा आंदोलकांनी नारा दिला व हा नारा राज्यभर/ देशभर पोहचला. ज्यांचा खऱ्या अर्थाने देशभर जुन्या पेन्शनला विरोध आहे. तेही निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन 'जुनी पेन्शन देण्याची धमक फक्त आमच्यातच आहे.' अशी दिशाभूल करणारी मांडणी करू लागले. निवडणुका संपल्या की टांग उपर हे धोरण बाळगू लागले आहेत. म्हणून आता नव्याने विचार करून, चिंतन करून, पदरात पडलेल्या अनुभवावरून आता ठाम भुमिकेसह पुढे जावे लागेल. आता आपणास म्हणावे लागणार आहे. 'जो पेन्शन बहाल करेगा वही देश मे राज करेगा', 'पेन्शनसाठी मतदान' म्हणजे वोट फॉर पेन्शन. ही मांडलेल्या अर्थसंकल्पाचा दाखला देत त्यांचे यासंदर्भातील खोटेपण दाखून दिले पाहिजे. उदा. देशातील निवृत्ती वेतनावर होणारा खर्च हा होणाऱ्या एक रुपये खर्चापैकी फक्त चार पैसे इतका आहे, तर महाराष्ट्र राज्याचा हा खर्च अकरा टक्के इतका आहे. दुसऱ्या बाजूस देशातील बड्या कार्पोरेट कंपन्यांना प्रोत्साहन ( कंपन्यांना करण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीस प्रोत्साहन तर शेतकऱ्यांच्या अनुदानास रेवडी अस म्हणून जगाच्या पोशिंद्या असलेल्यांची अवहेलना करतात. ) तथा करातसूट दिल्यामुळे १,०३,२८६ ( एक लाख तीन हजार दोनशे शहांशी ) करोड रुपये इतक्या उत्नापासून देशाला मुकावे / पाणी सोडावे लागले आहे. ही रक्कम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी करण्यात आलेल्या तरदुतीपेक्षा




भूमिका आपणास पार पाडावी लागणार आहे. यासाठी जात, धर्म, प्रांत यासारख्या अस्मिताकेंद्रीत भूलथापांना बाजूला सारून आपल्या अस्तित्वाची, म्हातारपणाच्या आर्थिक काठीची लढाई लढावी लागणार आहे. त्याकरिता आपल्या कुटुंबातील सदस्यांना, आपल्या संपर्कात / प्रभावक्षेत्रात येणाऱ्याना या विषयाचे महत्व समजून सांगावे लागेल. त्यासाठी नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्व आस्थापनेतील बांधवांना सजग व्हावे / करावे लागेल. आपआपल्या ठिकाणी प्रत्येकास कार्यकर्ता म्हणून स्वतःच जबादारी स्वीकारावी लागेल, लोकांचे उदबोधन, प्रबोधन करावे लागेल. यासोबतच आपल्या परिक्षेत्रातील लोकांच्या मुलभूत प्रश्नासाठीच्या लढ्याचा भाग होऊन आपल्यासोबतच त्यांचेही जीवन सुखकर करण्यासाठी, त्यांच्याही आयुष्यात आनंदाचे क्षण घेऊन येण्यासाठी प्रयत्न करावे लागतील तरच ही लढाई अधिक जोरकसपणे आपणास पुढे घेऊन जाता येईल / जावी लागेल.

याबरोबरच पेन्शनच्या विषयाला घेऊन दिशाभूल करणाऱ्या मांडणीचा वास्तव परिस्थिती मांडून प्रतिवाद करावा लागेल. उदा. वेतन आणि निवृत्ती वेतनावर ४० ते ६० टक्के इतका खर्च होतो. अशा प्रकारच्या आकडे फुगवून केलेल्या मांडणीस आर्थिक पहाणी अहवालाचा / अर्थमंत्र्यांनीचं थोडीशी जास्तच आहे.त्यामुळे आपणास भ्रमित करणाऱ्या शक्तीपासून सावध व्हावे लागेल व उपरोक्त सर्व मुद्यांचा विचार सजग नागरिक म्हणून आपणासच करावा लागणार आहे. कारण लोकशाहीमध्ये फक्त विवेकीपने मांडलेल्या संघटीत लोकांचेच प्रश्न सुटत असतात.

आजमितीस तरी राज्यातील लोकांच्या जीवनमरणाचे प्रश्न सोडून सातत्याने पन्नास खोके-एकदम ओके /बोके याचीच चर्चा अधिक जोरकसपणे करण्यात सर्वानाच रस दिसतोय. वाढती महागाई, बेरोजगारी, दारिद्य्र, उपासमार, पेन्शनचे खाजगीकरण, पर्यावरणीय असंतुलन, बोकाळत जात असलेली हडेहप्पी प्रवृत्ती, वाढती विषमता, विभागनिहाय असंतुलित विकास, खालवत जात असलेला मानव विकास,या आणि इतर जगण्याशी संबधित असलेल्या महत्वपूर्ण बाबीचं धोरणकर्त्यांना विस्मरण झाल्याचे जाणवत आहे. आता याचे स्मरण करून देण्याची जबाबदारी आपली आहे. नव्हे ते आपले कर्तव्यच आहे. कोणतेही कार्य कठीण/अशक्य नसते. गरज आहे ती मजबूत दृढनिश्चयाची आणि ते पूर्ण करण्यासाठीच्या कार्यसिद्धीची, यासंदर्भात दुष्यंतकुमार म्हणतात...

**"कौन कहता है आसमाँ में सुराख नहीं हो सकता,**
**एक पत्थर तो तबीयत से उछालो यारों"**


# वर्तमानाची 'कोंडी' फोडणारा साहित्यिक

आधुनिक केसरी

**कादंबरीकार रवींद्र शोभणे यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील खरसोली या गावी झाला. खरसोलीच्या आदर्श विद्यालयातून त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण नरखेड येथे, तर पदव्युत्तर शिक्षण नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून झाले. नागपूर विद्यापीठ, नागपूर येथून त्यांनी 'कादंबरीकार श्री. ना. पेंडसे' या विषयावर प्रबंध सादर करून १९८९ साली पीएच.डी. ची पदवी प्राप्त केली.**

प्रा. डॉ. रवींद्र शोभणे हे सध्या नागपूर येथील धनवटे नॅशनल कॉलेज येथे मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. कथा, कादंबरी, नाट्य, कविता, समीक्षा, ललित, अशा विविध साहित्यप्रकारांत लेखन करणाऱ्या डॉ. रवींद्र शोभणे यांची वयाच्या विसाव्या वर्षी पहिली कविता, पहिला समीक्षात्मक लेख आणि पहिली कथा प्रकाशित झाली होती. सुरुवातीपासूनच वाचनाची प्रचंड आवड असलेले हे व्यक्तिमत्त्व सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय, सांस्कृतिक, प्रांतीय स्थित्यंतरांचा जाणीवपूर्वक अभ्यास करीत, परिस्थितीचे डोळसपणे अवलोकन करीत लेखक म्हणून घडत गेले आणि १९८३ मध्ये वयाच्या चौतिसाव्या वर्षी त्यांची 'प्रवाह' ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली. 'सव्वीस दिवस' सारख्या स्वानुभव कथनात्मक लघू कादंबरी लिहिणाऱ्या रवींद्र शोभणेंच्या लेखणीतून 'उत्तरायण' ही महाभारतावर आधारित बृहद् कादंबरीही आकारास आली आहे. कथालेखक म्हणूनही डॉ. रवींद्र शोभणे परिचित आहेत. १९९१ मध्ये त्यांचा 'वर्तमान' हा पहिला कथासंग्रह मॅजेस्टिक प्रकाशनाने प्रकाशित केला. त्यानंतर १९९४ ते २००८ या काळात त्यांचे 'दाही दिशा', 'शहामृग', 'तद्भव', 'अदृष्टाच्या वाटा' असे पाच कथासंग्रह प्रकाशित झाले.

'कादंबरीकार श्री.ना.पेंडसे', 'सत्त्वशोधाच्या दिशा', 'संदर्भासह' अशी त्यांची समीक्षात्मक पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत. 'कथांजली' आणि 'मराठी कविता परंपरा आणि दर्शन' या दोन पुस्तकांचे संपादन डॉ. शोभणे यांनी केलेले आहे. 'ऐशा चौफेर टापूत' हा त्यांचा ललित लेखसंग्रह २००७ मध्ये प्रकाशित झाला.



१९९२मध्ये प्रकाशित झालेल्या 'कोंडी' या कादंबरीने त्यांना खऱ्या अर्थाने कादंबरीकार म्हणून लौकिक मिळवून दिला. वैदर्भीय प्रादेशिकतेची वैशिष्ट्ये, वैदर्भीय बोली भाषा, तेथील व्यक्तिमत्त्वे, त्यांची स्वभाववैशिष्ट्ये, त्यांचा सांस्कृतिक वारसा, त्यांचे राजकीय डावपेच या सर्वांचे वास्तव चित्रण करीत विलक्षण ताकदीने शोभणे यांनी 'कोंडी'चे कथानक उभे केलेले आहे. त्यांच्या या कादंबरीला अनेक पुरस्कार प्राप्त झाले. त्यांमध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ग.ल.ठोकळ पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा वाङ्मय पुरस्कार असे काही महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या मानवी वास्तवाचा नवस्पर्श लाभलेल्या महाभारतावरील 'उत्तरायण' या बृहद् कादंबरीला वि.सा.संघाचा पु.ल.देशपांडे पुरस्कार, घनश्यामदास सराफ पुरस्कार, महाराष्ट्र फाउण्डेशनचा पुरस्कार हे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत, तर त्यांच्या 'पडघम' या सामाजिक व राजकीय कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा ह.ना. आपटे पुरस्कार प्राप्त झाला आहे. १९७५ ते १९८४ या कालखंडातील महाराष्ट्रीय, तसेच भारतीय समाजजीवनातील ऱ्हासपर्वाचे, विविध राजकीय पक्ष संघटनांचे, आणीबाणीनंतरच्या राजकीय जीवनाचे असे बहुकेंद्री पडसाद 'पडघम' या महाकादंबरीमध्ये उमटलेले आहेत. 'रक्तधृव' या आगळ्या आशयाच्या व विचार प्रवृत्त करणाऱ्या कादंबरीलाही तल्हार स्मृती पुरस्कार व लोकमत पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्यांच्या चिरेबंद' या देशमुख आणि कंपनी, पुणे यांनी १९९५मध्ये प्रकाशित केलेल्या कादंबरीला ग्रंथोत्तेजक पुरस्कार, तसेच रणजीत देसाई पुरस्कार प्राप्त झालेला आहे. डॉ. रवींद्र शोभणे यांना त्यांच्या विविधांगी साहित्यसंपदेची दखल घेणारे अनेक प्रकारचे सन्मान प्राप्त झाले आहेत. २००३मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या पहिल्या युवा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद या युवा साहित्यिकाने भूषविले होते. त्यांना साहित्य अकादमीची प्रवासवृत्ती १९९४ साली प्राप्त झाली. मराठी भाषा साहित्य अकादमीमध्ये सल्लागार सदस्य म्हणून ( २००७ -२०१२ ) ते कार्य करीत आहेत. वास्तवाचे भान ठेवत सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्वच स्थित्यंतरांची वैशिष्ट्ये डॉ. रवींद्र शोभणे यांनी आपल्या कथा-कादंबरी या साहित्यप्रकारांमधून जपली आहेत. सामाजिक परिवर्तनांचे ग्रामीण व नागरी समाजजीवनावर होणारे चांगले व वाईट परिणाम टिपत कथा, कादंबरी, समीक्षा, ललित अशा विविध साहित्यप्रकारांत आकारास आलेल्या त्यांच्या साहित्यनिर्मितीने आपले वेगळेपण जपले आहे. बोलीभाषेच्या संवादशैलीचा गोडवा, कथा-कादंबऱ्यांच्या आशयगर्भाशी एकरूप होत जाणारी संवादांची लयबद्धता, अस्सल वऱ्हाडी भाषेची जाणीवपूर्वक केलेली पेरणी त्यांच्या कथा-कादंबऱ्यांना एक प्रकारचा जिवंतपणा प्रदान करणारी ठरली आहे. म्हणूनच त्यांच्या कथा-कादंबऱ्या वाचकांच्या मनाला मोह घालतात, शेवटपर्यंत बांधून ठेवतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# महाराष्ट्रातही भाजपाचा पराभव करु

## नाना पटोले : कर्नाटकपेक्षा मोठा विजय मिळवू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पक्ष जाती-जातीत, धर्मा-धर्मात वाद घडवून सामाजिक शांतता भंग करत आहे तसेच संघ परिवाराचे लोकही धर्मा-धर्मात वाद लावून दंगे घडवतात आणि त्यात सामान्य जनता मात्र भरडली जात आहे. भारतीय जनता पक्ष म्हणजे भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचार म्हणजे भाजपा असे समीकरण आहे. कर्नाटकात ४० टक्के कमिशन दिल्याशिवाय कोणतेच काम होत नव्हते. कर्नाटकच्या जनतेने भ्रष्टाचारी भाजपाला घरी बसवले, महाराष्ट्रातही शिंदे-फडणवीस सरकार अत्यंत भ्रष्ट आहे, हे भ्रष्ट सरकारही उखडून टाका व काँग्रेसची सत्ता आणा, असे आवाहन कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केले.

सांगली येथील कल्पद्रुम क्रीडांगण मैदानावर महानिर्धार २०२४ शेतकरी संवाद व कार्यकर्ता मेळावा झाला. या मेळाव्यात सिद्धरामय्या बोलत होते. ते पुढे म्हणाले की, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहु महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिशा दिली. डॉ. बाबासाहेबांचे संविधान नसते तर दिनदलित, शोषित, वंचित वर्ग मुख्य प्रवाहात आला नसता, त्याला समान हक्क मिळाले नसते. जातीयवादी भाजपा सरकार मात्र घटनाच बदलण्याची भाषा करत आहे. गोलवलकर, सावरकर यांनी संविधान अस्तित्वात आल्यापासूनच विरोध केला आहे आणि आताही या विचाराचे लोक संविधानाला विरोधच करत आहेत. संविधान राहिले तरच आपले अस्तित्व राहिल म्हणून संविधानाच्या रक्षणासाठी कोणताही त्याग व बलिदान देण्याची तयारी ठेवा.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने २२४ पैकी १३६ जागांवर विजयी मिळवला. कर्नाटकात भाजपा जनतेच्या आशिर्वादाने सत्तेत येत नाही, ते ऑपरेशन कमळ करुन आमदार विकत घेऊन सत्तेत आले होते. कोट्यवधी रुपयांचे आमिष दाखवून भाजपा सत्ता स्थापन करते. काँग्रेसने कर्नाटकात भाजपाचा भ्रष्टाचार घराघरात पोहचवला व भाजपामुक्त कर्नाटक केले. सरकार स्थापन होताच जनतेल्या दिलेल्या ५ आश्वासनांवर २४ तासात निर्णय घेतला. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भाजपा आपल्या देवीदेवतांचाव वापर फक्त निवडणुकीत मते मागण्यासाठी करत असतो आणि निवडणुका होताच याच देवांचा अपमान करतो. कर्नाटकात भाजपाला भगवान श्रीराम व बजरंगबली यांनीच जागा दाखवून दिली. आता आदिपुरुष चित्रपटात भगवान श्रीराम व हनुमानाचा अपमान केला आहे. पंढपूरात जागोजागी पोस्टर लावले आहेत त्यातही पांडुरगांचा अपमान केला आहे. हे सरकार आपल्या दैवतांचा अपमान करत आहे, जनतेचा अपमान करत आहे.पांडुरंगाचा अपमान करणारे बोर्ड तातडीने काढून टाका.

छत्तिसगड, राजस्थान, हिमाचल प्रदेश व कर्नाटकमध्ये काँग्रेस विचारांचे सरकार आहे. या राज्यात शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना राबवल्या जात आहे, नोकरीचे प्रश्न सोडवले जात आहेत. भाजपाच्या राज्यात मात्र नोकऱ्या संपवण्यात आला, आरक्षण संपवले. धनगर समाजाला २०१९ मध्ये आरक्षण देणार होते पण अजून दिलेले नाही. कर्नाटकात जसा भाजपाचा पराभव करुन काँग्रेसची सत्ता आली त्यापेक्षा मोठा विजय मिळवत महाराष्ट्रातही काँग्रेसची सत्ता आणण्याचा आमचा संकल्प आहे. विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, कर्नाटकात काँग्रेसने मोठा विजय मिळवला. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो यात्रा झाली त्याचाही परिणाम कर्नाटकाच्या विजयात दिसून येतो. महाराष्ट्रात असलेले भाजपाचे सरकार काहीही काम करत नाही फक्त घोषणाबाजी, इव्हेंटबाजी, जाहिरातबाजीतून खोटेनाटे दावे केले जात आहे. या खोटारड्या शिंदे-फडणवीस सरकारला आगामी निवडणुकीत धडा शिकवू. जत भागातील पाणी प्रश्नावर कर्नाटक सरकार मदत करणार असल्याचे आश्वासन दिले त्याबद्दल आभारी आहोत पण सीमाभागातील लोकांच्या मनात अन्यायाची भावना निर्माण होणार नाही याचीही काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. सांगलीतील मेळाव्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते माजी मंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, कर्नाटकचे मंत्री एम. बी. पाटील, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, कार्याध्यक्ष बस्वराज पाटील, आ, प्रणिती शिंदे, या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष माजी मंत्री आ. डॉ. विश्वजीत कदम, माजी आमदार मोहनदादा कदम, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व सहप्रभारी आशिष दुआ, प्रदेश उपाध्यक्ष विशाल पाटील, जयश्री पाटील, शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील, सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. विक्रम सावंत, सोलापूर जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह पाटील यांच्यासह राज्यातील काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# गावठी पिस्तुल बाळगणारा तालुका पोलिसांच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मालेगाव येथील मुजाहिद नावाच्या व्यक्तीला गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस सहित अटक केले आहे या कामगिरीबद्दल पीआय शिंदे यांचे वरिष्ठांकडून कौतुक होत आहे व पुढील तपास महादेव गुट्टे यांच्यावर सोपवला आहे. धुळे तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी दत्तात्रय शिंद यांना गुप्त बातमीव्दारा माहीती मिळाली की, मुजाहीद अहमद निसार अहमद हा त्याचे कबज्यात देशी बनावटीचा गावठी कटटा विक्री करण्याच्या उद्देशाने सोबत बाळगुन आर्वी येथे आला आहे. तेव्हा पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांचे गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी सदर इसमांचा आर्वी येथे शोध घेतला असता इसम मुजाहीद अहमद निसार अहमद, हा आर्वी गावातील मुंबई आग्रा रोड जवळील चौकात मिळुन आला तेव्हा त्याचे कडे पोलीसांनी अंगझडती घेतली असता त्यांचेकडे१ ) २५,०००/- रु.कि.चा एक गावटी बनावटीचे पिस्तोल ( गावठी कटटा ) स्टील बॉडी असलेला त्याचे ग्रीफ वर दोन्ही बाजुस काळया रंगाचा स्कुने घट बसविलेला प्लॉस्टीक पटया मॅग्झीन सह ट्रीगर व गार्ड त्यासह त्यात फायरींग पिन शाबूत असलेली पिस्टलचे मॅझीन सह जुवाकीअ. २ )२,०००/-रु. कि. चे दोन जिवंत काडतूसे मुजाहीद अहमद निसार अहमद याचे पॅन्टचे डाव्या खिशात मिळून आले. प्रत्येक काडतुसची किंमत १०००/- रु. असे अ. कि.एकुण २७,०००/- रुपये किमत याबाबत धुळे तालुका पोलीस स्टेशन येथे भाग ६ गु.र.नं. ३६७ / २०२३ भारतीय हत्यार कायदा अधिनियम १९५९ चे कलम ३ व ५ चे उल्लंघन २५ सह मुंबई पोलीस कायदा कलम ३७( १ )( ३ ) प्रमाणे दि.२४.०६.२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे व सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक महादेव गुट्टे हे करित आहेत. सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक संजयजी बारकुंड साहेब, अपर पोलीस अधीक्षक किशोरजी काळे सो, उप विभागीय पोलीस अधिकारी धुळे ग्रामिण विभाग साक्री साजन सोनवणे सो पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांचे पोलीस उपनिरीक्षक अनिल महाजन, पोलीस उप निरीक्षक महादेव गुट्टे, प्रविण पाटील, रविद्र राजपुत, कुणाल पानपाटील, उमेश पवार, मुकेश पवार, राकेश मोरे,रविंद्र सोनवणे, अमोल कापसे, कुणाल शिंगाणे, धिरज सांगळे, कांतीलाल शिरसाठ, प्रमोद पाटील, नितीन दिवसे यांनी केली आहे.



# विहिरीत तरंगताना आढळला आशा वर्करचा मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** गावाजवळील विहिरीत आशा वर्करचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याचा प्रकार मोहाडी तालुक्यातील पालोरा येथे उघडकीस आला. शालिनी चरणदास तिरपुडे, वय ५२ असे मृत आशा वर्करचे नाव आहे. २३ जून रोजी सकाळी बहीण सुनीता तिरपुडे ही झोपेतून उठल्यावर तिला शालिनी घरी दिसली नाही. शेजारी चौकशी केली असता तिथेही न दिसल्याने कामानिमित्त गेली असावी, असे समजून पोलीसात न कळविता ती घरीच राहिली. दरम्यान आज शनिवार २४ जून रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास शेतशिवारात गुरे चारण्यासाठी गेलेल्यांना विहिरीजवळ चप्पल व स्कार्फ दिसला. गुराख्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता पाण्यावर महिलेचे प्रेत तरंगताना दिसले. त्यांनी पोलीस पाटील विरेंद्र रंगारी व करडी पोलीसांना माहिती दिली. पोलीस निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांनी घटनास्थळी पोहोचून ग्रामस्थांच्या सहकार्याने मृतदेह विहिरीबाहेर काढला. यावेळी मृतक महिला ही शालीनी तिरपुडे असल्याची ओळख पटविण्यात आली. पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह तुमसर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. अधिक तपास पोलीस निरीक्षक गायकवाड यांच्या मार्गदर्शनात हवालदार प्रफुल वालदे करीत आहेत.





महाराष्ट्र Business Katta












# राजर्षी शाहू महाराज : विषमतेविरुद्धचा आदर्श शासक



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केवळ २८ वर्षाच्या कारकिर्दीत शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणली. भारताला लोकशाही स्वराज्य तर हवेच होते; परंतु त्याआधी ते उपभोगण्यासाठी व राबविण्यासाठी प्रथम जनतेत पात्रता आली पाहिजे ही त्यांची भूमिका रास्तच होती. त्यासाठी बहुजन समाजात जागृती झाली पाहिजे या उद्देशाने प्रेरित होऊन खास करून वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी आपल्या सामाजिक कार्याकडे प्रकर्षाने लक्ष घातले. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य मोठया प्रमाणावर हाती घेतले. म्हणून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ असे योग्य वर्णन केले असून महाराजांचा वाढदिवस सणासारखा साजरा करावा असे जनतेला त्यांनी आवाहवन केले होते.**

२६ जून १८७४ रोजी जन्मलेले कोल्हापूरचे थोर राजे राजर्षी शाहू महाराज हे १८९४ ते १९२२ या कालखंडात कोल्हापूर संस्थानचे राजे होते. एक आदर्श शासक, पुरोगामी नेता आणि दूरदृष्टी असलेले समाजसुधारक कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे कुटुंबात जन्मलेल्या शाहू महाराजांना यशवंतराव हे नाव देण्यात आले होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर यशवंतराव यांना बालवयातच राजाच्या विधवा आनंदीबाई यांनी दत्तक घेतले आणि त्यानंतर १८९४ मध्ये त्यांचा राज्याभिषेक करण्यात आला. राजर्षी शाहू महाराज यांनी सत्ता ग्रहण केली तेव्हा महात्मा ज्योतिबा फुले यांचा सत्यशोधक समाज कार्य करीत होता. हा समाज कनिष्ठ वर्ग, कामगार आणि शेतकरी यांच्यात सुधारणेसाठी कार्य करीत होता. न्याय व समता याविषयी प्रबोधन करीत होता. सार्वत्रिक शिक्षण, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व याविषयी जागृती करीत होता. या समाजाची उद्दिष्टे महिलांना सामाजिक अन्यायापासून मुक्त करणे तसेच कामगार व शेतकरी यांना पुरोहितवर्ग आणि नोकरशाही यांच्या दडपशाहीपासून मुक्त करणे हे होते. १८७३ मध्ये महात्मा फुले यांनी स्थापना केलेल्या सत्यशोधक समाजाची वैशिष्टये म्हणजे ब्राम्हणी व्यवस्थेला विरोध करणे, बहुजन समाजात शैक्षणिक सुधारणा करणे, शुद्रांची गुलामगिरीतून मुक्तता करणे, धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणणे इत्यादी होती. एके दिवशी पंचगंगेवर शाहू महाराज स्नान करत असताना स्नानाच्या वेळेस मंत्र म्हणणाऱ्या नारायण भटाने पुराणोक्त मंत्र म्हणण्यास सुरुवात केली, ही गोष्ट तसेच नारायण भटाने स्नान केले नव्हते ही गोष्टही महाराजांच्या नजरेस आणून दिली. महाराजांनी नारायण भटास वेदोक्त मंत्र म्हणण्यास सांगितले. नारायण भटाने मात्र महाराज शुद्र आहेत असे स्पष्ट सांगत मंत्र म्हणण्यास नकार दिला. नारायण भट पुढे म्हणाले, धर्मानुसार ब्राह्मण श्रेष्ठ असतात आणि सर्व शक्तिमान ब्राह्मण समाज तुम्ही क्षत्रिय आहात हे जाहीर करेपर्यंत तुम्ही आमच्यासाठी शुद्रच आहात. नारायण भटाच्या या उद्धट वर्तनाने महाराज प्रचंड अस्वस्थ झाले होते. या कटू अनुभवामुळे राजर्षी शाहू महाराज ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध प्रचंड ताकदीने उभे राहिले. वेदोक्त प्रकरण हे केवळ शाहू महाराजांच्या जीवनातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक जीवनावर परिणाम करणारी एक महत्त्वाची घटना होती. टिळक पंथीय ब्राम्हण वर्गाने केलेल्या टिकेमुळे राजर्षी शाहू महाराज सत्यशोधक समाजाकडे ओढले गेले आणि या प्रकरणामध्ये त्यांची बाजू सत्यशोधक समाजाने उचलून धरली. सत्यशोधक समाजाने वर्णव्यवस्थेच्या विरूद्ध चालविलेल्या लढ्याविषयी त्यांना आदर होता. त्यातूनच त्यांच्या वैचारिकतेची जडणघडण झालेली दिसून येते. त्यांनी सत्यशोधक समाज समजून घेतल्यानंतर त्यानुसारच कृती करण्यास सुरूवात केली. त्यांचे देव आणि भक्त या दोघांच्यामध्ये पुरोहित, दलाल नको याविषयी दोघांचेही मत एकच होते. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील ब्राम्हणी मक्तेदारी मोडून काढणे, जातीभेद निर्मूलन करणे, अस्पृश्यांचा उद्धार करणे, शिक्षणाचा प्रसार करणे यासाठी महाराजांनी प्रसंगी कठोर भूमिका घेतली होती. अर्थातच हे काम सत्यशोधक समाजाचे होते, म्हणूनच सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते शाहू महाराजांची वेदनिष्ठा व मूर्तीपूजा मान्य करुनही त्यांना सत्यशोधक मानत होते. यात महाराजांच्या कार्याचे वास्तव मूल्यमापन होते. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी सत्यशोधक समाजाच्या प्रसाराची गरज शाहू महाराजांना वाटत होती. शाहू महाराजांचा जागतिक परिस्थितीचा व युरोपीय वर्गलढ्याचा सखोल अभ्यास होता. युरोपियन कामगारांनी संघर्ष करून मिळवलेल्या अधिकारांची त्यांना जाणीव होती. शोषित, वंचितांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी प्राप्त करून देणे हे त्यांनी आपल्या आयुष्याचे मिशन बनविले होते. गिरणीतील कामगारवर्ग हाही शोषितच होता. तेव्हा या वर्गाला वगळून वंचितांचा व उपेक्षितांचा विकास होणार नाही, याची त्यांना जाणीव होती. म्हणून कामगारांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यास त्यांनी विशेष प्रयत्न केले होते.

ब्रिटिश काळात भारतात समानतेचे व उदारमतवादाचे तत्त्व राबविण्यात आले होते. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी समतेचा नवा संदेश भारतीयांच्या घरोघरी पोहचवला, असे शाहू महाराजांना वाटत होते. सर्वांना समान शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी कृतिशील प्रयत्न केले होते. महात्मा फुल्यांनी सामाजिक विषमता आणि जातीभेद यांना मूठमाती देऊन समता, बंधुभाव आणि स्वातंत्र्य या त्रिसूत्रीवर नवसमाजाची निर्मिती करून सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून अस्पृश्यांची मुक्तता फक्त शिक्षणच करू शकेल, असा विश्वास त्यांना वाटत होता. त्यांनी अंगिकारलेला हा मार्ग प्रशस्त करण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला. सत्यशोधक समाजाच्या धोरणातील आपल्या विवेकबुद्धीला पटतील त्या चांगल्या गोष्टी स्वीकारून त्यांनी आपल्या विचारांचे अधिष्ठान निश्चित केले होते. त्यामध्ये सर्वांगीण धर्मसुधारणा घडवून आणणे, धर्माला सार्वत्रिक नीतीचे अधिष्ठान देऊन पुरोहितशाहीचे वर्चस्व नष्ट करणे, सर्वसामान्यापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचविणे, त्यासाठी प्राथमिक व मोफत शिक्षणाचा आग्रह धरणे, मागास जातींच्या जातीनिहाय चळवळी बांधणे, त्यांच्यामध्ये लोकशाहीची आस निर्माण करणे, त्यांची अस्मिता जागृत करणे, ब्राह्मणेतरांचे पक्ष स्थापून समाजसुधारणा व शेतीसुधारणा याचा आग्रह धरणे यासाठी इंग्रज सरकारची मदत घेणे, शाहू महाराजांनी आपल्या या विचारधारेच्या आधारावर विसाव्या शतकाच्या पूर्वाधात राजकीय व सामाजिक जीवनात क्रांती घडवून आणली. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर अस्पृश्य-दलित समाजाच्या दारापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे त्यांचे कार्य शाहू महाराजांनी केले. सन १९१८ पासून राजर्षी शाहू महाराजांचे कार्य सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेत्तर प्रश्नांची चळवळ, अस्पृश्योद्धार चळवळ इत्यादींसाठी त्यांनी एकामागून एक क्रांतिकारी पावले उचलून अस्पृश्य समाजास युगानुयुगाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी अविरत कष्ट घेतले. ब्राम्हणेत्तर चळवळीची बीजे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतच अंकुरलेली दिसून येतात. ब्राम्हण पुरोहितशाहीविरूद्ध बंड करणारी ही महाराष्ट्रातील पहिली चळवळ असून सत्यशोधक चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी मजबूत केला व वेदोक्त प्रकरणातून त्याला लढाऊ स्वरूप दिले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील मागासलेल्या जाती-जमातीच्या लोकांसाठी ५० टक्के राखीव जागा ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय २६ जुलै १९०२ रोजी घेऊन तो प्रत्यक्ष राबविण्यास सुरूवात केली. राखीव जागाचा जाहिरनामा काढणारा हा पहिला दूरदृष्टीचा राजा होता. ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारशी या पुढारलेल्या जातींव्यतिरिक्त इतर सर्व जातींना राखीव जागा देण्यात आल्या होत्या. शाहू महाराजांनी अस्पृश्य जातीतील काही लोकांना वकिलीच्या सनदा दिल्या होत्या, त्या विरोधात उच्चवर्णीयांनी चांगलाच कांगावा केला होता. त्या संदर्भात बोलताना शाहू महाराज म्हणतात,महार, मांग वगैरे हलक्या मानलेल्या जातींना मी वकिलीच्या सनदा देतो, या योगाने उच्चवर्णीय लोकांचा अपमान होतो असे काही बड्या लोकास वाटते; पण ही त्यांची चूक आहे. विद्या घेऊन दोन तपे थांबून नंतर समाज बरोबरीचे हक्क देईल किंवा नाही या विचारात बुचकळ्या खात पडण्यापेक्षा त्यास एकदम दास्यत्वापासून मुक्त करून आजपर्यंत जगातील इतर कोणत्याही ठिकाणी दृष्टोत्पत्तीस न येणाऱ्या समाजाच्या जुलमाचा, जाचाचा आणि निर्दयपणाचा अंत करावा. या योगानेच खरे राष्ट्रकार्य होईल अशी माझी दृढ समजूत आहे व त्या मार्गानेच आपला कार्यभाग उरकला जाणार आहे. कोल्हापूर संस्थानातील धर्मकारणात व प्रशासनात ब्राम्हणांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. आता त्यांच्या धार्मिक वर्चस्वाबरोबरच या ऐहिक वर्चस्वासही महाराजांनी शह देण्याचे ठरविले. या जाहिरनाम्याच्या विरोधात विजापूरकरांचे समर्थ पत्रक व लोकमान्य टिळकांच्या केसरी पत्रकातून टिका होऊ लागल्या. २४ नोव्हेंबर १९११ रोजी सर्वात महत्त्वाचा आदेश काढला, या आदेशानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले, याशिवाय अस्पृश्यातील हुशार विद्यार्थ्यांना खास शिष्यवृत्त्या दिल्या जाऊ लागल्या. ७ एप्रिल १९१९ च्या एका आदेशान्वये अस्पृश्य लोकांची दैन्यावस्था ध्यानी आणून त्यांच्या शिक्षणास उत्तेजन द्यावे, या हेतूने महाराजांनी त्यांना पुस्तके, पाटया, पेन्सिली मोफत देण्यासाठी अडीच हजार रूपये मंजूर केले. राजर्षी शाहू महाराजांनी जुलै १९१३ मध्ये अनुदानपात्र असलेली सत्यशोधक शाळास्थापन केली. ही शाळा सुरू करण्यापाठीमागचा उद्देश हा होता की, ब्राम्हण व पंडित वर्गाला वाटत होते की, आमच्याशिवाय कोणतेही धार्मिक विधी केले तर ते मान्य होत नाहीत. या सत्यशोधक शाळेतील शिक्षणामुळे ब्राम्हणेत्तर मंडळींनी आपल्यातीलच लोकांकडून लग्न, मुंजी, धर्मविधी आदी सर्व संस्कारविधी व पूजा करून घेऊ लागले. इतर शाळेपेक्षा या शाळेचे स्वरूप वेगळे होते. धार्मिक विधीचे प्रशिक्षण देणे हे या शाळेचे कार्यक्षेत्र होते. बडोदा दरबाराने एक हुकूम काढला की, पुरोहितांच्या शाळेचे अधिकृत प्रमाणपत्र असल्याशिवाय कोणालाही पुरोहिताचे काम करता येणार नाही. जर कोणी प्रमाणपत्र नसताना पुरोहिताचे काम करीत असेल तर त्यास २५ रूपये दंड भरावा लागेल. त्यामुळे बडोदा व महाराष्ट्र येथून अनेक ब्राम्हणेत्तर तरूण पुरोहिताचे शाळेत दाखल झाले होते. या शाळेतून अभ्यासक्रम पुर्ण करून जे ब्राम्हणेत्तर तरूण परत गेले त्यांनी आपापल्या भागात धर्मविधी पार पाडण्यास सुरूवात केली. समाजातील निरक्षरता नष्ट करण्यासाठी सन १९१५-१६ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी सक्तीचे शिक्षण देण्याचे ठरविले. त्यासाठी मोफत सक्तीचे शिक्षण योजना



तयार करण्याच्या कार्यास चालना दिली. इचलकरंजी व विशाळगड या दोन जहागिऱ्यांमध्ये 'सक्ती-शिक्षणाचा' प्रयोग सुरू झाला होता. त्याचे त्यांनी निरीक्षण केले. पालकांच्या अज्ञान व रूढ समजुतीमुळे त्यावेळी त्या शाळेत फारसे विद्यार्थी आलेले नव्हते. लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी सत्यशोधक जलस्यांचा वापर सुरू केला. या जलस्यांतून लोकशिक्षणाचे अभूतपूर्व कार्य करून सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतिमान केले. अशाप्रकारे सत्यशोधक जलस्यांनी ग्रामीण भागातील लोकांच्या लोकशिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर केला. तसेच प्राथमिक शिक्षणाला चालना देणारा दुसरा घटक म्हणजे प्राथमिक शिक्षकाच्या

पगारश्रेणीत केलेली वाढ होय. त्यामुळे शिक्षक उत्साही राहून आपले कार्य चांगल्याप्रकारे करू लागले. इ.स.१९१८-१९ या कालखंडात आपल्या संस्थानातून अस्पृश्यता उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारणाचे अनेक आदेश काढण्यास सुरूवात केली. त्याचा परिणाम शिक्षण क्षेत्रातही झाला. २८ सप्टेंबर १९१९ रोजी महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्याचा आदेश जारी करण्यात आला. त्यात ते म्हणतात, करवीर इलाख्यात अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात. त्या सर्व बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलास सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घेतले जावे. सरकारी शाळांतून शिवा-शिव पाळावयाची नसल्याने सर्व जातीच्या व धर्माच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे. याशिवाय आर्थिक मदतीसाठी इ.स.१९२० साली अस्पृश्य लोकांच्या विद्येच्या उत्तेजनाकरिता दरमहा पाच रूपये प्रमाणे आठ शिष्यवृत्त्या सुरू केल्या. त्यापैकी तीन शिष्यवृत्त्या अस्पृश्य मुलींच्यासाठी ठेवल्या गेल्या होत्या. राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धाराचे कार्य सुरू केले. कारण मागासवर्गीयांना दारिद्र्याच्या आणि दुःखाच्या प्रसंगातून बाहेर काढणे हे माझे पवित्र कार्य आहे. दलित पतितांची सेवा हीच खरी मानवतेची सेवा. या थोर मानवतावादी विचारसरणीतून त्यांनी प्रत्यक्ष अस्पृश्य उद्धाराच्या कार्याला सुरूवात केली. अखिल भारतीय बहिष्कृत समाज या संस्थेच्या नागपूर येथील पहिल्या परिषदेत दिनांक ३० मे १९२० रोजी अध्यक्ष स्थानावरून बोलताना शाहू महाराज म्हणाले होते की, अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे फार निंद्य आहे. सर्व लोक या शब्दाचा तुमच्या संबंधाने उपयोग करतात म्हणून मी त्याचा उपयोग केला आहे. अस्पृश्य मुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ रोजी मंजूर होऊन कोल्हापूर गॅझेटमध्ये ३ ऑगस्ट १९१८ रोजी प्रसिद्ध झाला. त्यामध्ये अस्पृश्यांवर लादलेली अमानुष अशा हजेरीच्या पद्धतीचे निर्मुलन करण्यात आले. यामध्ये हुकूम काढण्यात आला, की महार-मांग, रामोशी व बेरड या चार जातीच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी. यातील जे कोणी गुन्हयात सापडून शिक्षा झालेले असतील त्यांना मात्र या हुकूमाने हजेरीची माफी नाही. या हुकूमाचा अंमल ताबडतोब करण्यात यावा. हजेरी बंद केल्यापासून गुन्हयांची संख्या कमी झालेली होती. हजेरी प्रमाणेच अस्पृश्याच्यांत सुरू असणारी वेठबिगार ही अमानुष पद्धती सुरू होती. यामध्ये सरकारी अधिकारी गावच्या महारास अनेक प्रकारची कामे सांगून विनामोबदला राबवून घेत असत. ही जी वेठबिगारीची पद्धत सुरू होती ती नष्ट करण्यासाठी २६ जून १९१८ रोजी वटहुकूम काढून महारांच्या वतनी जमिनी रयतवारी केल्या गेल्या, त्यामुळे वेठबिगारीची पद्धत बंद झाली. या संदर्भात शाहू महाराज माणगाव येथील सभेत म्हणतात, मी असे प्रत्येक्ष पहिले आहे की, कित्येक वेळा लहान आजारी मुलांच्या आई-वडिलांना वेळी-अवेळी जबरदस्तीने वेठीस धरून नेल्यामुळे ती लहान आजारी मुले त्यांच्याकडे लक्ष देण्यास कोणीच नसल्याने त्यांचे आई-बाप परत आल्यावर ती मेलेली त्यांना सापडली आहेत. यापेक्षा जास्त जुलूम काय असावयाचा! राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्या रूपाने दलित चळवळीला दोन खंबीर वैचारिक आधारस्तंभ लाभले होते. ही चळवळ गतीमान करण्यासाठी उभयतांना जनतेसमोर पुन्हा पुन्हा एकत्र येऊन त्यांना जागृत करणे गरजेचे होते आणि नेमके तसेच घडत गेले. 'माणगाव परिषद' हे त्याचेच उदाहरण आहे. दत्तोबा पोवार, गंगाराम कांबळे, तुकाराम गणेशाचार्य, शिवराम कांबळे, रामचंद्र कांबळे, निंगाप्पा ऐदाळे या सर्वाशी चर्चा करून माणगाव परिषदेची तारीख निश्चित केली. याच ऐतिहासिक परिषदेमध्ये दुसऱ्या दिवशी म्हणजेच २२ मार्च १९२०रोजी राजर्षी शाहू महाराजांनी भाषण केले. ते म्हणाले, तुम्ही तुमचा पुढारी शोधून काढलात याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषण केले. त्यावेळी ते म्हणाले की, शाहू महाराजांनी जे कार्य केले आहे. ते अलौकिक आहे. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत लागू करण्यात आलेला दुसरा सर्वात महत्त्वाचा कायदा आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह आणि नोंदणीकृत विवाहास मान्यता देण्याशी संबंधित होता. हा कायदा १२ जुलै १९१९ रोजी अशा परिस्थितीत लागू करण्यात आला, जेव्हा बालविवाहाची परंपरा होती. ज्यामुळे तारुण्यातच वैधव्य येत असे. त्या काळात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह अवैध मानले जात होते कारण हे विवाह पारंपरिक रीतीरिवाजानुसार केले जात नव्हते. ज्यांनी धाडसाने असे आंतरजातीय विवाह केले, त्यांच्यावर बहिष्कार टाकला जात असे, अत्याचार आणि शोषण केले जात असे. अशा परिस्थितीत एकात्मता आणि जातीव्यवस्था निर्मूलनाची व्यापक दृष्टी असलेल्या शाहू महाराजांनी तत्कालीन मूलतत्त्ववादी पारंपरिक वर्गाच्या विरोधात भक्कम क्रांतिकारी कृती करून प्रागतिक परिवर्तनाच्या दिशेने धाडसी पाऊल टाकले. जून ते ऑगष्ट १९०२ अखेर तीन-चार महिने राजर्षी शाहू महाराजांनी इंग्लड व युरोपीय देशाचा दौरा केला. त्यावेळी अनेक ठिकाणी प्रचंड तलाव व कालव्यांचे जाळे पसरलेले त्यांनी पाहिले. युरोपीय लोकांच्या सुखी व समृद्ध जीवनाची गुरूकिल्ली त्यांना सापडली आणि ते प्रभावीत झाले. जनतेला दुष्काळाच्या छायेतून सोडविण्यासाठी आणि शेतकऱ्यास सुख-समृद्धीच्या मार्गावर नेण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी धरण बांधण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पडणारा प्रचंड आर्थिक खर्च सोसण्याचाही निर्धार त्यांनी केला आणि महाराणी लक्ष्मीबाई तलावाची उभारणी केली. सद्य परिस्थितीत राजर्षी शाहू महाराजांसारख्या दूरदृष्टी व समाजभान असलेल्या राज्यकर्त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवते आहे! महाराजांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! **(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी आणि फुले-शाहू-आंबेडकर व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !



माधव बैलकवाड
संपर्क 9545013082

आधुनिक केसरी

**२६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात शाहू महाराजांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते.**

छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी केली.

# बहुजन उद्धारक राजर्षी शाहू महाराज




मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी

**कोल्हापुरचे शाहू महाराज यांचा जन्म २६ जुलै १८७४ साली कागल येथे जहांगिरदार श्रीमंत जयसिंगराव घाटगे यांच्या घराण्यात झाला. तसे पाहिले तर त्यांचे मुळ नांव यशवंत होते. पण ते १० वर्षाचे असतांना कोल्हापूरचे राजे शिवाजी महाराज यांची राणी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ ला त्यांना दत्तक घेऊन त्यांचे नाव ठेवण्यात आले शाहू ते कोल्हापूर राज्याचे छत्रपती शाहू महाराज म्हणून ख्याती प्राप्त झाले. धारवाड येथे त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. ते पूर्ण होताच १ एप्रिल १८९१ रोजी महाराणी आनंदीबाई यांच्याशी विवाह झाला. त्या दरम्यान त्यांचे वय १७ वर्षे व महाराणीचे वय १२ वर्षाचे होते. त्यानंतर लगोलग २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूर संस्थानात खास दरबार भरविण्यात आला.**

गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या उपस्थितीत शाहू महाराजांचे राज्यरोहन, राज्याभिषेक झाला. याच वेळी दिवान म्हणून रघुनाथराव सबनीस तर सर न्यायाधिश म्हणून के.एन. पंडीत हे दोन प्रगत विचारांची माणसे नेमली. त्यांचेच मोलाचे मार्गदर्शन शाहू महाराजांना मिळाले. त्यांनी अनेक सुधारणावादी निर्णय घेण्यास सुरुवात केली. राज्याभिषेका नंतर एका वर्षाच्या आतच शाहू महाराजांना महाराणी व्हिक्टोरियाकडून जी.सी.एस.डी. हा किताब मिळाला. शाहू महाराजांच्या या सुधारवादी विचारामुळे भारतात पहिल्यांदा वेद शिकवण्यासाठी पाठशाळा सुरु झाली. त्यांनी १९०२ साली महिलांना आरक्षण मिळाले पाहिजे हा कटाक्ष धरुन तसेच ५० टक्के जागा मागासवर्गीयासाठी आरक्षित केले. तर खऱ्या अर्थाने आरक्षणाचे जनक कोण तर राजर्षी शाहू महाराज म्हणावे लागेल. शाहू महाराजांनी गरीबांच्या उन्नतीस व बहुजनांसाठी अनमोल कार्य केले. बहुजन समाजातील लोकांपुढे केलेल्या भाषणांत शाहू महाराज म्हणाले तुम्हाला अस्पृश्य मानणाऱ्या लोकांपेक्षा तुम्ही जास्त बुध्दीमानी, जास्त पराक्रमी, स्वार्थत्यागी आहात. आपण सर्वजण भावंडे आहोत. सर्वांचे हक्क समसमान आहेत. आपल्या जीवनात समता, बंधुता या तत्वांचा स्विकार केला. २७ डिसेंबरच्या १९१७ च्या अधिवेशनात शाहू महाराज म्हणाले शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची व आपल्या देशाची प्रगती होणार नाही. या करीता भारताला सक्तीच्या व मोफत शिक्षणाची गरज आहे. तेंव्हा वेगवेगळया समाजातील मुलांना शिक्षण देण्याची पध्दत मी राबवत आहे. जातीपातीचे बंधने ही तुटली पाहिजेत व सर्वजण एकत्र आले पाहिजेत ही शिकवण त्यांनी दिली. ते कोल्हापूर संस्थानचे राजे जरी असले तरी आपल्या संपत्तीचा उपयोग जनकल्याणासाठी केला. त्यांनी सामाजिक कामाबरोबरच विकासात्मक कार्यही केले. पाणी पुरवठा होण्यासाठी राधानगरी धरण बांधले. त्यांनी विद्या धन हे सर्वश्रेष्ठ दान आहे. हे सर्व जगाला दाखवून दिले. शाहू महाराजांचे विचार आजच्या माणसांसाठी, तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असेच आहेत. त्यांचा आदर्श हा घेतलाच पाहिजे. ते समतावादी विचाराने प्रेरीत झाले. महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचार विरोध कायदा व आंतरजातीय विवाह कायदा त्यांनी सर्व प्रथम मंजुर केला व त्यानुसार स्वतःच्या कुटूंबातील मुलगी धनगर



समाजाच्या होळकर यांच्या घराण्यात विवाह करुन आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. इ. स. १९१७ साली पुर्नविवाहाचा कायदा करुन विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता प्राप्त करुन दिली. परदेशातून उच्च विद्याविभुषीत होऊन आल्यावर डॉ. बाबासाहेबांचा सत्कार माणगांव येथे करण्यात आला. त्यावेळी दिलेल्या भाषणात शाहू महाराज म्हणाले अस्पृश्यांनो तुम्हाला तुमचा नेता मिळाला आहे. तो तुमचा उध्दार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. हे त्यांचे बोल खरे ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ अस्पृशांचे नव्हे तर संपूर्ण देशाचे नेते ठरले. त्यांच्या किर्तीची पताका जगामध्ये फडकवली. त्यांनी भारतीय संविधान लिहून एक प्रकारे राजर्षी शाहू महाराजां प्रती कृतज्ञाच व्यक्त केली. डॉ. बाबासाहेबांनी शाहू महाराजांशी चर्चा करुनच मुकनायक हे दैनिक सुरु केले. एकदा तर स्वतः शाहू महाराज डॉ. बाबासाहेबांना भेटण्यासाठी मुंबईला आले. तेंव्हा डॉ. बाबासाहेब महाराजांना म्हणाले की, तुम्ही राजे आहात, तुम्ही कशाला आलात ? मला बोलावले असते तर मीच तिकडे आलो असतो. तेंव्हा महाराज म्हणाले आम्ही संस्थानचे राजे, तुम्ही ज्ञानाचे राजे. आमचे राज्य आज आहे, उद्या नाही, पण तुमचे ज्ञान हे सदोदित तेवत राहील. इ.स. १९०८ मध्ये अस्पृश्यांसाठी खास वसतीगृहाची पहिल्यांदा स्थापना करुन शिक्षणासाठी अनेक वसतीगृह काढली. इ. स. १९१३ मध्ये प्रत्येक गावात एक शाळा असावी असा आदेशच आपल्या संस्थानात जारी केला. अस्पृश्यांना निवारणासाठी शाहू महाराजांनी गंगाराम कांबळे या महार समाजातील व्यक्तीस चहाचे हॉटेल सुरु करुन दिले व महाराज दररोज चहा पिण्यासाठी तिथे जायचे. इ.स. १९१६ मध्ये डेक्कन रयत संस्थेची स्थापना केली. २१ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार आई वडील मुलांना शाळेत पाठवत नसेल, तर त्यांना दरमहा एक रुपया दंड आकारण्याची तरतुद करण्यात आली. या तत्वाचा भारतीय राज्यघटनेत अंतर्भाव करण्यात आलेला आहे. गुळाच्या बाजारपेठेची स्थापना सर्वप्रथम कोल्हापूर येथे शाहू महाराजानी केली. इ. स. १९२० मध्ये नागपूरला अखिल भारतीय बहिष्कृत परिषद भरवली. नाशिक येथे पाहिले वसतिगृह उदोजी विद्यार्थी वसतिगृह म्हणून सुरु केले. कोल्हापूर राज्याची प्रशासन यंत्रणा स्वतःच्या ताब्यात येताच बहुजन समाजातील नोकर वर्गाचे प्रमाण अल्प म्हणजे १० टक्के होते ते त्यांनी गादीवर बसताच ६० टक्क्यापर्यंत नेऊन पोहचवले. अशा प्रकारे राज्यकारभार केला. या थोर महान राजर्षी शाहू महाराजांचा मृत्यू ६ मे १९२२ रोजी झाला. थोर समाजसुधारक, आरक्षण जनक, बहुजन उध्दारक राजर्षी शाहू महाराज यांना आजच्या जयंती दिनी विनम्र कोटी-कोटी अभिवादन.

# लोकशाही पेरणारे राजर्षी शाहू महाराज



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**राजर्षी शाहु महाराज यांचे कार्य व विचार एवढे महान व गहन आहेत की विषमता, द्वेष, धर्म आणि सत्तेची लालसेची झालर असलेल्या लोकांना ते आजही पचणारे नाहीत. राजर्षी शाहु महाराज मानवाचे कल्याण करून हजारो वर्षापासून ची प्रस्थापितांच्या हातील राजकीय, धार्मिक व सामाजिक सत्ता सर्व सामान्य मानसाच्या हाती देण्यासाठी प्रयत्नशील होते. स्वतः राजा असुनही लोकशाहीची पेरणी करून लोकांचे कल्याण व जागृती यावरच भर देण्याचे काम केले गेले. राजर्षी शाहु महाराज यांचे विचार केवळ कोल्हापूर संस्थान किंवा महाराष्ट्रापुरते मर्यादित नसुन जेथे माणूस आहे अशा जगातील कोणत्याही ठिकाणी आजही त्यांचे विचार व कार्य मोलाचे असतात.**

शिक्षणाच्या माध्यमातून नोकरी व जागृती, आणि जागृतीच्या माध्यमातून अंधश्रद्धा, पांखड, विषमता, द्वेष, स्पृश्य अस्पृश्यता नष्ट करून माणसाने माणसासोबत माणसा सारखे राहण्याचे संस्कार घालणारे राजर्षी शाहु महाराज हे लोकनेते होते. राजर्षी शाहु महाराज यांच्या जीवनावर व कार्यावर एका लेखात पुस्तकात वर्णन करणे कधीच शक्य होणार नाही. तरीही राजर्षी शाहु महाराज यांनी रूजवलेली लोकशाहीचा फायदा सामान्य मानसाला कसा झाला या बद्दल मत मांडण्याचा छोटासा प्रयत्न. राजर्षी शाहु महाराज यांनी सर्वात जास्त भर दिला तो शिक्षणावर. कारण शिक्षणा शिवाय तरणोपाय नाही अशी त्यांची खात्री होती. म्हणून शाहु महाराज यांनी शिक्षणाची व्यवस्था करून प्रत्येक जाती समुहातील विद्यार्थ्यांना संधी निर्माण करून करू. प्रत्येकाला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करून शिक्षणाची ज्योत घराघरात पेटवून अज्ञान रुपी अंधार दुर केला. सोबतच मुलीच्या शिक्षणाची सोय करून शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. शिक्षण हे गुणवत्तापूर्ण असायला पाहिजे व वरच्या वर्णातील आणि गोरगरीब विद्यार्थांच्या शिक्षणाची पातळी सारखी असायला पाहिजे अशी व्यवस्था केली. कोल्हापूर आपल्या संस्थानामध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून बोर्डींग सुरू केले. सर्वजाती धर्माच्या विद्यार्थ्यांना बोर्डींग सुविधा देऊन शैक्षणिक क्रांतीच राजर्षी शाहु महाराज यांनी केली. केवळ शिक्षण घेऊन उन्नती होत नाही तर रोजगार व नोकरी महत्वाची असते. म्हणून स्वतः च्या राज्यात बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना नोकरी मध्ये ५०% आरक्षण लागु केले. जसे आरक्षण लागु केले तसेच अनेकांच्या पोटात दुखायला लागले, खालच्या जातीतील मराठा, कुणबी, साळी तेली, कोळी, मांग ,महार, शिंपी या जातीतील लोक ब्राम्हणांच्या सोबत काम करतील हेच त्यांना मान्य नव्हते. ब्राम्हणांचा विरोध असुनही आरक्षण देऊन नोकरी मध्ये संधी निर्माण करून समतेची मशाल पेटवून कोल्हापूर संस्थानाला प्रकाशमय केले. गुण विद्वेतेची कदर असलेले शाहु महाराज स्वतः राजा असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मॅंट्रीक पास होतात तेव्हा त्यांच्या घराचा पत्ता शोधत शोधत, चाळीत जाऊन सत्कार करतात. म्हणजे या राज्याचे मन आणि कर्तृत्व केवढे असेल याची परिचीती येते. शाहू महाराज राजा होते. एका शब्दांवर बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या समोर हजर होऊ शकत होते. परंतु राजा असुनही शाहु महाराज गुणवान विद्यार्थांकडे गेले हे इतिहासामध्ये एकमेव असे उदाहरण आहे. आज लोकशाही मध्ये लोकांचे सेवक म्हणुन लोकप्रतिनिधी असतात. परंतु हेच प्रतीनिधी स्वतः ला राजा समजून जनतेची कामे तर करत नाही उलट यांना गुणवत्तेची थोडीही कदर नाही. गुणवान विद्यार्थी लोकप्रतीनिधींच्या कार्यालयाभोवती चकरा मारून परेशान होतो पण त्याच्या गुणवत्तेची दखल घेतली जात नाही वा एक नागरिक म्हणून त्याचे काम वेळेवर केले जात नाही. हा फरक असतो नितीमत्ता आणि प्रामाणिक पणाचा. राजर्षी शाहूमहाराज राजा असूनही नितीमत्ता, प्रामाणिक पणा प्रचंड असुन गर्व मात्र कशाचाच नव्हता. म्हणून आजही शाहु महाराज वंदनीय आहेत. शिक्षण घेऊन,नोकरी करून प्रश्न सुटणार नाहीत. कारण जोपर्यंत सत्तेत आपले लोक जाणार नाही तोपर्यंत विकास होणार नाही असे ठाम मत शाहु महाराज यांचे होते. ब्रिटीशांकडून देशाला स्वातंत्र्य मागताना ज्यांनी हजारो वर्षापासून राजकीय व सामाजिक सत्ता भोगली अशा अल्पसंख्याक लोकांकडेच स्वातंत्र्य जाणार आहे असे शाहु महाराज यांना दिसत होते. म्हणून त्यांनी स्पष्ट च मत मांडून सत्ता हि अल्पसंख्याक लोकांच्या हातात न जात सत्तेतील वाटा हा बहुजन समाजाला मिळायला पाहिजे. तेव्हा तर शाहु महाराज यांच्यावर प्रस्थापित लोकांनी सडकून टीका करून शाहू महाराज यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु शाहु महाराज आपल्या मतावर ठाम होते. राहु महाराज म्हणायचे समता, बंधुता न्याय व समान हक्क अधिकाराची जेव्हा चर्चा होते तेव्हा हे चर्चा करणाऱ्यांना देशद्रोही ठरवून मोकळे होतात. परंतु हजारो वर्षांपासून लोकांना अज्ञान व अंधश्रद्धेत ठेवून विषमता निर्माण करून ज्यांनी समाजाचे शोषण केले त्याच लोकांच्या हाती सत्ता जाणे देशाला घातक आहे. बहूजन समाजाने गुवणत्तेचे शिक्षण घेऊन वाचायला पाहिजे व सत्तेमध्ये आपली भागीदारी मिळायला पाहिजे. परंतु आज लोक शिकले वाचायला लागले. परंतु जागृत झाले नाही म्हणून लोकप्रतीनीधी जनतेचे असूनही काम मात्र प्रस्थापित लोकांचे करतात हि खंत आहे. सत्तेची लालसा असलेले लोक समाजिक तेढ निर्माण करून आपली सत्तेची पोळी भाजुन घेतात व सामाजिक तेढ निर्माण झाल्यावर पुढाऱ्याचे काहीच जात नाही नुकसान होते ते सर्वसामान्य लोकांचे. म्हणून लोकांनी जतीभेद विषमता हाणुन पाडून समतेची कास धरावी. विषमता नष्ट करून समता प्रस्थापित करायची असेल तर बहुजन समाजाने ब्राह्मण पुजाऱ्या कडून पुजा आणि धर्म ऐकु नये असा संदेशही दिला. शाहु महाराज यांच्या कार्याला विचाराला ज्यांनी विरोध केला त्यांचेच वंशज आज शाहु महाराज यांच्या विचाराचे राष्ट्र निर्माण होऊ देतील का ? सत्तेमध्ये आजही आपण बघितले तर अल्पसंख्याक लोकांचे वर्चस्व असून बहुसंख्य लोक चाकर आहेत. सत्तेत बसलेले अल्पसंख्याक लोक अंधश्रद्धा, विषमता, पाखंड, सामाजिक तेढ याला आजही प्रोत्साहन देऊन गोरगरीब लोकांचे शिक्षण नोकरी बंद करत करत आहेत. सर्वच ब्राह्मण वाईट नसतात परंतु सर्वच क्षेत्रात आरक्षण असुनही ब्राम्हणांचेच वर्चस्व कसे यावर मात्र कोणी ही बोलत नाही. अल्पसंख्याक ब्राह्मण वर्गाकडे ज्ञान असेल तर



बहुसंख्य बहूजन समाजाकडे थोडेसे ही ज्ञान नसेल का ? आजही हक्क, अधिकार, शिक्षण रोजगार मागितला तर त्याला चुकिचे ठरवले जाते. ज्यांनी जाती निर्माण केल्या, जातीव्यवस्था मजबूत केल्या व आजही जाती धर्माच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करून पोटभरणाऱ्या वर बोलले तर जातीवाद होतो. आणि मुसलमानांवर बोलले देश प्रेम ? हिच विषमतावादी व्यवस्था उलथून टाकण्याचे काम शाहु महाराज यांनी केले. परंतु शाहु महाराज यांच्या विरोधातील लोक आज सत्ते मध्ये आहेत तर काय शाहु महाराज यांच्या विचाराने कारभार होईल ? शाहु महाराज यांच्या नावाने सामाजिक न्याय दिवस साजरा केला जातो. तर काय सरकार सामाजिक न्यायावर आधारित काम करते ? सामाजिक न्याय जर सरकारने केला असता तर भिमाकोरेगाव, जवखेडा, मुंबई, नांदेड सारखे प्रकरणे प्रलंबित राहीले असते. म्हणजे राजर्षी शाहु महाराज यांनी सामाजिक समता प्रस्थापित करून सामाजिक न्यायाची व्यवस्था निर्माण केली तेही राजा असून. मग लोकशाही मध्ये सामाजिक न्यायाची उणीव का आहे ? राजर्षि शाहु महाराज यांनी राजा असताना जे करून दाखवले ते आज लोकशाही असताना करू शकत नाहीत कारण सत्तेत आजही रिजर्षि शाहू महाराज यांचे विरोधक बसलेले आहेत. शिक्षण, रोजगार, आरोग्य , लोकांचे मुलभूत हक्क अधिकार जपण्याचे काम शाहु महाराज यांनी केले. उद्योजकांना संधी निर्माण करून उद्योजक घडविले, राधानगरी सारखे धरण बांधून लोकांच्या पिण्याच्याच पाण्याचा नाही तर शेतीच्या पाण्याचाही प्रश्न सोडविला. तळागाळातील लोकांचा सर्वांगिण विकास हेच शाहु महाराज यांचे ध्येय होते. परंतु राजेशाही मध्ये जे शक्य झाले ते आजच्या स्वार्थी, शोषीत व विषमतावादी लोकांनी लोकशाही मध्ये ही होऊ दिले नाही. आपण विचार करा शाहु महाराज मोफत व सक्तीचे शिक्षण देत होते तेव्हा कायदा नव्हता. परंतु पुढे बाबासाहेब आंबेडकर यांनी हिच बाब कायद्यात आणली तरीही आज शिक्षणाचे बाजारीकरण करून शिक्षण महाग केले. सत्तेतील महत्वाचे पद, मंदिर, सर्वोच्च अधिकारी हे ही बहुसंख्य एकाच वर्गाचे, उच्च शिक्षण जसे आय आय टी, आय आय एम मध्ये एकाचे वर्णाचे विद्यार्थी बहुसंख्य. गोरगरीब विद्यार्थ्यांना हक्क न्यायासाठी आंदोलन करतात परंतू. उच्चवर्णीय लोक, विद्यार्थी ना कोणते आंदोलन करत ना कोणती दंगल करत तरीही सत्तेमधील बहुतांश वाटा त्याच्या च हाती असतो. उच्चवर्णीय लोकांना कठोर शिक्षाही होत नाही मग गुन्हा केवढाही असो. अशी परिस्थिती आज देशात असतात. शाहु महाराज यांच्या नावाने सामाजिक न्याय दिन साजरा करणे म्हणजे केवळ औपचारिकता आहे. केवळ फोटोला हार घालून त्यांच्या विचाराचे व कार्याचे हनन करण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु शाहू महाराज यांचे कार्य व विचार जागृत माणसाला परिवर्तन करण्यासाठी नेहमीच उर्जा आणि मार्ग देत राहतील. भविष्य, थोतांड, ज्योतिष शास्त्र, कर्मकांड, बुआभाजी उधळून लावणाऱ्या शाहु महाराजांच्या राज्यात पुन्हा त्या गोष्टींना समर्थन देणे म्हणजे लोकांना गुलामीकडे नेने होय. परंतु ज्यांच्या कडे राजर्षि शाहु महाराज यांचे विचार आहेत ते लोक जागृत व स्वाभिमानी आहेत. आणि राजेशाही अजूनही लोकशाहीचे पेरणी करून मुक्याचा आवाज बलवान व्हायला पाहिजे मुकनायला भरभरून मदत केली. आताचे विषमतावादी व द्वेषी सरकार लोकांचा आवाज दाबण्याचा अनेक प्रकारचे प्रयत्न करत आहे. हाच फरक आहे लोकशाही पेरण्याचा आणि आम्ही लोकशाही मानतो असे बोलण्याचे नाटक करतो म्हणणाऱ्यांचा. आजचे लोक लोकशाही मध्ये असूनही लोकशाही पद्धतीने वागत नाहीत म्हणून देशाचे वातावरण मवी झाले. देशाला तारायचे असेल तर शाहु महाराज यांच्या विचाराची पेरणी करणे आवश्यक आहे.

# प्रत्येकाच्या आयुष्याची एक स्टोरी असते...



श्रावण भवर
संपर्क क्र. 9421932704

आधुनिक केसरी

**यश हे जादूची कांडी फिरवून एका रात्रीत कधीच मिळत नसतं . आपल्या माय बापानं, आपण कैक रात्री जागवल्या असतात, अनेक काबाडकष्ट सहन करून जीवाला तीळतीळ मारुन, संयमाने घामाच्या धारा आणि कधी कधी कोंडमारा सहन करावा लागतो तेव्हा कुठे आपल्या जीवनात यशाची किरण आपल्या घरादरात अन् पदरात पडतात आणि आपलं जीवन प्रकाशमान करतात. यशाचा डोंगर सर करताना अनेकदा अपयशाच्या पायऱ्या लागतात अनेक अपयशाचे घोट पिल्यानंतरच यशाचं अमृत सोपान प्यायला मिळत असतं. आपल्या यशाच्या वाटेत अनेक वाटेकरी असतात पण या वाटेत आपलीच माणसं, मित्र मैत्रिणी आपली वाटमार करणारे तर नाही ना ? याचा मागवा घ्यायची वेळ आली आहे.**

कारण उत्तुंग यशाची चव चाखायच्या समयालाच आपल्या जवळच्या माणसांने मित्राने आपला घात करावा, घातपात करावा आणि आपला, आपल्या साऱ्या कुटुंबाचा अपार कष्टाने मिळविलेला तोंडचा घास कायमचा हिसकावा अशी भयानक आणि भयावह घटना समस्त महाराष्ट्राला आणि स्पर्धा परिक्षेचा जीव तोडून अभ्यास करणाऱ्या तमाम विद्यार्थी, स्पर्धकांना पडला आहे. नेमका विश्वास कुणावर ठेवावा हाच यक्ष प्रश्न सर्वांना आता सतावतआहे. प्रत्येकाच्या आयुष्याची एक स्टोरी असते पण लोक ऐकण्यासाठी तेव्हाच उत्सुक असतात जेव्हा ती स्टोरी यशस्वी होते प्रत्येकाच्या मनातील भाव जन माणसात मांडून अनेकांच्या मनाचा ठाव घेणारे हे अंतिम शब्द आहेत एमपीएससी परीक्षेत राज्यात तिसऱ्या क्रमाने उत्तीर्ण होऊन स्पर्धा परीक्षेत उत्तुंग शिखरावर यशस्वी झालेल्या आणि वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून निवड झालेल्या दर्शना पवार यांचे. हे शब्द प्रत्येक स्पर्धा परीक्षा देणाऱ्या सर्व स्पर्धकांच्या मानत कायम घर करून गेलेत कारण, यश आणि अपयशाच्या तुटकशा सीमारेषेच्या अवस्थेत कित्येक जण जात आहे. जगत आहेत. कित्येक स्पर्धक यशाच्या एक पाऊल मागे असेल पण, यशस्वी लोकांची कथा, गाथा गाण्याची समाजात प्रथा आहे. पण यशाच्या मार्गावर असणाऱ्यांच्या व्यथा, अवस्था कुणी पाहत नाही. हीच दुरवस्था आहे. भावी वनपरिक्षेत्र अधिकारी दर्शना पवार यांच्या आत्ता नेमकी कुठे आयुष्याच्या लढाईतून यशाच्या मार्गावर वाटचाल करण्याची नेमकी सुरुवात झाली होती. उभे आयुष्यभर डोळ्यात साठवलेली स्वप्न साकार करण्याची आणि त्या स्वप्नांना, आई-वडिलांच्या ईच्छा आकांक्षांना आकार देण्याची वेळ आली होती. आपल्या मनातली मनोगत, कल्पना, ध्येय, धोरणं यांना जनमानसात मांडून एक चांगला प्रमाणशीर, प्रशिस्त, प्रमाणिक प्रशासकीय अधिकारी बनून उत्तम प्रकारे आपल उत्तर दायित्व निर्वाह करण्याची स्वप्ने भावी अधिकारी दर्शना पवारने पाहिली असतील पण, त्या स्वप्नांना सत्याचा स्पर्श होण्याच्या अगोदरच तिच्या मित्राने राहुल हंडोरेने तिचा घात केला. अमानुषपने हत्त्या केली .राजगड किल्ल्यावर जाऊन अमानुषपने अमानवीय कृत्य करुन तिचा जीव घेतला.



राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी कुजलेल्या अवस्थेत दर्शना पवार यांचा मृतदेह मिळाला. ही कृती समस्त मानवतेला, माणुसकीला काळीमा फासणारी आहे. वैयक्तिक संबंधातून केलेल्या निर्दयी हत्येची कबुली ही राहुल ने दिली आहे. गुन्ह्याची कठोरात कठोर शिक्षा राहुलला कायद्याने नक्कीच होईल. दर्शना पवार सारख्या उदयोन्मुख, उमद्या, हुशार आणि उज्वल भविष्याची स्वप्ने आसलेल्या भावी अधिकाऱ्याला महाराष्ट्र मुकला.राहुल ने केलेल्या या अमानवीय, अमानूष, कृत्यामुळे एक भयानक आणि भयावह प्रश्न या घटनेनं समाज मनावर पडला आहे की नेमका विश्वास कुणावर ठेवावा. आसपास असणारी, आपलं म्हणणारी आपली माणसाचं आपल्या जीवावर उठायला लागली तर विश्वास तरी कुणावर ठेवावा ? स्पर्धा परिक्षेत यशस्वी होण्यासाठी अनेक चाळण्या-गाळण्यातून, मुलाखतीतून जावं लागतं. अनेक हाल अपेष्टा, कष्ठ, लोकांची चांगली वाईट बोलणं, सहन करुन सतत संयमानं सगळं सहण करून मोठया कष्ठांन एखादी पोस्ट हाती लागते. अनेक जन डिप्रेशन मध्ये जातात आणि आपली जीवन यात्रा संपवता. पण जे जिद्दीने, अपार कष्ट,महेनत,संयमाने, अथक,अविरत, अविश्रांत परिश्रम घेऊन मोठया कष्टाने आपली स्वप्न साकार करण्यासाठी अनेक संकटांशी झुंजत असतात. कधी नशीब, नियती तर कधी कधी नियमशी झटत असतात आणि यशाची शिखरं सर् करुन यशाची चव चाखायची वेळ येते आणि याच समयाला आपल्या म्हणणाऱ्या माणसानं आपल्या घात पात करावा. अशी अवस्था आणि व्यवस्था निर्माण होत असेल तर मग विश्वास तरी कुणावर ठेवावा असा धीर गंभीर प्रश्न मानला सतावतो की स्पर्धा ? परीक्षेची की अस्तित्वाची. स्थितीआणि परिस्थीती कशीही असली तरी मनस्थिती चांगली ठेऊन सावध, सजग आणि सतर्क राहून आपल्या यशाच्या मार्गावर मार्गक्रमण करत रहाणे हाच बोध या अमानवीय कृत्यातून सर्वांनी घ्यावा आणि आपले, आपल्या परिवाराचे स्वप्न साकार करण्यासाठी संयमाने, सदाचाराने, सद्वृतिने आणि सम्यकपने आपले ध्येय, स्वप्न साध्या करावे.दर्शना पवार यांच्या शेवटच्या भाषणात त्यांनी प्रत्येकाची एक स्टोरी असतें आणि लोक तिचं स्टोरी ऐकण्यास उत्सुक असतात जी यशस्वी होते. पण स्टोरीचा असा द एंड होणे कोणत्याही स्पर्धेत आणि जीवनाच्या शर्यतीत योग्य नाही... कोणतीही स्पर्धा असो की शर्यत, पैज यात खिलाडू वृत्ती जोपासणे संयमाने , सद्वृतीने, सदाचाराणे स्पर्धक म्हणून राहणे हा उदात्त, उज्वल आणि उन्नत जीवनाचा मूलमंत्र आहे.. आपली स्वप्ने, ध्येयांना सत्याचा स्पर्श करण्यासाठीं धाडसाने झटत रहा.. सावध , सजग आणि सतर्क रहा...

# भिक्षेकरी डवरी गोसावी समाजाची जीवनगाथा : झोळी



डॉ. दैवत सावंत
छत्रपती संभाजीनगर

आधुनिक केसरी

**'झोळी'हे डॉ.कालिदास शिंदे यांचे आत्मकथन.पुण्यातील समीक्षा पब्लिकेशनने ते प्रकाशित केले.एकूण 342 पृष्ठ असलेले हे आत्मकथन आहे.झोळी हे अत्यंत महत्त्वाचे असे आत्मकथन आहे. सबंध जीवनामध्ये वाटायला आलेले नानाविध प्रकारचे व जीवघेणे अनुभव लेखकांनी या आत्मकथनात नोंदवलेली आहेत. वारंवार जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हा केंद्र वरती ठेवून सोयी या आत्मकथनाची निर्मिती झाला आहे, असे आपल्या लक्षात येते. म्हणून ज्या ज्या ठिकाणी ज्या ज्या वेळेला आपल्याजवळ काही नाही तेव्हा इतरांना हात पसरवणे हा भाग लेखकाने अतिशय संवेदनशील पणे दिसून येतो .**

जे पाहिलं ते वास्तव जीवन चित्रण आणि जगलेले जीवन, जगलेले नानाविध अनुभव घेऊन कालिदास शिंदे यांनी हे आत्मकथन सिद्ध केलेले आहे. या आत्मकथनाच्या संदर्भात बाळकृष्ण रेणके यांनी प्रस्तावनेच्या रूपात लिहिलेली माहितीही अत्यंत महत्त्वाची आहे. भटक्या-विमुक्त समाजाची दैनंदिन जीवन जगण्याची पद्धती, पारंपरिक विचाराचा पगडा आणि भिक्षेदरी करणाऱ्या भटक्या विमुक्त जमातीचे यथोचित चित्र कालिदास भांगे यांनी आपल्या जोडी या आत्मकथनामध्ये केलेला आहे. ते नोंदवतात की माणूस शास्त्राच्या वाङ्मयात बऱ्याच भटक्या जमातींची माहिती मिळते त्या माहितीत जमातीचे नाव व्यवसाय देवता रूढी परंपरा भौगोलिक स्थान सामाजिक दर्जा जीवन जगण्याच्या पद्धती इत्यादी बाबतची माहिती असते प्रत्यक्ष भटके जीवन जगण्यातली दाहकता त्या माहितीत जाणवत नाही पण अस्थिर साधनविहीन भिक्षेगिरी भटक्या जमातींच्या एका भटक्या कुटुंबातील एका जिद्दी युवकाचे डॉ.कालिदास शिंदे यांची उच्च विद्या विभूषित होईपर्यंतचे अँड तारुण्यातले हे केवळ आत्मकथनच नव्हे तर भिक्षेकरी भटक्या जमातींच्या तमाम पोरक्या कुटुंबाची त्यांच्या मानवशास्त्रासह जगण्यातले दहाक निखारे उधळणारी प्रातिनिधिक संघर्ष गाथा म्हणजे झोळी होय यावरून समाजात जीवन जगणाऱ्या आणि पारंपारिक संस्कृतीमध्ये भिक्षेकरी होऊन प्रत्येकांना आपली झोळी पसरून उपजीविका केली जाते याच भटक्या विमुक्त समाजावर नाना प्रकारचे आरोप आजपर्यंत केल्या जातात मात्र प्रस्थापित व्यवस्थेने भटक्या विमुक्तांच्या वाट्याला आजपर्यंत स्थिरत्व प्राप्त करून दिलेले नाही ही आजही शोकांतिकाच त्यांच्या वाट्याला आलेली आहे.म्हणून वेगवेगळ्या अनुभवातून जगण्यातील संघर्षातून झोळी या आत्मकथनाचा जन्म झाला आहे ,असे आपल्याला म्हणता येईल. एका उच्चविभूषित अर्थात पीएचडी धारक युवकाच्या वाट्याला येणारी संघर्षशील जीवन सरणी दिसून येते.आजपर्यंत मराठी साहित्यामध्ये भटके विमुक्त जीवन मांडणारे अनेक आत्मकथने प्रकाशित झालेले आहेत नव्हे तर मराठी साहित्य विश्व हे भटक्या विमुक्तांच्या व्यथा वेदना घेऊन व्यक्त होणारा वाङ्मयप्रकार म्हणून आत्मकथन या प्रकाराची ओळख आहे आणि या प्रकारात बहुतांश लेखक हे भटक्या विमुक्त समाजातून येतात आणि त्यांनी आपलं जीवन आपली संस्कृती इतिहास पारंपारिकता मांडण्याचा प्रयत्न आपल्या लेखनातून केलेला आहे त्याच प्रकारचा एक अत्यंत महत्त्वाचा व वेगळा अनुभव विश्व घेऊन कालिदास शिंदे हे भिक्षेकरी डवरी गोसावी समाजाचे जीवन या आत्मकथनातून मांडतात.अनेकांना भिक्षेकरी डवरी गोसावी ही भटक्या विमुक्तांमध्ये समाविष्ट आहेत हेच माहिती नाही इतरांपेक्षा वेगळं जीवन जगणारा हा समाज आज आपल्याला पाहायला मिळतो नेहमी अनेकविध लोकांच्या घरोघरी जाऊन भिक्षा मागून तेही समाधानाने दिली तर त्याचा आनंद वेगळा असतो दारोदारी फिरून जीवन जगणं हे फार वाईट आहे आजही या भिक्षकरी डवरी गोसावी समाजाच्या वाट्याला स्थिरता प्राप्त झालेली नाही हे कालिदास शिंदे यांचे झोळी आत्मकथन वाचल्यावर समजते झोळी हे आत्मकथन वेगवेगळ्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे एकतर या आत्मकथनात आलेलं जीवन हे नवीन आहे भटक्या विमुक्तांच्या समाजातील लेखकांनी लिहिलेले अनेक आत्मकथन ही आदर्श आहेत या आत्मकथनांनी विचार करायला लावलं ही गोष्ट फार महत्त्वाची आहे मराठी साहित्याचा अभ्यास म्हणून विचार करत असताना आत्मकथनामध्ये आलेल्या जीवन जाणिवा भाषाशैली वातावरण संवाद या घटकातून ही आत्मकथन अतिशय महत्त्वपूर्ण आहे कालिदा शिंदे आपल्या मनोगताप लिहितात जोडी हे आत्मकथन वाचकांच्या समोर ठेवताना मला विशेष समाधान लावत आहे कारण अठरा विश्व दारिद्र्य असलेल्या ' भिक्षेकरी डवरी गोसावी' या भटक्या जमातीत मी जन्माला आलो आणि दाही दिशा फिरलो त्यातीलच एक वाट शिक्षणाने दाखवली नाही तर भटकंती तर आमच्या पाचवीलाच पुजलेली आहे आमचे जीवन भटकंती करून जगणे असेच आहे माझा समाज आजही भिक्षेवरच पूर्णपणे अवलंबून आहे दारात जाऊन बारा घरचा तुकडा मागितल्याशिवाय आमचे पोटच भरत नाही भिक्षेशिवाय आमची चूल पेटत नाही जमातीचा जोगी गावातून मागून पाला बिराडावर येत नाही तोपर्यंत पालावरचं लहान लेकरू सुद्धा उपाशी तापाशी पोटाच्या भुकेसाठी तडफडते'




दारोदारी फिरून आणि भिक्षा मागून आणल्याशिवाय या भटक्या नुकतातील भिक्षेकरी डवरी गोसावी या समाजाचे जीवन भागत नाही याचं दुःख या निमित्ताने वाटते स्वातंत्र्य मिळून साधारणपणे 75 वर्षे उलटून गेली असून देखील आजही समाजातील नानाविध जाती,जमाती या प्रवाहापासून प्रचंड दूर आहेत यांची दखल व्यवस्थेने घेतली पाहिजे मात्र शासकीय व्यवस्था अर्थात प्रस्थापित व्यवस्था ही या समाजाची नाळ जोडण्यामध्ये कमी पडत आहे असेच आपल्या लक्षात येईल.'झोळी' या आत्मकथनाने मराठी साहित्य समृद्ध होईलच यात दुमत नाही पण खऱ्या अर्थाने या समाजाच्या वाट्याला आलेल्या व्यथा वेदना दूर व्हाव्यात इच्छा यानिमित्ताने व्यक्त करायला हरकत नाही. सत्तेत असणाऱ्या सगळ्या समाजाच्या नेतृत्वाने इतक्या मुक्तांच्या जीवनाकडे गांभीर्याने बघून त्यांचं जीवन आपल्यासारखं व्हावं यासाठी काही एक प्रयत्न करणे गरजेचे आहे तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण या समाजाचा एक भाग आहोत आणि आपल्याविषयी व्यवस्थेला कळवळा आहे याची भटक्या विमुक्त समाजाला जाणीव होईल आणि खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेली स्वातंत्र्य समता बंधुत्व आणि न्याय या मूल्यांची खऱ्या अर्थाने जोपासना होईल असं मला वाटते हे काम करणे सोपे आहे मात्र त्यासाठी आंतरिक इच्छेची गरज आहे आपल्या बांधवांचे जीवन बदलले पाहिजे आणि त्यांना आपल्यासारखी इज्जत सन्मान मिळाले पाहिजे ही भावना ठेवणे गरजेचे आहे हे आत्मकथन सर्वांगीण दृष्ट्या परिपूर्ण आहे यात शंका नाही या आत्मकथनाच्या माध्यमातून लेखकाने मांडलेल्या नानाविध गोष्टी समाजाला तर एक वेगळा अनुभव देऊन जातात पण या लेखनाच्या माध्यमातून भिक्षेकरी डवरी गोसावी व भटक्या विमुक्त समाजातील नानाविध जाती उपजातींचा सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक, राजकीय विकास व्हावा ही अपेक्षा या निमित्ताने पूर्ण झाली पाहिजे ही एक भावना आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने प्रस्थापित समाजाचं माणूस पण जिवंत आहे,हे लक्षात येईल.

# सायबर गुन्हेगारांचे अदृश्य चेहरे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**सध्याचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. या युगात सोशल मीडियावर ऍक्टिव्ह राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवून देण्याची चढाओढ लागलेली असते. त्यातही तरुण वर्ग तर सोशल मीडियाच्या आहारीच गेला आहे. सोशल मीडियावर आपले फॅन फॉलोअर्स कसे वाढतील? आपल्या पोस्टला जास्तीतजास्त लाईक आणि शेअर कसे मिळतील याकडे तरुणांचे लक्ष असते. मात्र काही वेळा हेच जास्त फॅन फॉलोअर्स असलेले अकाउंट सायबर गुन्हेगारांना आकर्षित करतात आणि यांना धोका दिला जातो. सायबर गुन्हेगार ज्यांचे जास्त फॅन फॉलोअर्स असतील अशा तरुणांना स्टार्टअप कंपनी आपल्या प्रोडक्टच्या जाहिराती करण्यासाठी संपर्क करतात त्यातही या सायबर गुन्हेगारांचे लक्ष तरुण मुलींवर अधिक असते.**

सुंदर आणि जास्त फॅन फॉलोअर्स असणाऱ्या तरुण मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी सायबर गुन्हेगार आपण मोठ्या कंपनीतून बोलत असून या मुलींचे फेसबुक आणि इंस्टाग्राममवरील रिल्स आणि व्हिडिओ पाहून संपर्क केल्याचे सांगतात. मुलींचा व्हिडीओ कंपनीला आवडला असून तुम्हाला आमच्या कंपनीच्या प्रोडक्टसाठी जाहिरात करण्यासाठी निवडले असल्याचे सांगून आणखी व्हिडीओ आणि रिल्स पाठवण्यास सांगतात. बहुतेक वेळा असा संपर्क ईमेल द्वारे केला जातो. मुलीही जणू आपण मॉडेल बनलो आहोत अशा आविर्भात त्यांनी सांगितल्याप्रमाणे व्हिडीओ पाठवतात व इथेच फसतात. व्हिडिओ पाठवल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा त्या मुलींना मेल येतो हा मेल त्यांचाच मॉर्फ केलेला व्हिडिओ असतो. तो व्हिडिओ मॉर्फ करून अश्लील बनवलेला असतो. हा व्हिडीओ पाठवून मुलींना ब्लॅकमेल केले जाते. हे अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन मुलींकडे पैशांची मागणी केली जाते. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्या मुली पैसे देऊन स्वतःची सुटका करून घेतात मात्र ज्यांना पैसे देणे शक्य होत नाही त्या मुली बदनामीच्या भीतीने स्वतःच आयुष्य संपवून टाकतात . आजवर देशात अनेक मुली या सायबर गुन्हेगारांच्या कारस्थांनाना बळी पडल्या आहेत. विशेष म्हणजे हे ब्लॅकमेलर सायबर गुन्हेगार अदृश्य असल्याने सायबर क्राईमकडे तक्रार करूनही यांचा छडा लागेलच असे नाही. अशा अनेक केसेस पोलिसांच्या सायबर क्राईम सेल कडे दाखल असूनही अनेक गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. अशा सायबर गुन्हेगारांचा छडा लावणे पोलिसांसाठी डोकेदुखीची बाब बनली आहे. पोलिसांच्या सायबर सेलकडून अशा आमिषाला बळी पडू असे आव्हान केले जातेतरीही अनेक तरुण आमिषाला बळी पडतात. अलीकडे तर हे प्रमाण खूप वाढले आहे त्यामुळे सोशल मीडियावर वावरताना खूप सतर्क राहणे आवश्यक आहे. सायबर गुन्हेगारांची ही टोळी आपली सोशल मीडियामध्ये आपण टाकत असलेल्या पोस्टवरुन आपली मानसिकता ओळखून पद्धतशीरपणे जाळे टाकतात व फसवतात त्यामुळे सोशल मीडियावर पोस्ट टाकताना काळजी घ्यावी. सोशल मीडियावर ओळखीच्याच लोकांना फॉलो करावे. अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. अनोळखी लोकांच्या मेल आणि फोन कॉलला उत्तर देऊ नये. स्वतःच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक बाबी सोशल मीडियावर टाकू नये. सोशल मीडियावर वावरताना जर सतर्क राहिले नाही तर सायबर गुन्हेगारांचे हे अदृश्य चेहरे आपल्याला घेरण्यास टपून बसलेलेच आहेत.

# पंढरीची वारी : वर्ण व्यवस्थेचा पाया उद्‌ध्वस्त करणारी साधना !



हेमंत टाले
मो. 975807632

आधुनिक केसरी


**मित्रांनो जय हरी, सत्य कथन हा इतिहासाचा आत्मा आहे. इतिहासातून आपल्याला प्रेरणा घेऊन भविष्याचा वेध घ्यायचा असतो. प्रेरणा चुकली तर भविष्याचा वेध घेता येत नाही. म्हणून आपला इतिहास, आपला सांस्कृतिक संघर्ष, आपल्या संत आणि महापुरुषांचा जीवन संघर्ष, कुठल्या व्यवस्थेशी होता हे नीटपणे आपण समजून घेतलं पाहिजे. जर इतिहास नीटपणे समजून घेतला नाही तर ज्यांनी आपल्या संत महापुरुषांच्या वाटेत काटे पेरले, दगड धोंड्यांची रास उभी केली, वेगवेगळ्या प्रकारचे कटकारस्थान करून त्यांना जगणं मुश्किल केलं, प्रसंगी त्यांची हत्या करून त्यांना संपविण्याचा सुद्धा कधी यशस्वी तर कधी अयशस्वी प्रयत्न केला, अशा शत्रूच्या गोटातील लायकी नसलेल्या म्हणजेच नालायक व्यक्तीला आपले लोक आपल्या महापुरुषांच्या तुलनेत अर्थात गुरुस्थानी मानतात.**

(अलीकडेच एका अशाच लायकी नसलेल्या व्यक्तीला तुकोबांच्या रथात बसवण्यात आले होते) मग हा गुरु आपल्या लोकांचा ब्रेन वॉश करून त्यांना आपल्या अंकित करून घेतो. अशा पद्धतीने एका जीत्याजागत्या माणसाचे एका रोबो मध्ये रूपांतर केल्या जाते. शेवटी हे रोबो कितीही चांगले असले, कदाचित त्यांच्या गळ्यामध्ये माळ असेल,हातात टाळ असेल,ते देवाचं नावही घेत असतील; परंतु ते रोबोच असतात आणि हे मानवी रोबो त्याच महापुरुषाच्या संप्रदायातील बदल स्वीकारणारे परिवर्तनशील आणि बदल घडवून आणणाऱ्या क्रांतिकारी लोकांच्या विरुद्ध उभे राहतात. प्रसंगी त्यांच्या हत्या करतात. ज्यांची हत्या झाली आणि ज्याने हत्या केली दोघांचीही प्रेरणा एकच, पण इतिहास नीटपणे समजला नसल्यामुळे भक्ताचा अतिरेकी होतो इससे सिद्ध यही होता है| भक्त कभी राक्षस बनता है||राष्ट्रसंत|| परिणाम काय होतो तर कलबुर्गी, गौरी लंकेश, पानसरे आणि दाभोळकर यांची उदाहरणे डोळ्यासमोर आहे. आता वारी नीटपणे समजून घेऊ या ! पंढरी हे महाराष्ट्रातील संतांचे माहेरघर आणि पांडुरंग हे महाराष्ट्रातील तमाम वारकऱ्यांचे महादैवत. देव ही सर्वसामान्य लोकांची मानसिक गरज आहे. हे संतांनी ओळखलं होतं आणि म्हणून संतांनी ईश्वराची संकल्पना बदलवून सांगितली. धकाधकीचा काळ पाहिला| संतांनी उपास्यात बदल केला|| ग्रामगीता|| सर्वसामान्य माणसाच्या भावविश्वातील सर्वोच्च स्थानी कुणाला बसवायचं हे संताना बरोबर माहीत होतं. पंड्ये पुजारी भट भिक्षुकांचा देव हा सोन्याने मढवलेल्या सिंहासनावर कुलूप बंद आणि पहारेकऱ्यांच्या गराड्यात बंदिस्त होता. शूद्रातीशूद्रांना त्यांचं मुखदर्शन तर दूरच पण आसपास फिरकण्याचाही अधिकार नव्हता. असा भटाळलेला आणि विशिष्ट काळामध्ये आमच्या आईच्या स्पर्शाने विटाळल्या जाणारा देव वाळवंटात आणून संतांनी भक्त आणि भगवंत दोघांनाही या ब्राह्मणी पाशातून मुक्त केलं आणि तो विठ्ठल सर्वसामान्यांचा सखा बनला.

पंड्यांचा देव सर्वसामान्यांचे श्रम लुटून पुजाऱ्याचं ढेबरं भरणारा शोषक तर आमच्या वारकरी संप्रदायाच्या संतांचा पांडुरंग विठ्ठल थकल्या भागल्या जीवांच्या जखमांवर हळुवारपणे फुंकर मारून प्रसंगी जनीच्या पायातील काटा काढून दुःख मुक्त करणारा मायाळू कनवाळू परमेश्वर. तो कुणाचा बंधू, तर कुणाचा सखा. स्पृश्य-अस्पृश्य कुणालाही पारखा नसणारा सर्वांचा पाठीराखा. पंड्या पुजाऱ्यांनी ईश्वर प्राप्तीचे सांगितलेले मार्ग हे गोरगरीब कष्टकरी शेतकऱ्यांचे शोषण करून त्यांना दुःखाच्या खोल दरीत लोटून



देणारे होते. पूजेच्या वेगवेगळ्या पद्धती गोरगरिबांचे खिशे कापत होत्या. या पोट भरू दलालांनी व्रतांची इतकी पेरणी समाजामध्ये केली होती की ३६५ दिवसही पुरत नसे. या व्रतांच्या ओझाने सारा बहुजन समाज दबून गेला होता. गोरगरिबांनी श्रमातून मिळवलेला आनंद लुटून हे बडवे मंदिरातली आपली सर्वोच्च जागा अबाधित ठेवण्यासाठी पिढ्यान पिढ्या खोट्या नाट्या कथा कहाण्या रचुन रात्रंदिवस धडपडत होते. आमच्या वारकरी संप्रदायाच्या सगळ्या संतांनी वरील व्रत आणि मतांचा जोरदार धिक्कार केला. गोरगरीब शेतकरी, कष्टकरी, कामकरी जनसामान्यांची भटा भिक्षुकांनी निर्माण केलेल्या खोट्या नाट्या कथा कहाण्या, व्रतवैकल्य, पूजा, विधि, दानदक्षिणेतून मुक्त करण्यासाठी नामस्मरणाचा सोपा मार्ग त्यांनी जनसामान्यांना सांगितला. तुका म्हणे सोपी केली पायवाट या तुकोक्तीनुसार ईश्वर प्राप्तीचा सगळ्यात सोपा मार्ग आमच्या वारकरी संप्रदायाच्या सगळ्या संतांनी सांगितला. पंढरीची वारी इतकी साधी सोपी आणि सहज घडलेली घटना नव्हे. वारी म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याच्या आधी इथल्या मनुवादी ब्राह्मणी धर्म व्यवस्थेने निर्माण केलेल्या क्रमवार विषमतेचा अर्थात वर्ण धर्माचा मूळ पायाच उखडून टाकणारी आमच्या वारकरी संप्रदायाच्या संतांनी केलेली सर्वोच्च समाजीक क्रांती होय. वर्ण धर्माने संपूर्ण मानव समूहाची कप्पेबंद विभागणी केली होती. नुसतं उच्चवर्णीय लोकांनाच जाती आणि वर्णाचा अभिमान होता असं नाही तर या वर्ण व्यवस्थेच्या शेवटच्या पायरीवर असणारा महार आणि त्याच्या वर असणारा जो मांग होता त्या मांगाला आपल्या वर किती लोक आहेत म्हणजे आपल्याला या व्यवस्थेने किती नीच ठरवले हे कळत नव्हतं. परंतु त्याला त्या महारापेक्षा मी श्रेष्ठ आहे याचा अभिमान होता. इकडे पंढरीच्या वारीत मात्र वेगळचं चित्र होतं. वर्ण अभिमान विसरली याती एक-एका लोटांगणी जाती जिथे एखाद्या व्यक्तीच्या अंगाचा वारा आपल्याला शिवला तरी विटाळ होत असे. पण पंढरीच्या वारीमध्ये हेच लोक एकमेकाला लोटांगण घालत होते. एकमेकाला आलिंगन देत होते. याती कुळ माझे गेले हरपोनी ही अवस्था जनसामान्यांची झाली होती. वारकरी संप्रदायाच्या संतांच्या साहित्याने जनसामान्यांचे असे अंतर्बाह्य परिवर्तन घडवून आणले होते आणि म्हणून पंढरीची वारी म्हणजे इथल्या ब्राह्मणी धर्म व्यवस्थेच्या मुस्काडात मारलेली जोरदार चपराक होय. पंढरीची वारी म्हणजे इथल्या जनसामान्यांनी बंधमुक्तीचे टाकलेले पहिले पाऊल होय. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य म्हणजे महाराष्ट्रातल्या तमाम वारकरी संप्रदायाच्या संतांनी केलेल्या समाजक्रांतीची देण होय आणि म्हणून इथल्या ब्राह्मणी वर्ण धर्माचा पाया मुळासकट उखळून टाकणारी अमोघ साधना म्हणजे पंढरीची वारी होय.



# बहुजनांचा कैवारी, लोकराजा शाहू !

आधुनिक केसरी

बहुजन हिताय - बहुजन सुखाय या तत्वाचा अंगीकार करुन सर्वसामान्य,गोरगरीब,दीनदलितांचे दुःख जाणून घेवून ते समाजात परखडपणे मांडणारे लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची जयंती २६ जून रोजी सर्वत्र उत्साहात साजरी केली जाते समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन कला,क्रीडा,सांस्कृतिक वारसा जपून साऱ्या महाराष्ट्रात करवीर नगरीचे नाव अजरामर करुन जातीय विषमता,अज्ञान, दरिद्र्यपणा तसेच जीवनातील अंधार नष्ट करणारे छत्रपती,राजर्षी या उपाधीने नावाजले गेलेले शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत जयसिंगराव घाटगे असे होते. तर त्यांच्या आईचे नाव राधाबाई होते.१८८९ ते १८९३ या काळात शाहू महाराजांनी आपले शिक्षण पूर्ण केले.१ एप्रिल १८९१ साली ते लक्ष्मीबाई खानविलकर यांच्याशी विवाहबद्ध झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १८९४ साली त्यांचा राज्याभिषेक करण्यात आला. बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले. संस्थानातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत दिले. स्त्री शिक्षणासाठी देखील ते नेहमी आग्रही होते. जातीभेद आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली. अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवणे बंद केले.१८९६ साली पडलेला दुष्काळ आणि त्यानंतर आलेली प्लेगची साथ, तशा संकटसमयी शाहू महाराजांनी दुष्काळी कामे, स्वस्त धान्य दुकाने, निराधार आश्रमाची स्थापना केली. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उच्च शिक्षणासाठी आणि मूकनायक वृत्तपत्रासाठी सहकार्य केले. राधानगरी धरणाची उभारणी केली आहे शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. त्यांनी आपल्या जीवनकार्यात समाजातील सर्व घटकांना समाविष्ट करून घेतले. आपल्या अधिकारांचा फायदा बहुजन समाजाला मिळवून दिला. त्यांच्या न्यायासाठी आणि शिक्षणासाठी ते नेहमी झटले.त्यांच्या सर्वाभिमुख विकासाच्या दृष्टिकोनामुळे इतिहासकारांनी त्यांची नोंद लोककल्याणकारी राज्यकर्ता म्हणून केली आहे.६ मे १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. आपल्या २८ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी शिक्षण, कृषी, उद्योग, कला, क्रीडा व आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान आणि चालना दिली. अशा या राजर्षी व्यक्तिमत्त्वास विनम्र अभिवादन !

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

# राजर्षी शाहू महाराजांसारखे कार्य जमेल काय ?



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**काळाच्या पुढे जाऊन दोनशे वर्षांचे अंदाज येतात तेच खरे द्रष्टे, महापुरुष! राजेशाही आणि स्वतः राजा असतांना कमालीची निस्पृहता, कणवपूर्ण हृद्य आणि शेवटच्या माणसाचे सर्वांगीण उत्थान झाले पाहिजे या न्यायाने राज्य चालवणारे महापुरुष म्हणजे लोकमान्य राजर्षी शाहू महाराज! आपण कोण? आपले कार्य काय? याचा सर्वतोपरी विचार अंगीकारून आपल्या राज्यांत स्वतः लक्ष घालून अंमलबजावणी करणारे लोक विरळा! छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता अहिल्यादेवी होळकर आणि नंतर नाव येते राजर्षी शाहू महाराजांचे! वयाच्या दहाव्या वर्षी १८८४ साली कोल्हापूर-करवीर संस्थानच्या गादीवर विराजमान झालेले राजर्षी शाहू महाराजांचा प्रवास काही इतका सोपा नव्हता. दहा वर्षे ब्रिटीशांनी करवीर संस्थानचा कारभार पहिला.**

दरम्यानच्या काळात युवा शाहू महाराजांना आपल्या कार्य-कक्षेचे बऱ्यापैकी ज्ञान झाले होते. युवा महाराजांनी शरीर आणि मनाची मजबूत जडणघडण करून घेतली. कुस्ती, दांडपट्टा, घुड्सवारी, मल्लखांब, कब्बडी, पोहणे इत्यादी मैदानी खेळाबरोबरच इंग्रजी शाळेत शिक्षण पूर्ण करून ते तन-मन-ज्ञानाने सक्षम झाले. बलदंड देहयष्टी, रुबाबदार बाणा, घारे डोळे आणि भारदस्त आवाजामुळे महाराजांचे व्यक्तिमत्व लाखांत उठून दिसायचे! सज्ञान होताच ब्रिटीश शासनाकडून राज्याची सर्व सूत्रे शाहू महाराजांकडे आली. दैदिप्यमान राज्यारोहण सोहळा झाल्याबरोबर महाराज आपल्या कार्यात सक्रीय झाले. उर्मट आणि उन्मत्त झालेला नौकरवर्ग अगोदर सरळ केला. "आमची सर्व प्रजा सतत स्तूप राहून सुखी असावी, तेचे कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे संस्थानची हर एक प्रमाणे सदोदित भरभराट होत जावी" अशी सनद प्रकाशित करून आपले लोकोद्धारचे मनसुबे महाराजांनी उघड केले. संपूर्ण सत्ता हाती आल्याबरोबर सामाजिक समतेचे कार्य करतांना आगरकर, नामदार गोखले, न्या.रानडे आणि सावित्रीबाई-ज्योतीराव फुले यांच्या विचार कार्याचा वसा-वारसा पुढे न्यायचे ठरवले. सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन करून कर्मकांड-भेदाभेद हद्दपार करून करवीर राज्यातील कडेकोट वर्ण व्यवस्था आणि जातीय चौकट मोडीत काढली. राज्यातील विहिरीवर अथवा कुठल्याही पाणवठ्यावर कुणीही पाणी भरत असेल किंवा पीत असेल तर कसलाही बाट धरल्यास, मज्जाव केल्यास त्यास कठोर शासन केले जाईल असे फर्मान काढले. "पाण्याला विटाळ होतो का ?" हा मूलगामी प्रश्न विचारून प्रस्थापितांना निरुत्तर केले. एवढेच नाही तर सर्वांसमोर एका महार बाईच्या घागरीतील पाणी पिऊन सर्वांची तोंडे बंद केली. या शिवाय ऐन दिवाळीच्या दिवशी महार जातीच्या मुलाला आपल्या रथात बसवून सर्वांनाच दिवाळी सन साजरे करण्यासाठी मदत केली. आपल्या दरबारातील मोत्तदार महाराची भाजी-भाकरी खाऊन एक आदर्श निर्माण केला. उच्च विद्याविभूषित डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे घर शोधून त्यांच्या घरी जाऊन त्यांची गळाभेट घेऊन त्यांच्या कार्याला बळ दिले. अंधश्रध्दा, कर्मकांड, दांभिकपणा, देवभोळेपणा, थोतांड यावर सडेतोड बोलणारे प्रबोधनकार के.सी.ठाकरे यांचे ते घनिष्ठ मित्र होते. गावकुसाबाहेरील हजेरी बंद करून महार वतनांचे समूळ उच्चाटन, मुस्लीम हिताचे रक्षण, अस्पृशांना नौकरी, आंतरजातीय विवाहाला चालना, फासेपारध्यांना माणसात आणले. विविध जातींच्या परिषदेत भाग घेऊन आपले परखड विचार मांडले. अशाप्रकारे उक्ती व कृतीने वर्णव्यवस्थेला हद्दपार करून तमाम माणसांना एका रेषेत आणण्याचे महत्कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य सर्वात महत्वाचे



असून गोर-गरीब-शोषित-पिडीत-वंचित-उपेक्षित वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षण विषयक सोयी सवलती दिल्या. सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. सर्वांना लिहिता-वाचता आले की लोकांचा विवेक जागा होईल याची त्यांना खात्री होती. शिक्षण संस्थांची निर्मिती करुन त्यांना मोफत शिक्षण दिले. मराठा, जैन, लिंगायत, मुस्लीम, दैवज्ञ, नामदेव, पांचाळ, ख्रिश्चन, ब्राह्मण, आर्य, प्रभू , वैश्य, ढोर, चांभार, वैदुक, सुतार, नाभिक, सोमवंशी, वंजारी, चोखामेळा, ताराबाई इत्यादी नावाने तत्सम जातींच्या मुलांसाठी दरमहा अनुदानित बोर्डिंग-वसतिगृहे चालू करून त्यांच्या शिक्षणाला संरक्षण दिले. शिक्षण हेच समाजाच्या सर्वांगीण विकासाचे माध्यम आहे हे कळल्यामुळे त्यांनी शिक्षणावर विशेष भर दिला. उत्तम शिक्षकांचा सन्मान करून प्रोत्साहन दिले. कामचुकार कामगारांना कामावरून काढून टाकले, काहींना दंड आणि शिक्षेची तरतूद करून प्रशासनावर पकड मजबूत केली. गावोगाव अनेक शाळा सुरु केल्या, त्यात १९२१-२२ साली २२००६ विध्यार्थी मोफत शिक्षण घेत होते. राज्याच्या शिक्षणावरील खर्चात वाढ केली. त्याच्या जोडीने गावोगावी कुस्त्यांचे फड बांधून मल्लविद्येला प्रोत्साहन दिले. आपल्या राज्यातील नागरिक तनामनाने समृद्ध असला पाहिजे हीच महाराजांची तळमळ होती. स्त्री शक्तीला शिक्षण आणि संरक्षण देऊन बालविवाह पूर्णतः थांबवले. विवाह नोंदणी अनिवार्य केली. विधवा पुनर्विवाह कायदा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, घटस्फोट कायदा, अनौरस संतती व देवदासी प्रतिबंधक कायदा, शिमग्यातील शिव्यांना प्रतिबंध करणारा कायदे असे कायदे करून अनिष्ठ रूढी-परंपरांना पायबंद घातले. ज्योतिबा फुल्यांच्या वारसा राजर्षी शाहू महाराजांनी मोठ्या ताकदीने पुढे चालवला. याला जोडून राज्यात सर्वप्रथम आरक्षण लागू केले. कामचुकारांना दंड, रजेवर निर्बंध, बदली नाही तर बढती, लाच घेण्यावर कडक बंदी असे कायदे करून शाहू महाराजांनी सर्वच क्षेत्रात आपला वचक बसवला. सगळे राज्य सुतासारखे सरळ केले. असे समाजभिमुख निर्णय घेणारे असल्यामुळे लोकांनीच त्यांना राजर्षी ही पदवी बहाल केली! मित्रहो, या उलट देशात आणि राज्यांत आज काय चालू आहे ? एकीकडे शिव-फुले-शाहू-आंबेडकरांचा देश-राज्य म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्याच कार्याची पायमल्ली करायची! सर्वत्र विरोधाभास सुरु आहे! लोकशाहीची ७५ वर्षे ओलांडतांना खरंच आपण प्रगती करताहोत का ? पूर्वजांनी आखून दिलेल्या सर्वच आदर्शांची पार धूळधाण करून टाकली आहे! दुर्दैवाने आज जाती घट्ट होताहेत! सहिष्णुता मावळत असून धार्मिक कट्टरता पेरली जात आहे. सरकारी शाळा बंद करून आणि खाजगी शाळांना प्रोत्साहन देऊन मोफत शिक्षणासारखा मुलभूत हक्क गोठवला जात आहे. प्रचंड महागाई, बेरोजगारीने समाज त्रस्त आहे. तरुण व्यसनाधीन होत आहे. तरुणांच्या हाताला काम नाही. विनानुदानित शाळांवर काम करून शिक्षक बिनपगारी निवृत्त होत आहेत, मरत आहेत. खाजगी शिक्षण प्रचंड महागले आहे. भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. कुणाचे कुणावर तिळमात्र नियंत्रण नाही. मालाला योग्य भाव नसल्यामुळे रोज शेकडो शेतकरी गळफास घेऊन मरताहेत. नवीन नौकर-शिक्षक भर्ती बंद आहे. खेड्यापाड्यात जायला कुणी शिक्षक तयार नाही. सर्वत्र पोपटपंची सुरु आहे. राज्यकर्ते एकमेकांना शिव्या घालण्यात आणि एकमेकांचे भ्रष्टाचार बाहेर काढण्यात व्यस्त आहेत. कोण जास्त मोठा भ्रष्टाचारी ? हेच ते काय लोकांनी ठरवायचे आहे! असे असतांना तेच लोक पुन्हा निवडून येणार आणि पुन्हा लोकांवर सत्ता गाजवणार! असे होत असेल तर मग सज्जन-प्रांजळ-प्रामाणिक-शांत-प्रज्ञाशिल-इमानदार लोकांनी कसे जगायचे ? असा आभाळाएवढा प्रश्न घेऊन सामान्य माणूस केवळ दिवस काढतो आहे! महापुरुषांचे स्मरण करतो आहे! खरंच, आपल्याला राजर्षी शाहू महाराजांसारखे कार्य जमेल काय ? हाच प्रश्न मलाही पडलाय! हतबलतेने पुन्हा त्या महामानवाची वाट पाहतोय! जय भारत!

# प्रतिगामी विचारांची चिकित्सा : बा, तथागता !



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**आंबेडकरी साहित्य क्षेत्रातील एक दमदार आणि कसदार नाव म्हणजे डॉ. म. सु. पगारे हे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने त्यांनी साहित्य,समीक्षा, वैचारिक,काव्य व इतर क्षेत्रातही आपल्या अभ्यासू मांडणीने स्वतःचं अस्तित्व आणि दबदबा निर्माण केला आहे. साहित्य हे मानवतेशी निगडित असायला हवे या विचाराशी बांधील राहूनच त्यांनी त्यांच्या साहित्यातून आणि वाणीतुन स्वातंत्र्य,समता,बंधुता, न्याय बुद्धीप्रामाण्य, वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्याची पेरणी अगदी तटस्थपणे,निर्भीडपणे आणि वास्तविकपणे उजागर केलेली दिसून येते. त्यांनी अनेक वृत्तपत्राच्या स्तंभ लेखनातून व विविध ग्रंथाच्या माध्यमातून पुरोगामी म्हणजेच फुले,शाहू ,आंबेडकरी विचारांची पेरणी अगदी शिस्तबद्ध पद्धतीने केली आहे.**

**(मागील अंकावरून)** हे कवीने सांगितले आहे ते म्हणतात की, "तुझा बुद्धिवाद'अपंग'झाला तू सामर्थ्यशाली असूनही गुलाम बनलास तू दचकलास संकटांना; घाबरलास संघर्षाला, आणि भयभीत झालास मृत्यूने! तुला जाणवले तुझे सामर्थ्य; तुझा मेंदू तुझा बुद्धिवाद, अपूर्ण आहे संकटासोबत सामना करण्यासाठी मृत्यूसोबत भिडण्यासाठी! वेदनेनं तळमळलास तू तुला तुझे अस्तित्व सामर्थ्यहीन जाणवले, म्हणून काल्पनिक शक्तीचा आधार शोधत तू पळालास आणि पळतच राहिलास पळतोच आहेस संकटापासून संघर्षापासून 'भय'सोबत घेऊन" मानवी कल्याणासाठी किंवा स्वतःचा उद्धार करण्यासाठी बुद्धांनी अष्टांगिक मार्ग सांगितला आहे. तो मार्ग मानवाने आपल्या जीवनात अंगी बाळगला तर त्याचे जीवन समृद्ध होण्यास मदत होते. अशा अनेक माणसे असतात की, त्याला योग्य अशी दृष्टी नसते म्हणजे काय चांगले आणि काय वाईट हे कळत नाही. त्यामुळे आपल्याला योग्य निर्णय घेता येत नाही. योग्य विचार करता येत नाही. अविचाराने वागताना अनेक माणसे पावलो पावलो गणित दिसतात आणि फसतातही. माणसाला माणूस म्हणून घ्यायचे असेल तर त्याच्याजवळ प्रज्ञा, शील, करुणा असली पाहिजे. ती आपल्या वागण्या बोलण्यातून दिसली पाहिजे. त्याच वेळेस तो माणूस ठरत असतो. आजही हल्ली माणूस माणसासारखा वागताना किंवा आचरण करताना दिसत नाही. तो चार पायाच्या प्राण्यासारखा बुद्धीहीन वागताना दिसतो आहे. नीतीहीन भ्रष्ट आचरण करताना दिसतो. त्याच्याजवळ असणाऱ्या विवेकाने तो दुःख जाणून घेत नाही. खरे तर त्यांनी त्याच्याजवळ असणारे कौशल्य, आणि विवेक याने इतरांचे दुःख जाणून घेऊन माणसासारखे वागायला हवे हाच बुद्ध विचार सांगतो. म्हणजे तो संस्कारशील असायला हवा. म्हणजेच आपली उपजीविका ही आपण वाईट मार्गाने न करता सन्मानानेच केली पाहिजे. त्यासाठी मनाला सतत जागृत ठेवून वाईट विचारांना दूर केले पाहिजे तरच मन प्रसन्न राहते व मानवी जीवनाचा विकास होतो हे महत्त्वाचे तत्त्वज्ञान बुद्धाने सांगितले आहे. याविषयीचा विचार डॉ. पगारे यांनीही आपल्या या दीर्घ कवितेतून मांडलेला दिसतो आहे ते म्हणतात की, "'बा, तथागता!' माणूस हा; 'मानवी' संस्कारांनी परिपूर्ण असला पाहिजे त्यासाठी प्रज्ञावान माणसाला शील संवर्धनातून तू दाखविलास 'आर्य अष्टांगिक मार्ग' या मार्गाने चालल्यावर, माणूस फक्त मानवी अवयवाने माणूस ठरत नाही; तर तो त्याच्या संपूर्ण विवेकी आचरणासह 'माणूस' ठरत जातो नीतिमान आचरणाचा. हे नीतिमान आचरण असते अति महत्त्वाचे चतुष्पाद प्राण्यापासून आचरणाने विभक्त करण्यासाठी, माणसाची ओळख असावी म्हणून. दुसऱ्याचे दुःख जाणारा चांगल्या गोष्टीसाठी कार्यासाठी सुखोपभोगाचा त्याग करणारा, नीतिमान माणूस संस्कृतीचे संवर्धन करतो, तो कोणत्याही भेदाभेदांत अडकत नाही. त्याच्यासाठी विश्वकल्याणाच्या दिशा हीच मानवी संस्कृतीची आशा; तो मार्ग 'आर्य अष्टांगिक 'मार्ग! आजही देशातला समाजातला माणूस प्रचंड गुलाम झाल्यासारखा दिसतो आहे. तो तसा वागतही आहे. आचरण ही तशाच पद्धतीने करताना दिसतो आहे. आजही देशातली यंत्रणा माणसाला गुलाम बनवण्याचा भयभीत करण्याचा प्रयत्न करते आहे. देव,धर्म, अंधश्रद्धा, कर्मकांड, अध्यात्म याला कटाळून माणूस समाजात बुद्धीने वागण्या ऐवजी विषमतेने वागताना दिसतो आहे. यातूनच माणूस व समाज अस्थिर होताना दिसतो आहे. आपल्यामध्ये बुद्धीकौशल्य असूनही आपण त्याचा उपयोग करताना दिसत नाहीत त्यामुळे माणसाची कर्तबगारही दिसत नाही. तो या धर्माचा तो त्या धर्माचा तो या जातीचा तो त्या जातीचा यामध्येच माणूस संपूर्णपणे अडकून घेऊन गुलाम होत चालला आहे. त्यामुळे तो स्वतःच्या प्रगतीपासूनही कोसो दूर जाताना दिसतो आहे. कुठलाही माणूस स्वयंप्रज्ञ असतो. माणसांमध्ये कर्तबगारी गाजवण्याचे गुण असतात कारण तो इतर चार पायाच्या प्राण्यापेक्षा वेगळा असतो. बुद्धिवान असतो. माणसाच्या ठायी प्रेम,करूणा, बंधुता, संशोधनाचे गुण असतात. या गुणांनी माणूस आपली कर्तबगारी गाजवू शकतो. परंतु हल्ली धर्माच्या, पंथाच्या आणि प्रदेशाच्या अहंकाराने माणूस चांगुलपणापासून,मानवतेपासून कोसो दूर जाताना दिसतो आहे. त्यामुळे धर्म पंथापेक्षाही माणूस महत्त्वाचा आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. त्याने कुठलीही गुलामगिरी लादू नये हा बुद्धविचार कवी आपल्या कवितेतून सांगताना दिसतो,

"कौशल्याच्या जोरावर केले आहे गुलाम
माणसाने मोठ्यातील मोठ्या चतुष्पाद
प्राण्याला. माणसाचे बुद्धीकौशल्य हे निश्चित
आहे वेगळे इतरांपेक्षा.
माणूस कर्तबगारी गाजवू शकतो तसेच जोपासू
शकतो, क्तव्य देखील. माणसाच्या ठायी आहेत
वैशिष्ट्यपूर्ण गुण प्रेमाचे, बंधूतेचे,करूणेच, शोधाचे,
संशोधनाचे. त्यामुळे बनवणे गुलाम त्याने
कोणाचेही. कोणत्याही धर्माचे कोणत्याही पंथाचे
कोणत्याही लिंगाधिष्ठित अहंकाराचे कोणत्याही प्रदेश
प्राबल्याचे बनू नये गुलाम माणसाने कधीही.
कारण तो असतो स्वयंप्रज्ञ! त्याने लादू नये गुलामगिरी
इतारावर, तसे होऊ नये गुलाम कोणाचेही.

एकंदरीत तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाचा जो मानवतेचा, समतेचा, ममतेचा, स्वातंत्र्याचा, न्यायाचा, सर्वधर्मसमभावाचा, मानवी कल्याणाचा विचार आहे तो मानवी जीवन संस्कारशील करण्यासाठी आणि मानवी कल्याण साधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. हा विचार प्रत्येक माणसाने अंगी बाळगलाच तर त्याचे जीवन उन्नत झाल्याशिवाय राहणार नाही. बुद्धाचा विचार कुठल्या एका जातीचा किंवा कुठल्या एका धर्माचा नाही किंवा तो संकुचित नाही तर तो मानवी कल्याणाचा आहे. सर्वांना बरोबर घेऊन जाणारा आहे. विषमता निर्माण करणारा किंवा भेदाभेद निर्माण करणारा अजिबात नाही. माणसाने कसे वागावे, कसे राहावे, कसे आचरण करावे, कसे सदाचरण कसे करावे, कसे पंचशील तत्वाचे पालन करावे, आर्य अष्टांगिक मार्गाचे पालन करावे हे बौद्ध तत्त्वज्ञातच सांगितले आहे. त्याचबरोबर क्रोध, दुष्ट बुद्धी, द्वेष,मत्सर,लोभ,ढोंग,कपट, उद्धटपणा,गर्व,सुस्तपणा असे जे काही अनेक विकार आहेत. जे विकार मानवी जीवन उद्ध्वस्त करू शकतात त्या विकारापासून मुक्ती मिळवणे हेही बौद्ध धम्माचे तत्त्वज्ञान आहे. अशा सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, वैचारिक व विविध क्षेत्रातील विषयावर बुद्धांनी प्रवचने देऊन मार्गदर्शन केलेले आहे. तो विचार माणसाला माणूस बनविण्याचा आहे. तो विचार अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जाणारा आहे. तो विचार विज्ञानवादी दृष्टी मानवी मनात निर्माण करणारा आहे. म्हणून बुद्धाचा विचार हा प्रत्येक जाती धर्मातील माणसाच्या हिताचा आहे. हे प्रत्येकाने ध्यानात ठेवायला हवे आणि तोच विचार किंवा तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाचे जीवन चरित्रच काव्यात्मक पध्दतीने डॉ.म.सु. पगारे यांनी आपल्या' बा, तथागता!'या दीर्घ खंडकाव्यातून अत्यंत बारकाईने आणि चिकित्सक पद्धतीने मांडलेले आहे. तो विचार प्रत्येकाला प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारा आहे यात तीळ मात्र शंका नाही.




# शाश्वत शेती काळाची गरज



डॉ. विलास इप्पर
संपर्क क्र. : 9322185214

आधुनिक केसरी

**भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. नैसर्गिक वातावरण, शुध्द हवा, डोंगर दऱ्या, गुरे वासरे, हिरवी रांन वृक्ष, असे विविध देखणी नयनरम्य दृष, अशा विविध गुणांनी नटलेल्या कृषी परिसराचे वातावरण मन प्रसन्न करून टाकते. पण वास्तवात मात्र या व्यवसायात राबणारा शेतकरी आणि शेतमजूर मात्र विविध कारणाने हैराण आहे. शेतकरी विविध प्रश्नांना कित्येक वर्षापासून सामोरे जात आहे आणि जन्मजात समस्यांचा सामना करत आहे. महात्मा फुले यांनी "शेतकऱ्याचा आसूड" या पुस्तकात शेतकऱ्यांचा विविध प्रकारच्या समस्यांचे तत्कालीन परिस्थितीचे जे वर्णन केले होते ते आजही लागू पडते.**

**वाढता कर्जबाजारीपणा :**

२०११ च्या जनगणना अहवालानुसार भारतात जवळजवळ ८० टक्क्यांपेक्षा जास्त शेतकरी पाच एकरांपेक्षा कमी जमिनीवर काम करतात. त्यामुळे लहान शेतकरी हाच कृषी उद्योगाचा कणा आहे. असे असूनही, शेती हा एक अस्थिर आणि खर्चीक व्यवसाय बनला आहे. अनेक लहान शेतकऱ्यांना उपजीविका भागवणे तसेच गरिबीच्या चक्रातून सुटका करून घेण्यासाठी उत्पन्नाचे इतर स्रोतांचा आधार घ्यावा लागत आहे. परिणामी अनेक शेतकरी कुटुंबे उत्पन्नाच्या दुसऱ्या स्रोतासाठी शेती व्यवसायातून बाहेर पडत आहेत. दुसरे, बदलते हवामान आणि शेतीमालाची विक्री व्यवस्था या दोन्हींतील जोखीम लहान शेतकऱ्यांचे जीवनमान अधिकच अस्थिर बनवत आहे.

शेतीमाल घेण्यासाठी गुंतवणुकीचा वाढलेला खर्च, सिंचन व्यवस्थेचा अभाव, दुष्काळ, अतिवृष्टी, पूरस्थिती, रोगराई आणि शेतीमाल परताव्यातून मिळणारे अपयश हे सर्व घटक शेती व्यवसायात अव्यवहार्यता येणे आणि शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला कारणीभूत ठरतात. याव्यतिरिक्त, शासनाचे धोरणे अनुकूल नसणे आणि बाजारपेठेत शेतीमाल विक्री व्यवस्थेतून होणारी लूट असे घटक शेतकऱ्यांचे उत्पन्न घसरवत आहेत. शेतीमालाची विक्री करण्यासाठी हक्काची आणि दराची हमी असणारी बाजारपेठ उपलब्ध नाही.

शेतीवरील खर्च ( शेतीतील गुंतवणूक ) आणि मिळणारे अस्थिर उत्पन्न यामुळे अनेक शेतकऱ्यांना आणखीच कर्जबाजारी व्हावे लागत आहे.

या पेचप्रसंगावर कशी कराल मात ?

कृषी क्षेत्रातील उत्पादकतेची क्षमता असूनही, शेतीमधील कमी उत्पादकता भारतातील शेतकऱ्यांमध्ये अडचणी आणि गरिबीला कारणीभूत ठरते. कमी उत्पादकतेच्या समस्येवर शेतीतील वैज्ञानिक ज्ञान, शेतीचे काटेकोरपणे व्यवस्थापन आणि नियोजन करणे, गुंतवणुकीतील अनावश्यक खर्च टाळणे, लहान शेतीचे यांत्रिकीकरण करणे, कृषी संबंधित जोडव्यवसाय, बाजार व्यवस्था सुधारणे, शेतमाल प्रक्रिया उद्योग निर्मिती करून विकेंद्रित स्वरूप विकसित करणे, शेतकरीकेंद्रित धोरणनिर्मिती करणे इ. अनेक उपाययोजना करता येऊ शकतात. दुसरे, शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन सुधारणे, कृषी निविष्ठांचा अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापन करणे, उत्पादनांचा दर्जा वाढवणे, हवामानाच्या समस्यांशी जुळवून घेण्यासाठी मार्गदर्शन करणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे, तसेच कृषी उत्पादकता आणि साठवण क्षमता सुधारण्याचे प्रयत्न करणे, शेतीमालासाठी साठवण केंद्र उभारणे, बदलत्या वातावरणानुसार पीक पद्धतीत बदल घडून आणणे, सहकार्य तत्त्वावर-गट शेती वाढविणे, कृषी घटकांमधील शासकीय-खासगी गुंतवणुकीच्या नवकल्पना राबविणे, स्थानिक पातळीवर अन्न प्रक्रियेतील उद्योगांना चालना देणे आवश्यक झाले आहे. कृषिमूल्य साखळीत शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कृषी संबंधित घटक परिघावर आणावे लागतील.

कृषी, संसाधने, सिंचन आणि ग्रामीण जीवनमान विकासावर लक्ष केंद्रित करणारे शासकीय धोरणदेखील अपेक्षित आहे. अर्थसंकल्पात शेतीसाठी केलेल्या तरतुदी, नवीन तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण योगदान, गरिबी निवारण्याचे प्रयत्न, शेतीचा पायाभूत विकास यासाठी प्रत्यक्ष खर्च होणे आवश्यक आहे. अलीकडे कृतिशील शेतकऱ्यांचे वैयक्तिक प्रयत्न आणि शासनाकडून विविध योजनांच्या लाभ या



आधारावर शेती आणि शेती संलग्न क्षेत्रात यशस्वी झालेल्या शेतकऱ्यांच्या गाथा आपण ‘वर्तमान पत्राचा’च्या माध्यमातून पाहत आहोत. अशाच यशस्वी गाथा लाखोंच्या संख्येने निर्माण होणे आवश्यक आहे. जेणेकरून इतरही शेतकऱ्यांना त्या मार्गदर्शक ठरतील. शेतीत सकारात्मकता येईल. कृषी व्यवसायात शाश्वत विकास होणे गरजेचे कृषी व्यवसायात वरील प्रमाणे विविध समस्या असल्या तरीही, हा व्यवसाय देशातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे विसरून चालणार नाही. कारण भारताची लोकसंख्या ही जगातील सर्वात जास्त आहे, आणि अन्न सुरक्षा करिता सरकारला आणि उर्वरित जनतेला अन्न धान्य पुरवठा करण्याचे काम हे क्षेत्र करते, त्यामुळे हा व्यवसाय टीकलाच पाहिजे, देशातील शेतकरी हा जगला पाहिजे, त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारने या क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न केलेच पाहिजे. शाश्वत शेतीच्या विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास झाला पाहिजे. सद्या शेतीमध्ये ट्रॅक्टर, मळणी यंत्र, पेरणी यंत्र इत्यादीचा वापर केला जातो, परिणामी मशागत पेरणीचा खर्च वाढला जातो, ग्रामीण भागातून अनेक कुटुंब शेतीत काम करण्या ऐवजी शहराकडे स्थलांतर होत आहेत, आणि शेतीत मात्र मजुरांची टंचाई भासत आहे, कित्येक मोठे शेतकरी तर मजूर मिळत नाहीत म्हणून हवालदिल झालेले दिसत आहेत. वाढते कुटुंब, वाटणी म्हणजे विभागणी झालेली शेती, त्यामुळे लहान लहान शेतकरी वाढत्या खर्चामुळे शेती व्यवसाय सोडून इतरत्र स्थाईक होताना दिसत आहेत.

देशातील बहुतांश भागातील शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते, थोडफार पाणी उपलब्ध झालेच तर, विजेची समस्या, ग्रामीण भागात विजेचा प्रश्न अत्यंत बिकट झाला आहे, तथापि शासनाने मोफत किंवा अत्यंत कमी दराने वीजपुरवठा केला पाहिजे. पाणी अडवा पाणी जिरवा, सारख्या योजनांचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे.

शेतकऱ्याना बाजारपेठेशी जोडले पाहिजे. सरकारने कृषी बाजारपेठ उपलब्ध करून दिली पाहिजे, शेती मालाला योग्य भाव मिळावा यासाठी सरकारने, वेगवेगळ्या संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे.

शेतकऱ्यांना प्रशिक्षण घ्यायला भाग पाडले पाहिजे, कृषी विद्यापीठे तथा इतर संशोधन केंद्र शेतकऱ्यांशी जोडून संवाद साधून या क्षेत्रात चैतन्य आणल पाहिजे.

थोडक्यात, कृषी व्यवसाय हा देशाचा मुख्य व्यवसाय असल्याने अधारभुत पायाभूत सुविधांचा विकास करून शेती व्यवसाय जो तोट्यात जात आहे, त्याला व्यवसायिक स्वरूप ( शास्वत विकास ) निर्माण करून दीला पाहिजे. त्यामुळे शासनाने विविध प्रकारच्या योजना रबाऊन शेती व्यवसाय भरभराटीला आणला पाहिजे. अन्यथा शेतकरी वर्ग हा कायम कर्जबाजारीपणा आणि इतर समस्यांनी ग्रस्त झालेला असेल. आणि एका बाजूने देश महासत्ता होण्याची स्वप्न बघत असला तरी शेतकरी मात्र कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या अवस्थेत असेल. परिणामी या व्यवसायात नैराश्य येतं आहे त्याचे अजून वाईट परिणाम दिसू शकतात. त्यामुळे कृषी व्यवसायाला शाश्वत शेतीचा आधार संजीवनी ठरू शकतो.

# शिक्षण हमी कायद्याची कठोर अंमलबजावणी करून आर्थिक लूट थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** इयत्ता पाहिली ते बारावी मोफत शिक्षण हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून निफाड तालुक्यातील पालकांची आर्थिक लूट थांबवावी अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निफाड तालुक्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरीता इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहे. या शाळा शासन अनुदानित असताना देखील पालकांकडून इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत देणगीच्या रूपात भरमसाठ रुपये उकळले जात आहे. याद्वारे संस्थाचालक बेहिशोबी लाखो रुपये जमवत आहे. जास्त आर्थिक लाभ व्हावा यासाठी मर्यादेपेक्षा जास्त प्रवेश दिले जात आहे याची चौकशी व्हावी. इंग्रजी माध्यमापेक्षाही जास्त प्रमाणात फी आकारली जात आहे. सर्व सामान्य गरीब पालक यामुळे मेटाकुटीस आला आहे. सदर शैक्षणिक संस्था प्रस्तापित राजकारणी यांच्या असल्यामुळे सामान्य नागरिक तक्रार करायला धजावत नाहीत. सध्या इयत्ता अकरावीसाठी नवीन प्रवेश सुरु आहे. शासन नियमानुसार गुणवत्ता यादी जाहीर करून गुणवत्तेनुसार प्रवेश देणे बंधनकारक आहे. तरी देखील कोणत्याही प्रकारची गुणवत्ता यादी जाहीर न करता अव्वाच्या सव्वा देणगी शुल्क आकारून प्रवेश देणे सुरु आहे. यामुळे गुणवत्ता असणाऱ्या परंतु आर्थिक परिस्थिती नसणारे विद्यार्थी प्रवेशापासुन वंचित राहणार आहेत. यामुळे आपण स्वतः डमी पालक व विद्यार्थी पाठवून प्रवेश प्रक्रिया व आर्थिक लूटमारीबाबत खात्री करून वरील संस्था चालक व त्यांचे कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेनेचे निफाड तालुका प्रमुख प्रकाश पाटील, विहिपचे तालुकाप्रमुख सूरज नाईक यांनी राज्याचे मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक, मा.शिक्षणाधिकारी माध्य. जि.प.नाशिक, शिक्षणाधिकारी प्राथ.जि.प.नाशिक अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



ग्रामीण भागातील शाळा देणगीच्या नावाखाली अव्वाच्या सव्वा फी आकारत असतील तर चौकशी करून कारवाई करणार आणि पालकांनी अशा स्वरूपाच्या लेखी तक्रारी दिल्यास शिक्षण विभाग नक्कीच कडक कार्यवाही करेल .
**भगवान फुलारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जि .प . नाशिक**

शिक्षणसंस्था देणगीच्या नावाखाली आर्थिक लूट करत असून त्याबाबत पालकांनी शिवसैनिकांकडे तक्रार केली होती, त्यामुळे अधिकारी वर्गाने होणारी पालकांची लूट तातडीने थांबवावी . यापुढेही शिक्षण संस्थांनी ज्यादा फी मागणी केल्यास पालकांनी शिवसेनेकडे निर्भीडपणे तक्रार करावी . त्याची नक्कीच दखल घेण्यात येऊन न्याय मिळावा यासाठी प्रयत्नशील राहू .
**प्रकाश पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख**



## डॉ. भागवत कराड यांचे शिरोडी येथे जंगी स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील शिरोडी येथे केद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ . भागवत कराड यांनी विलास इंगळे यांच्या घरी आवर्जुन सदिच्छा भेट दिली. या वेळी इंगळे यांनी जंगी स्वागत केले. या वेळीभाजपा जिल्हापाध्यक्ष संजय खंबायते, संजय गव्हाणे, किशोर पवार, सुभाष काळे सुरेश गुजराने, प्रकाश घुले, कैलास जाधव,प्रकाश निकम, पोपट इंगळे, राजेंद्र इंगळे, वाल्मिक इंगळे,भगवान इंगळे रामेश्वर बोरसे, अण्णा दादा बोरसे, दिलीप बोरसे, सुनील गाढे, योगेश इंगळे, समाधान गाढे शिरोडीची ग्रामस्थ उपस्थित होते .

## शिवसेना अल्पसंख्याक आघाडी गतिमान करणार : जैनोद्दिन

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** नांदेड जिल्ह्यात शिवसेना आल्यसंख्याक आघाडी ( गाव तेथे शाखा ) हा उपक्रम राबवण्या साठी नांदेड जिल्हयातील सर्व तालुक्याची भेटी दरम्यान दौरा गेल्या पंधरवाड्यात पूर्ण झाला आहे. शिवसेनेचा दि.19 जुनच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या आदेशन्यूवे शिवसेना नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे साहेब व नांदेड जिल्हा संपर्क प्रमुख बबनराव थोरात साहेब यांच्या सुचनेचा आदर करत दि . 26 जून 2023 पासून ते 24 जुलै 2023 ह्या एक कालावधीत प्रत्येक गाव, तालुका, शहर येथे झंजावात दौरा करून शिवसेना आल्पसंख्याक आघाडी उभी करण्याचे काम पायाला भिंगरी बांधुन शिवसेना घरोघर पोहचून शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या 27 जुलै च्या वाढदिवसाची भेट म्हणून नांदेड जिल्ह्यातून जास्तित जास्त आल्पसंख्याक समाज शिवसेनेत प्रवेश करून घेऊन आल्प संख्याक समाज शिवसेनेच्या पाठीशी किती ऊभा आहे या कार्याचा लेखा - जोखा पक्ष प्रमुखाना वाढदिवसांची भेट म्हणून देनार आहे असा ठाम निच्छय उराशि बाळगून दि . 26 जून 2023 पासून नांदेड जिल्ह्याच्या प्रत्येक गावात दौरा करनार आसून. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा एक पाईक शिवसैनिक कार्यकर्ता या नात्याने व नांदेड शिवसेना आल्पसंख्याक आघाडी जिल्हा प्रमूख म्हणुन या कार्याला गती देण्याचे काम करून जिल्ह्यात जास्तीत शिवसेना आल्प संख्याक आघाडी सदस्य नोंदनी करनार आसल्या चा. संकल्प हर घर शिवसेना हा उपक्रम या दौऱ्याच्या माध्यमातून शिवसेना भक्कम करण्याचा ठाम निच्छय जैनोदीन पटेल यांच्या कडून करण्यात आला आहे.

## वडी येथील घर जळालेल्या कुटुंबाला संसारोपयोगी वस्तू देत जपली माणुसकी

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथुन जवळच असलेल्या वडी ( ता. जिंतुर ) येथील प्रगतशील शेतकरी गंगाराम किसन हंबरे यांच्या घराला दि.५जुन रोजी विद्युत प्रवाहामुळे शॉर्ट सर्किट ने आग लागून या राहते माळवद १२खण, ४०क्विंटल कापूस, दाग दागिने, रोख रक्कम असे जवळपास २० लाख रुपयांसह घरातील संसार उपयोगी वस्तु व साहित्य जळून खाक झाले होते. या दुर्दैवी घटनेकडे शासनाचे १५दिवस लोटुन सुध्दा अजून लक्ष नाही, कोणतेही शासकीय आर्थिक मदत केली नाही. या सर्व गोष्टींवर विचार करून या कुटुंबास मदत म्हणून एक सामाजिक बांधिलकी म्हणून आपणही समाजाच देणं लागतो या भावनेतून तुळशीराम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कैलास गव्हाणे यांच्या संकल्पनेतून, तसेच विकास गव्हाणे यांचे पोलीस मित्र मंडळ ( संभाजीनगर ) , गोपाळ कृष्ण मित्र मंडळ मंठा तालुका व पंचक्रोशोतील सर्व समाज बांधव यांच्या सहकार्याने दि. २३जुन रोजी या कुटुंबास संसार उपयोगी साहित्य व वस्त्रदानाकरिता आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी उपस्थिती विष्णूपंथ गायकवाड, विष्णूकाका गायकवाड, कैलास गव्हाणे, महादेव हांबरे, राजेश शिंदे, विजय गोंडगे, जीवन कुलाल,विकास हांबरे, सुनील मोरे, गजानन गिर्हे, अल्केश हिरप, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# अज्ञात हल्लेखोरांकडून नोकरावर गोळीबार

## अंबड तालुक्यातील मार्डी रोडवरील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** शहरापासून अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या मार्डी रस्त्यावर शनिवार रात्री 10 वाजेच्या सुमारास दुचाकीवरून किनगाव चौफुलीकडे जाणाऱ्या दुचाकीस्वराला पाठीमागून मोटरसायकल वरून आलेल्या अज्ञाताने गोळीबार करून जखमी करण्याची घटना अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.



यावेळी अज्ञात हल्लेखोरांनी दोन फायर केले, त्यापैकी एक गोळी राधाकिशन पुंडलिक पिवळ या खाजगी दुकानात नोकरी करणाऱ्या 52 वर्षीय इसमाच्या हाताला लागून तो जखमी झाला. हल्लेखोरानी घटनास्थळावरून पळ काढला असून पोलीस घडलेल्या घटनेचा तपास करत आहेत. अंबड पोलीस स्टेशनचा कारभार प्रभारीराज सुरू असून अंबड शहरात गुन्ह्याचे प्रमाण वाढले आहे. अंबड तालुक्यातील मार्डी जवळील घटनास्थळी सोमवारी सकाळी अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. राहुल खाडे, अंबड पोलीस उपविभागीय अधिकारी मुकुंद आघाव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ, प्रशिक्षणार्थी डी वाय एस पी तसेच अंबड पोलीस ठाण्याचे प्रभारी चैतन्य कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक साजिद अहमद, पोलीस उपनिरीक्षक योगेश चव्हाण, आदिनाथ ढाकणे, स्कॉट, पाटील, पोलीस हेडकॉन्स्टेबल विष्णू चव्हाण सतीश देशमुख दीपक देशपांडे वंदन पवार यांनी भेट दिली.

> घटनास्थळाची पाहणी करण्यात आली आहे . तसेच घटनेचा तपास सुरू करण्यात आला आहे . ताबडतोब आरोपीचा शोध घेण्यात येईल .
> **– रामेश्वर खनाळ**
> पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना .
>
> घटनास्थळी पोलीस पथकाने भेट दिली असून पोलीस यंत्रणा तपासकामी लागले आहेत . हल्लेखोरांचा हेतूसह अभय बाबींचा तपास करून गुन्हा उघड करण्याचा प्रयत्न सुरू आहे .
> **– मुकुंद आघाव, उपविभागीय पोलिस अधिकारी अंबड .**

याबाबत अधिक माहिती अशी की, वाईन शॉपिवरील मॅनेजर हे अंबड येथून राधाकिसन पिवळ हे एम एच 21 बीबी 70 28 या दुचाकीवरून मार्डी रोड ने जात असताना अंबड कडून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी मोटर सायकल आडवी लावून फिर्यादीच्या ताब्यातील बॅगची मागणी केली.बॅग देण्यास नकार दिल्याने जिवे मारण्याच्या उद्देशाने हल्लेखोरांनी त्यांच्याजवळ असलेल्या बंदुकीतून गोळी मारून राधाकिसन पिवळ यांना जखमी करून दुचाकीवरून पलायन केले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी राधाकिसन पिवळ यांना औरंगाबाद येथे खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. राधाकिसन पुंडलिक पिवळ यांनी अंबड पोलीस ठाण्यात दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंबड पोलिसांनी अज्ञात आरोपी विरोधात भ.द.वि 307,341,34, कलम 3/25 भारतीय शस्त्र अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक साजिद अहमद यांच्याकडे देण्यात आला आहे.

# समेज मस्के नवोदय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** येथील श्रीमती डी.जी.अग्रवाल मेमोरियल इंग्लिश स्कूल चा विद्यार्थी समेज सतीश मस्के नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. त्याने इयत्ता पाचवीच्या वर्गातून नवोदय विद्यालयाची प्रवेश परीक्षा २९ एप्रिल २०२३ रोजी साक्री येथील सी.गो. पाटील महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर दिली होती. समेज मस्के हा कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के याचा मुलगा आहे. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे डी.जी. अग्रवाल विद्यालयाच्या प्राचार्या रजनी बिजु अब्राहम, सुनिता मॅथ्यू मॅडम मॅथ्यू सर, प्रवीण कुमार, सुजी मुरलीधरन, सुभा प्रविण कुमार,अत्मेश्वर जाधव,जयश्री घरटे,जायदा पिंजारी, भाग्यश्री कोठावदे, पॉल हॅरी, विजयालक्ष्मी मॅम, सुभाष सर, अर्चना अहिरे, जयेश शर्मा, दक्षिता शर्मा,अमोल गुरव आदी शिक्षकांनी त्याचे अभिनंदन केले.




# शाम-ए-गजल मराठी उर्दू गजल मैफिल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शाहीर विजयानंद जाधव प्रतिष्ठान तर्फे २७ जून रोजी संध्याकाळी ६ व शहरात गजल मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. हि स्वर मैफिल अमोल विजयानंद जाधव आणि आणि यशस्वी कलावंताचा संच हे सादर करणार आहेत. हा कार्यक्रम मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी , शासकीय दूध डेरीच्या पाठीमागे होणार आहे. शहरवासीयांची हा कार्यक्रम एक पर्वणीच ठरणार आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक डॉ अरविंद गायकवाड असणार आहेत तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा डॉ ऋषिकेश कांबळे सर असणार आहेत या कर्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एस. एस. भगत , निलेश राऊत डॉ संजय पवार , रवींद्र जोगदंड , सिद्धार्थ घोडके ,ऍड अनिलकुमार बसते, ह. नि. सोनकांबळे सर , डॉ करून देशपांडे इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शाहीर विजयानंद जाधव प्रतिष्ठान तर्फे आयोजित या स्वर मैफिलीला संगीत रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.





# प्रशांत गौतम यांना महाराष्ट्र मित्र समूहाचा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठी आठव दिवस उपक्रमाच्या वर्षपूर्ती निमित्त महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र मित्र समुहाचा सन्मान करण्यात आला.तो दोन्ही समुहाच्या वतिने मुख्य प्रशासक प्रशांत गौतम यांनी स्वीकारला.या वेळी अभिनेते बिग बॉस मालिका फेम सुशांत शेलार,लोकप्रिय कादंबरीकार,तथा साहित्य अकादमीचे सदस्य विश्वास पाटील,ज्येष्ठ कवी महेश केळूसकर,स्वामीराज प्रकाशनाच्या प्रकाशिका रजनी राणे यांची प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती संभाजी नगरचे ज्येष्ठ पत्रकार प्रशांत गौतम हे ज्येष्ठ पत्रकार असुन ते उत्तम कवी.. लेखक आहेत. बालसाहित्या मधिल त्यांच्या अनमोल कार्यासाठी देखील त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. प्रशांत गौतम यांना नुकत्याच गौरवलेल्या पुरस्कारासाठी साहित्य.. पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे असून त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# ममुराबाद जि. प. शाळेत आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज


**खुलताबाद :** तालुक्यातील ममुराबाद जिल्हा परिषद शाळेत शनिवार रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत पासून आरोग्य तपासणी करण्यात आली ममुराबाद मध्ये वृद्ध रुग्णाचे बीपी शुगर अनेक आजार चेकअप करण्यात आले गावात आय बिटिंग व सातरोगाची जनजागृती करण्यात आली याप्रसंगी डॉ.कुणाल राऊत सय्यद अमजत आरोग्य सेवक एस.के. माहुरे आरोग्य सेविका आशाताई शोभाताई आदमाने उपसरपंच कृष्णा गावंडे ग्रामसेवक डी अंतराये मा. उपसरपंच गप्पा शेख राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे जावेद पटेल ठाकूर शेख शिपाई जनार्दन वेताळ दाऊद पटेल ग्रामपंचायत सदस्य नाजेर पटेल कैसर शेख फर्जना शेख प्रकाश जेठे सोसायटी सदस्य शिवाजी जेठे सोसायटी चेअरमन रउप पटेल अफसर शेख अदी गावकऱ्यांचे उपस्थिती होती.

# वडोदबाजार येथील शेतकऱ्यांची लूट

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यामध्ये वडोदबाजार येथील कुठलेही कृषी सेवा भाव फलक लावलेले नसून शेतकऱ्यांना काही कृषी सेवा डुबलीकेट बियाणे रासायनिक खत जास्तीच्या भावाने देत आहे व यावर संबंधित कृषी अधिकाऱ्यांचे कानाडोळा दिसत आहे जास्तीचे पैसे घेऊन शेतकऱ्याची पिळवणूक करत आहे यांच्यावर कारवाई कोण करणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण होत आहे कृषी अधिकाऱ्याची आणि कृषी सेवा चालकांचे साठे लोटा आहे की काय असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे त्यामध्ये शेतकऱ्याची रब्बीची हंगामातून शेतकऱ्याला कुठलीही बियाणं जास्तीचे भावना देत आहे शेतकऱ्याला पाणी पडत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून त्यामध्ये कृषी सेवा चालक व रासायनिक खत वाले शेतकऱ्याची पिळवणूक करत आहे यावर वरिष्ठ कृषी अधिकारी व कृषी मंत्री यांनी दखल घेण्याची मागणी नागरिकाकडून होत आहे. तरीसुद्धा वडोद बाजार येथील कृषी सेवा हे यांच्या मनमानी पद्धतीने कुठलेही बियाणं शेतकऱ्याच्या माती मारून मोकळे होत आहे. कृषी सेवा वाली शेतकऱ्याची लूट करत आहे. शेतकऱ्यांनी विशिष्ट कंपनीच्या बियाण्याचा आग्रह दुकानदाराकडे धरू नये जर बियाणे उपलब्ध असूनही दुकानदार देत नसेल तर शेतकऱ्यांनी तक्रार करावी चढ्या दराने बियाणे विकताना आढळल्यास तत्काळ कारवाई करणार आहे.







# IIB जनता दरबार : राज्यातील पहिलाच नावीन्यपूर्ण उपक्रम

## आयआयबी इन्स्टिट्यूट म्हणजे सगळ्या बाबतींत उत्तम नियोजन, विद्यार्थी हितासाठी केले नूतनीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** आजपर्यंत इतिहास पाहता आतापर्यंत हजारो डॉक्टर घडविणाऱ्या आणि महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयआयबी इन्स्टिट्यूटमध्ये ज्या काही नवनवीन संकल्पना सुरू होतात त्या फक्त आणि फक्त विद्यार्थ्यांना केंद्रीत ठेवुन. आज आपण पाहतोत की, कोणत्याही इन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थी व पालकांसाठी भेटीगाठी, अडीअडचणीसाठी प्रत्यक्षात डायरेक्टर भेटत नाहीत किंवा भेट होऊ शकत नाही. पण आयआयबी इन्स्टिट्यूटमध्ये प्रत्यक्ष डायरेक्टरशी समोरासमोर चर्चासत्र, अडीअडचणी, शिक्षणाबाबतीत प्रत्येक गोष्टीसाठी थेट डायरेक्टरशी संवाद साधता यावा व प्रत्येक 11वी व 12 बाबतीतच्या अडचणी दूर करण्यासाठी आयआयबी जनता दरबारची संकल्पना चालू करण्यात आली. हा राज्यातील पहिलाच नाविन्यपूर्ण उपक्रम ठरर आहे.

आयआयबीची प्रत्येक संकल्पना ही विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेऊन व गुणवत्ता वाढण्यासाठी राबविण्यात येत असतात. याचेच नवीन उदाहरण म्हणजे "आयआयबी जनता दरबार". यामध्ये प्रत्येक दिवशी दिवसभरात क्लास संपले की, प्रत्येक विषयातील पाच प्रतिनिधींना बोलावून दिवसात घडलेल्या अडचणी व शंकांचे निरसन केले जात आहे. इन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थी संख्या जास्त असल्या तरी 50/50 विद्यार्थ्यांची जम्बो टेस्ट घेण्यात येत आहे. प्रत्येक टेस्टच्या नंतर जनता दरबारात प्रत्येक टेस्ट नंतर वैयक्तिक प्रत्येक विद्यार्थ्यांचे गुणांकन निरीक्षण, परीक्षण करून ज्या-त्या विद्यार्थ्यांचे गुणांकन वाढीसाठी लगेच पावले उचलली जात आहेत. यावर्षीच्या निकालात महाराष्ट्राचा टक्का निश्चितच वाढला आहे.

> प्रत्येक पालकांसाठी विद्यार्थी, पालक व प्राध्यापक हा त्रिकोण कायम एकमेकांशी जुळलेला रहाणे आवश्यक आहे. प्रत्येक एक्झाम नंतर स्वत: टीचर आणि डायरेक्टर आपल्या भेटीसाठी, चर्चेसाठी, पेपर डिस्कस साठी, पेपर, एखादा विषय या सारख्या अडचणींसाठी उपलब्ध आहेत. आपणही आपल्या पाल्याला घेऊन प्रत्येक टेस्टच्या नंतर जनता दरबारमध्ये येऊन भेटावे. निश्चितच पुढील काळात जनता दरबार हा उपक्रम विद्यार्थी व पालकांच्या 100 टक्के पसंतीस उतरेल व विद्यार्थी, पालक आणि आयआयबी टीममध्ये पारदर्शकता राहील. **- प्रा. चिराग सेनमा, डायरेक्टर आयआयबी इन्स्टिट्यूट**

तो सतत कायम रहावा, गुणवत्तेत सातत्य रहावे व यापुढे ही महाराष्ट्रातून केवळ मोठा निकालाच नाही तर ऑल इंडिया रँकर सुद्धा जास्त प्रमाणात घडावेत या दिशेने आयआयबी इन्स्टिट्यूटने आपले ध्येय निश्चित करून योग्य ती तयारी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून जनता दरबारमध्ये प्रत्येक 100 विद्यार्थ्यांची टीम करून त्या टीमला एक-एक प्राध्यापकांनी दत्तक घेतले आहे. पूर्ण दोन वर्षे NEET परीक्षा होईपर्यंत त्यांचेपूर्ण पालकत्व स्वीकारून ध्येयपूर्तीसाठी एक-एक पाऊल टार्गेटच्या दिशेने टाकन्यास तयार करत आहे. जनता दरबार मध्ये प्रत्येक छोट्या, सूक्ष्म लहानात-लहान, साध्या असो मोठ्या असो प्रत्येक गोष्टीकडे आयआयबीच्या डायरेक्टर यांचे जातीने लक्ष देत आहे. यामध्ये डाऊट सोल्युशन, क्लास टाईम, नोट्स, लेक्चर, स्टडी रूम, सेल्फ स्टडी वेळ, शंका निरसन करीता वेळ वाढवून मिळणे अशा प्रत्येक गोष्टीवर बारकाईने कार्य केले जाणार आहे. दरम्यान, आगामी NEET परीक्षेच्या धर्तीवर आयआयबी जनता दरबार मोठी भूमिका बजावेल हे नक्की.

# अंबड तालुक्यात अखेर पावसाची हजेरी

## पेरणीसाठी पोषक पाऊस पडला तरच पेरणी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** तालुक्यात शनिवार दि. 24 रोजी सायंकाळी 7 वाजण्याच्या सुमारास खूप विश्रांतीनंतर सर्व महसूल मंडळामध्ये पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. परंतु राज्यात मान्सून दाखल झाला असला तरी तालुक्यात जोपर्यंत 100 मिमी पाऊस पडल्याची नोंद होत नाही. तोपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणी करू नये, असा महत्त्वपूर्ण सल्ला तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांनी शेतकऱ्यांना दिला आहे. बिपरजॉय या चक्रिवादळामुळं दडी मारून बसलेला मान्सून आता राज्यात सर्वत्र सक्रीय होण्यास सुरुवात झाली आहे. अंबड तालुक्यात वडीगोद्री तसेच सुखापुरी महसूल मंडळात दि.24 रोजी सायंकाळी 7 वाजण्याच्या सुमारास मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. अनेक दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना या पावसाने मोठा दिलासा मिळाला आहे. याशिवाय खरीप हंगामाच्या तयारीला लागलेल्या शेतकऱ्यांमध्येही आनंद व्यक्त केला जात आहे. पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम लांबला होता. आता राज्यात पावसाला सुरुवात झाल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये पेरणीची तयारी करण्यात येत आहे.



शेतकऱ्यांनी शेतात जाऊन फुली पाडण्यासाह इतर कामे हाती घेतली आहेत. अंबड तालुक्यात वडीगोद्री,सुखापुरी या महसूल मंडळात मुसळधार पाऊस पडला आहे. मात्र तालुक्यात इतर महसूल मंडळात चांगल्या प्रकारे पावसाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळं तालुक्यात सर्वत्र जोपर्यंत १०० मिमी पाऊस पडल्याची नोंद होत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असं तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांनी सांगितलं आहे. कमी पावसात पेरणी केल्यास पिकांना धोका होण्याची शक्यता आहे. त्यामुळं शेतकऱ्यांनी आणखी आठवडाभर चांगल्या पावसाची वाट बघावी, असं आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. अंबड

> अंबड तालुक्यात 24 जुनला पडलेला पाऊस.
> अंबड 11 मिमी, धनगर पिंपरी 15 मिमी, जामखेड 10 मीमी, वडीगोद्री 45 मीमी, गोंदी 09 मीमी, रोहिलागड 12 मीमी, सुखापुरी 43 मीमी पाऊसाची नोंद झाली आहे. तालुक्यात 145 मीमी पावसाची नोंद झाली असून सरासरी 21 मिमी पाऊस पडला आहे.

तालुक्यातील अनेक भागांत बागायतदार शेतकऱ्यांनी मका, कापूस, सोयाबीन आणि बाजरीची पेरणी केलेली आहे. परंतु कोरडवाहू शेतकऱ्यांच्या पेरण्या पावसामुळं खोळंबलेल्या आहे. जून महिना संपल्यानंतर पाऊस झाला तर मूग आणि उडीद यांसारख्या पिकांच्या पेरणीची वेळ संपेल.याशिवाय जुलै महिन्यात केवळ बाजरी, तूर आणि सूर्यफूल या पिकांचीच पेरणी करता येणार आहे. मागील दोन दिवसांपासून राज्यातील अनेक ठिकाणी मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. येत्या काही तासांत मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत वीजांच्या कडकडाटांसह मुसळधार पाऊस होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. त्यामुळं आता जून महिन्यापूर्वीच खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांनी तयारी सुरू केल्याचे चित्र दिसून येत आहे.



# ज्येष्ठ नागरिक असोसिएशनच्या अध्यक्षपदी विलास जोशी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पिंपळे सौदागर येथील ज्येष्ठ नागरिक असोसिएशन च्या अध्यक्षपदी विलास जोशी यांची निवड करण्यात आली. पिंपळे सौदागर परिसरातील गोविंद गार्डन हॉटेलच्या बासरी हॉलमध्ये रविवार दि. २५ रोजी सकाळी असोसिएशनच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. असोसिएशनचे सचिव डॉ. सुभाषचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस रमेश वाणी, शंकर पाटील, प्रदिप कुलकर्णी, हितेशभाई कक्कड, किर्तीकुमार शहा, मतालिया अशोक, राजेंद्र देशमुख, विवेकानंद लिगाडे, पिंगळेसर हे पदाधिकारी तसेच माजी नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे, माजी नगरसेविका निर्मलाताई कुटे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजयभाऊ भिसे, शंकर कुंजीर, भाजपाचे पदाधिकारी ब्राह्मणकर यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती. असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष रमेश वाणी यांनी राजीनामा दिल्याने असोसिएशनचे सल्लागार शंकर पाटील यांनी नुतन अध्यक्ष म्हणून विलास जोशी यांचे नाव जाहीर केले. त्याला उपस्थित सदस्यांनी हात वर करून एकमताने संमती दिली. याप्रसंगी शत्रुघ्न बापू काटे, निर्मलाताई कुटे तसेच संजयभाऊ भिसे यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष विलास जोशी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थित सदस्यांच्या वतीने श्रीकृष्ण निलेगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचलन शकुंतला शिंदे आणि जयश्री चौधरी यांनी केले. आभार विवेकानंद लिगाडे यांनी मानले. बैठकीनंतर भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मारुती मसाजी माने यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** माजी सैनिक मारुती मसाजी माने ( वय ८२ ) वर्षे,



रा. लोहटा ता. औसा जि.लातूर यांचे शनिवार, दिनांक २४ जून रोजी दुपारी अल्पशा आजाराने उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, भाऊ, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून प्रा.गौतम माने आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाचे विभागप्रमुख डॉ. दिनकर माने यांचे ते वडील तसेच दयानंद महाविद्यालय, लातूरचे उपप्राचार्य डॉ. मिलिंद माने यांचे ते भाऊ होत. मारुती माने यांच्यावर रविवारी सकाळी त्यांचा मूळगावी अंत्यविधी करण्यात आला. यावेळी विविध स्तरातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# आ. विजय भांबळे यांच्या हस्ते गुणवंतांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** श्री नृसिंह प्रतिष्ठान जिंतूर यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व विविध पदावर निवड झालेल्या यशवंतांचा गुणगौरव प्रमुख पाहुणे उद्योजक तथा सुप्रसिद्ध लेखक शरदजी तांदळे व विठ्ठल कांगणे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत आ.विजय भांबळे व प्रेक्षा भांबळे – बोराडे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी प्रेक्षाताई भांबळे – बोराडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना दहावी व बारावीनंतर विध्यार्थ्याचा करियर निवडण्याचा हाच काळ असतो. यावेळी त्यांना मार्गदर्शन मिळणे अत्यंत गरजेचे असते त्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. तर विठ्ठल कांगणे सर यांनी विशिष्ट भाषाशैलीत तरुण मुला मुलींना नैतिकतेचे धडे दिले व आई वडिलांच्या कष्टाचे सोने करण्याचा मोलाचा संदेश दिला. मुलांनी सोशल मिडियापासून दुर राहून संपूर्ण लक्ष शिक्षणात घातले पाहिजे, आयुष्याच्या वाटेवर करियर करण्यासाठी शिक्षण अत्यंत मोलाचे आहे, असा संदेश विध्यार्थ्यांना दिला. उद्योजक तथा सुप्रसिद्ध लेखक शरदजी तांदळे यांनी चालू पिढीही फेसबुक, युटूब, इंस्टाग्राम च्या आह्री गेली असून अनेक विध्यार्थी मनोरुग्ण होत आहेत.



विजय भांबळे यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषण करतांना आपल्या माय भूमीत वर्ग एकचे अधिकारी निर्माण व्हावेत यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत व सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमचे श्री नृसिंह प्रतिष्ठान जिंतूर नेहमीच अग्रेसर राहील असा शब्द दिला. विध्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नीट, एम, एमबीबीएस, महाराष्ट्र पोलीस या विविध पदावर निवड झालेल्या व इयत्ता दहावी, इयत्ता बारावी यांच्यासह सर्व जिंतूर-सेलू तालुक्यातील शाळेमधील प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचे ट्राफी, पुष्प गुच्छ व प्रमाणपत्र देऊन विजय भांबळे व मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी जि.प.चे रामराव उबाळे, विश्वनाथ राठोड, अशोकनाना काकडे, बाळासाहेब घुगे, विठ्ठल घोगरे, मुरलीधर मते, अभिनय राऊत, प्रकाशराव मुळे, तालुकाध्यक्ष जिंतूर मनोज थिटे, माऊली ताठे, माजी पं.स. सभापती गणेश ईलग, मधुकर भवाळे, माजी पं.स. सदस्य विजयराव खिस्ते, शहरअध्यक्ष शौकत लाला, इस्माईल शेख, अहेमद बागबान, संजय निकाळजे, चंद्रकांत बहिरट, बालाजी नव्हाट याबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते, सरपंच व विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत बुद्धिवंतांचे संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाली असून, देशात विशेष जनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. खुलताबाद तालुक्यातील ताजनापुर येथे बुद्धिवंताचे संमेलन संपन्न झाले. यावेळी २०१४ पूर्वी देशात भ्रष्टचार, गैरव्यवहारमुळे देशात असुरक्षित वातावरण होते पण, मोदी सरकारच्या काळात देशात सर्वांगीण विकास होत आहे, असे केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी बुद्धिवंत संमेलनात म्हटले आहे. शांताई माध्यमिक व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय ताजनापुर येथे बुद्धीवंताचे संमेलन संपन्न झाले. यावेळी भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष विजय औताडे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष एल.जी. गायकवाड, मनोज पांगारकर, खुलताबाद तालुका अध्यक्ष प्रकाश वाकळे, जि.प. सदस्य सुरेश सोनवणे, संभाजीनगर लोकसभेचे विस्तार गोविंद केंद्रे, गणेश काळे, दिनेश अंभोरे, गंगापूर खुलताबाद विधानसभा प्रमुख विकास कापसे, गणेश अधाने, सतिश दांडेकर, परसराम बारगळ, अविनाश कुलकर्णी, दीपक काळे, संदीप निकम , ज्ञानेश्वर नलावडे, प्रकाश चव्हाण, अविनाश वेताळ,राहुल निकुंभ, गणेश झुरावत, सतिश जैस्वाल,सुमित चाबुकस्वार, अविनाश औटे, अशोक खंडागळे, योगेश काळे, आत्माराम नलावडे, अंकुश काळे, अनिल कारभाळ, दगडू काळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. २५ जून १९७५ हा दिवस भारतीय लोकशाहीमध्ये काळा दिवस समजला जातो. अराजक माजले माजले होते सगळीकडे भ्रष्टचार, सत्ते विरोधात तरुण विद्यार्थी उभे राहिले.बिहार विधानसभेला घेराव घातला, तीन तरुण मारले गेले.



जय प्रकाश नारायण यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले होते आणि इंदिरा गांधी चे खासदारकी रद्द केली होती. देशात लोकशाही चे सर्व नियम पायदळी तुडविण्यात आले, असे मनोज पांगारकर यांनी म्हंटले. शेतीची अवस्था उदासीन झाली आहे.जल आणि भूमी संधारण स्वयंचलित हवामान प्रयोगशाळा सुरू करण्यात यावीत,असे शेतकरी आत्माराम नलावडे यांनी सूचना केलीत. कायदयांच्या संदर्भात अ‍ॅड. अविनाश औटे, शेतीविषयक माहिती आत्माराम नलावडे, श्रीमती सरलाताई वाघ यांनीही संगीत क्षेत्रातील संवाद साधला. प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत होत आहे. किसान सन्मान योजनेत गोर गरीब शेतकऱ्यांना सहा आणि राज्य सरकारचे सहा असे एकूण बारा हजार रुपये देण्यात येतात. जनधन योजेनेत प्रत्येकाचे बँकेत खाते काढले. जनधन खाते, आधार आणि मोबाईल नंबर यामुळे भ्रष्टचार कमी झाला आहे. विमा योजना आणली, आता एक रुपयात विमा उतरविला आहे, असे केंद्रिय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी यावेळी म्हटले आहे.

## जैन टॅगच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरालाउत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सामाजिक कार्यात नेहमी अगे्रस असलेल्या जैन टॅग या गुरप तर्फे योग दिनाचे औचित्य साधुन चंद्रसागर जैन धर्मशाळा शहागंज येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये १५० रग्णांनी याच लाभ घेतला. सर्व प्रथम आरोग्य शिबीराची सुरवात किर्ती पाटणी यांच्या मंगलाचरणाने करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन पंचायत अध्यक्ष ललीत पाटणी, चिफ गेस्ट डॉ.प्रो.उत्तमजी कालवणे ( योग गुर ) वेलनेस कोच आर.टी.सीजगन्नाथ कुलथे, वेलनेस कॉन्सलर सौ.आरती यादव, रपाली टिदर, वेलनेस ट्रेनर स्वराज डाकोरकर,एम.आर बडजाते,आनंद सेठी,सचिन लोहाडे,शितल बडजाते,राहुल पांडे, आदींची प्रमुख अतिथी होते. या कार्यकमाचे प्राजेक्ट चेअरमेन जयश्री लोहाडे,दिपाली पांडे, किर्ती पाटणी हया होत्या. या कार्यकमासाठी सहय्यक प्रबंधक इंडियन ऑईल अक्षद गंगवाल



यांचे यावेळी हया कार्यकमाला योगदाने मिळाले.

सुत्रसंचालन जयश्री लोहाडे एवंम दिपाली पांडे यांनी केले. यावेळी जैन टॅगच्या अध्यक्षा श्श्वेता सेठी यांनी जैन टॅग च्या विविध कार्यकमांची माहिती विशद केली. यावेळी अतिथींचे स्वागत श्श्वेता सेठी, जयश्री लोहाडे, सिम्मी पहाडिया, जैन टॅगचे फाउंडर अध्यक्षा दिपीका बडजाते, अनुपमा दगडा, याशिका पांडे, मिताली काला, सपना पाटणी, स्वाती कासलीवाल, पुजा सेठी यांनी केले. कार्यकमाचे प्रमुख अतिथी प्रो.डॉ.उत्तमजी कालवणे यांनी योग विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.जगन्नाथ कुलथे व सहका-यांनी संपुर्ण शरीराची आरोग्य तपासणी केली व मार्गदर्शन केले. प्रो.डॉ.उत्तमजी कालवणे यांचा परीचय प्रोजेक्ट चेअरमन जयश्री लोहाडे यांनी केले. कार्यक्रमासाठी जैन टॅगच्या सदस्या छाया कासलीवाल, रचना पहाडे, पुजा झांजरी, रानु सेठी, पुर्वा कासलीवाल, सिमा बडजाते, श्श्वेता कासलीवाल, नेत्रजा कासलीवाल, सारिका बडजाते, रिना ठोले, रिचा कासलीवाल उज्वला पाटणी, श्वेता गंगवाल यांनी परिश्रम घेतले.

## गोमांस तस्करीच्या संशयातून जमावाची मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** इगतपुरी तालुक्यात गोमांस तस्करीच्या संशयावरून काही जणांनी तरुणाची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या हाणामारीत दुसरा तरुणही गंभीर जखमी असून त्यास धामणगांव येथील एसएमबीटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी याप्रकरणी १० संशयितांना ताब्यात घेतले आहे. इगतपुरी तालुक्यातील घोटी-सिन्नर मार्गावरील गंभीरवाडीजवळ शनिवारी सायंकाळी गोमांस घेऊन जात असल्याच्या संशयावरून कार अडविण्यात आली. कारमधील दोन जणांना १० ते १५ जणांच्या जमावाकडून गज आणि दांडक्याने बेदम मारहाण करण्यात आली. यात अफान अन्सारी ( ३२ ) याचा मृत्यू झाला. तर, नासिर हुसेन कुरेशी ( २४ ) हा गंभीर जखमी झाला. हे दोघेही मुंबईतील कुर्ला ( पूर्व ) येथील कुरेशी नगरातील रहिवासी आहेत. लीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर अधीक्षक माधुरी कांगणे, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने भेट देऊन रात्रीतून १० संशयितांना ताब्यात घेतले.






## लाच मागणाऱ्या अभियंता महिलेला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ठेकेदाराला वीज मीटर मंजूर करण्यासाठी वीस हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी महावितरणच्या धानोरी कार्यालयातील सहायक अभियंता महिलेला लाचलुचपतने अटक केली. हर्षाली ओम ढवळे ( वय ३८ ) असे अटक करण्यात आलेल्या सहायक अभियंता महिलेचे नाव आहे. याबाबत एका ठेकेदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. तक्रारदार एका विद्युत ठेकेदाराकडे कामाला आहे. वीज मीटर मंजूर करून घेण्यासाठी तक्रारदार महावितरणच्या धानोरी कार्यालयात गेला होता. त्या वेळी ढवळे यांनी पूर्वीच्या थ्री फेज मीटरच्या कामासाठी आणि नवीन मीटर बसविण्यासाठी वीस हजार रुपयांची लाच मागितली. त्यानंतर तक्रारादाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. ढवळे यांनी वीस हजार रुपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती बारा हजार रुपयांची लाच मागितल्याचे उघडकीस झाले.

## पंढरपूरसाठी ७६ गाड्यांचे नियोजन

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** पंढरपुरात आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक दाखल होतात. प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने पंढरपूरसाठी ७६ विशेष गाड्यांचे नियोजन केले आहे. यातील १६ फेऱ्यांतून विदर्भातील भाविकांचीही सोयी होणार आहे. यात नागपूर-मिरज ( ४ फेऱ्या ), नागपूर-पंढरपूर ( ४ फेऱ्या ), नवी अमरावती-पंढरपूर ( ४ फेऱ्या ), व खामगाव-पंढरपूर ( ४ फेऱ्या ) या विशेष गाड्या विदर्भातून धावणार आहेत.नागपूर-मिरज विशेष गाडी क्रमांक ०१२०५ विशेष गाडी २५ आणि २८ जून रोजी ८.५० वाजता नागपूरहून सुटून दुसऱ्या दिवशी ११.५५ वाजता मिरजला पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०१२०६ ही गाडी २६ आणि २९ जून रोजी १२.५५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी १२.२५ वाजता नागपूरला पोहोचेल. या गाडीला अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डूवाडी, पंढरपूर, सांगोला, म्हसाबा डोंगरगाव, जठरगाव धालगाव, कवठेमहांकाळ व सुलगरे या ठिकाणी थांबा दिला आहे.